पेशवे दप्तर अभिलेखमाला

वर्णनात्मक सूची खंड १

शाहू दप्तरातील
कागदपत्रांची वर्णनात्मक सूची

प्रमुख संपादक :

डॉ. मो. गं. दीक्षित,

संचालक, पुराभिलेख व पुरातत्त्व,

महाराष्ट्र शासन

संपादक :

वि. गो. खोबरेकर,

सहायक संचालक, पुराभिलेख

प्रस्तावना :

डॉ. पु. म. जोशी

*

नागपूर

शासकीय मुद्रणालय

१९६९

प्रकाशक :

संचालक, पुराभिलेख व पुरातत्त्व,
महाराष्ट्र शासन.

आवृती :

पहिली १९६९

मुद्रक :

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय,
नागपूर.

संचालक
पुराभिलेख व पुरातत्त्व, महाराष्ट्र शासन
यांजकडून सप्रेम भेट

पोच व परत भेट—
संचालक, पुराभिलेख व पुरातत्त्व
महाराष्ट्र शासन
सचिवालयीन पुराभिलेख कार्यालय
एलफिन्स्टन महाविद्यालय इमारत
मुंबई-३२

With the Compliments of
THE DIRECTOR OF ARCHIVES AND ARCHAEOLOGY
Government of Maharashtra

Acknowledgments and exchanges to—
THE DIRECTOR OF ARCHIVES AND ARCHAEOLOGY
Government of Maharashtra
Secretariat Record Office
Elphinstone College Building
Fort, Bombay-32 (India)

INTRODUCTION

THE SHAHU DAFTAR today forms a part of the Daftars housed in the Alienation Office, Poona, popularly known as the Peshwa Daftar. These papers though called Shahu Daftar or Shahu Raja's Daftar are not limited to the reign of Shahu (1707-1749) but are so known because they were brought from Satara, the seat of Shahu, by the British Government after the annexation of Satara in 1848. Shahu, Shivaji's grandson, on his release from Mughal camp in 1707 established his rule at Satara and from here issued fresh *Sanads* in place of previously destroyed old documents[1].

From Shahu's reign systematic efforts were made to preserve state records at Satara. After the death of Shahu in 1749 and even before Satara ceased to be politically important as the capital of the Maratha State[2], state records were housed at Poona which had now become the *de facto* capital of the Maratha dominion[3]. Peshwa Bajirao I made Poona his head-quarter in the year 1729. We find that the state records in the Peshwa's repository at Poona date back to 1729.

In the Maratha State it was a custom that the nobility which created the records normally kept them in their own custody. Technically though the records of the Maratha State are an integral and indivisible entity, in practice they were scattered and housed with the various units that comprised the Maratha Confederacy. The Shahu Daftar, the fountain-head of the Maratha State Archives, does not, therefore, contain all the records that were created by the Maratha administration. It consists of only those records which necessarily formed part of the Chhatrapati's own **Daftarkhana.**

The earliest document in Shahu Daftar is dated 1703, i.e., the third year of the reign of Shivaji II, the son of Rajaram and the last document is of the year 1818.

Till 1750, the Shahu Daftar also called Huzur Daftar was a record of the transactions of Government, as registered by Government officers. In it are found all accounts of the receipt and expenditure of the revenues of the state, whether realised from the provinces or from any other source; the expenses of military establishment, *Inams* and every kind of grant, gift, and money transaction, whatever excepting only the private affairs of the prince or similar items.

After the death of Shahu I in 1749, the Chhatrapati of Satara not only became a nonentity in Maratha politics but was gradually reduced to the position of a puppet in the hands of the Peshwa. The only function that was left to the Chhatrapati was to bestow the official robes of the *Peshwaship* whenever a new Peshwa succeeded.

---

[1] The state records of Shivaji which were preserved at Raigad in the Daftarkhana or record office perished in the confusion that followed the capture of that fort by the Mughals in the year 1689.

[2] In October 1749 Shahu issued two Rescripts by which the Peshwa was asked to conduct the affairs of the state under the orders of the one who would succeed to the throne. (*Itihas Sangraha: Aithihasik Sphuta Lekha 4.5.*)

[3] In October 1750 Ram Raja effected the transfer of power from the Chhatrapati to the Peshwa. Due to this regulation all powers of the State remained in the hands of the Peshwa and the Chhatrapati became a mere figurehead. *New History of the Marathas, Vol.* II, p. 306).

Thus the records created by the Satara Chhatrapati after 1750, till they fell into hands of the British in 1818, are in some respect classified ledgers of *Watans* and other *Inams*, as also some official correspondence. These records form a part of the Shahu Daftar.

NATURE AND DIFFICULTIES

Before explaining the system which has been followed in preparing the present index to the documents in the Shahu Daftar it is necessary to know the nature of Marathi records and the difficulties that are confronted in dealing with them.

The documents in the Peshwa Daftar are vestiges of the administrative activities of the governing bodies belonging to the Maratha State. They also cover the Muhammedan period.

The records of the Alienation Office as they now are, grown by gradual accretions to the Records of the Peshwa's administration, number nearly three crores and more. They are as a rule written in the Modi script which underwent various changes and modifications during the centuries. Palæography of these documents, therefore, is important as it poses problems in deciphering these documents. Though in vogue till a generation ago, the Modi script is scarcely studied or used today.

The second difficulty is of the language of these documents. The records of the Peshwa period fall into three categories: The first comprises *Rajpatras, Adnyapatras* and *Sanads*. The second class consists of the official documents which dealt with subjects such as orders of appointments, instructions, prohibition, temporary or permanent assignments of villages, regions, revenue, income, dues, etc., in cash, kind or territory. The third chiefly relates to accounts.

There is another class of documents which include *Rozkirds, Ghadnis, Prant Ajmas,* etc. There is still another which include correspondence, reports, *yadis,* letters, etc. A knowledge of the various types of documents, their contents and context is, therefore, essential for the proper understanding and reconstruction of the history as recorded in them.

It should be borne in mind that the work of transcribing and reading historical Modi documents accurately is a task for a skilled transcriber and deciphering of these documents, for a trained scholar and palæographer.

Reading of old Modi documents of the pre-Shivaji period is an exacting discipline requiring careful study of palæography. One has to read a document several times to be able to decipher it correctly. Sometimes one has also to consult other scholars to help in reading such documents. A student of these documents meets another hurdle when he has to decide the date of any given document. Most of these Modi letters bear no date and record sometime only the date of receipt or only the day of the week and the month. It is only the official *sanads* and the formal state papers which bear dates in three eras, the Hijri era, Shaka era as well as the Rajyabhishek era introduced by Shivaji at the time of his coronation in 1674. But the news-letters from the *sardars* and Maratha diplomats in various parts of the country conveying

several important events are as a rule without date. Often the names of the writers of these letters or the names of the addressees are not entered. In some cases, portion of beginning and end of a document or a letter seems to have perished or appears mutilated. In such cases it is only with reference to the contents and the subject-matter in the letter that its probable date can and has to be determined. The task of deciphering these incomplete and mutilated documents is not very easy. One has to prepare a list of places, persons and incidents appearing in these papers, then find out the correct dates from such references or clues as may exist in the contents of the papers. Once they are arranged in this way they seem to yield a connected story.

Almost all Marathi records are in the Modi script. The Peshwa Daftar comprises different sections. The number of Rumals in each section ranges from 1to 4,000. A majority of the sections has less than 25 Rumals each. Ferists or hand-lists for these Rumals are not written in detail classifying the contents of the Rumals for reference and they do not indicate anything more than the number of Rumals under general or minor sub-sections. It will thus be seen that the cataloguing or indexing of the records on scientific principles has not been hitherto attempted.

The suggestion for a preparation of indexes had been made by the Keeper of Records, Government of India in his Inspection report which was forwarded by Revenue Department to the Settlement Commissioner and Director of Land Records, Poona, under Revenue Department No. ALO/58/195315-AI, dated 11-12-1958. The Alienation Office Advisory Committee at their meeting on 13th August 1959 also recommended the indexing of records. The Research and Publication Committee, an adjunct of the Indian Historical Records Commission, at their 30th Meeting held in New Dehli on 8th July 1960, also recommended [Resolution IX(c)] to the State Governments to prepare and publish descriptive lists of historical documents in the custody of their respective record offices. In pursuance of the above, the Director of Archives and Historical Monuments, Government of Maharashtra prepared a scheme for bringing out descriptive Indexes of the records in the Alienation Office, Poona, and he approached Government through the Settlement Commissioner and the Director of Land Records, Poona. Government sanctioned the necessary staff and the descriptive Indexes of documents in Shahu Daftar are now completed.

All Rumals in the Shahu Daftar were sorted in their present bundles by Capt. Cowper[1]. He has given the list of headings such as *Rozkird, Watan* grants, charities, village accounts, etc., with the serial number of rumals. They broadly indicate the character of each set of Rumals[2].

The Shahu Daftar[3] was examined by Rao Bahadur G. C. Wad, the Alienation Assistant with a special staff and the extracts he

[1] Lt. Col. T. H. Cowper was appointed Inam Commissioner on 23rd May 1851, to serve as a member Inam Committee. See *Hand Book to the Records in the Alienation Office, Poona,* p. 4.

[2] Logsn's report of 27th July 1905, p. 17.

[3] It may be noted here that the Satara Records down to 1818 are known in the Alienation Office as "Shahu Raja's Daftar", or Shahu Daftar. The records between 1819 and 1848 which were compiled by the administration of the Satara Raja after the annexation of that principality are differentiated from the above as Satara Maharaja's Daftar. They consist of 3,867 rumals.

made during 1887-1902 were compiled into a small volume by D. B. Parasnis, and printed in 1904 under the title, *Shahu Roznishi,* Vol. I.

Shahu Daftar is the first in the serial order of records in the Alienation Office, Poona, which are classified into 33 different sections. For this reason it is taken up first for the preparation of descriptive indices and the letter "A" has been assigned to it. Shahu Daftar contains 56 rumals.

The arrangement of the documents: A rumal or a bundle is wrapped in white cloth (which is called *Busta*) and contains on an average 10 to 30 *pudkas* or packets of documents. Each *pudka* contains 50 to 200 documents. Without dismembering the *pudkas,* the documents in each *pudka* are sorted and arranged chronologically as far as possible. Datewise arrangement is made and a gist of each document is drawn.

The documents are grouped under suitable headings, *viz., Inam Jagir,* Letters, *Rajpatras,* etc., with reference to the contents of each documents.

1. The first nine rumals of the Shahu Daftar and rumal No. 49 contain *Rozkirds.* A *Rozkird* has uptill now been understood by scholars of Maratha history as a 'Diary'. But *Rozkird* is much more comprehensive than a diary. Shahu's *Rozkirds* take note of day-to-day happenings. At the beginning of a *Rozkird* is entered the date of the document and this is followed by sequence of events. The following items are found recorded in it: (i) Income and expenditure of presentation of clothes, etc. (ii) Income and expenditure in cash and kind from and for sundry items. (iii) Direct regular and irregular payments made to Military and civil servants. (iv) Indirect regular and irregular payment to the same, *i.e.,* by orders. (v) Copies of *sanads,* letters, orders, etc., issued on that particular day. As quite a large number of items with full details was required to be noted for each day, sometimes the diary of a single day extends to more than twenty-five sheets of paper written on both sides. The *Rozkirds* are, therefore, one of the most authentic series of records of Shahu's times.

2. The treaty of 1718-19 granted to the Marathas their *Swarajya,* and invested them with the right to collect *Chauth* and *Sardeshmukhi.* Within the *Swarajya* they exercised sovereign rights and they realised *Chauth* and *Sardeshmukhi* from the six Mughal *subahs* of the Deccan on condition of ensuring peace and order. Vast territories adjoining the *Swarajya* paid tribute to the Marathas and were considered as subjugated by them. The collection of *Chauthai* tribute from the territories of the six *subahs* was entrusted to officials or *Sardars* who were loyal to Raja Shahu.

Only a quarter of the *Chauth* styled *Rajbabati* or royal perquisite was retained by the Raja. The remaining three-fourths of the *Chauth* was distributed by Shahu among his followers. Six per cent of the total *Chauth* called *Sahotra* was set apart for the Pant Sachiv, another three per cent denominated *nadgaudi* and the balance called *Mokasa* was granted to different military leaders in return for their undertaking to maintain a fixed military contingent, and to perform military service on behalf of the state, whenever occasions demanded. Shahu defined the "sphere

of activities" of each military general. Khandesh and some part of Balaghat were reserved for the Peshwa. The Senapati was given Baglan and Gujarat; Berar, Gondwana and all the territories to the east were assigned to Senasaheb *Subha*. The Sarlashkar was given charge of Gangthadi and the *subha* of Aurangabad. The districts between the Nira and Warna were left to the Pratinidhi's care. Ledgers or *Khatavanis* of *Mokasa* granted to the above-mentioned officers are maintained in Rumals 26 to 34 and 47.

It is also seen from these documents that the civil establishments of these officers were appointed from headquarters at Satara, but their expenses were met from the *Mokasa* territories assigned to the respective officers. Thus it is seen from these records that the Chhatrapati had not to shoulder responsibility for financing military expeditions or for payment to the army.

3. From these ledgers we are able to ascertain the duration of a *Saranjam* held by each person, the period it continues to be enjoyed and the period when it was confiscated by the State.

Shahu used to grant a *Saranjam* or fief to each *Sardar* in lieu of service. It varied in size and character as well as with the status of the *Sardar* whose army ranged from one thousand to twenty-two thousand *sawars* or horsemen. The difference in the value of *Saranjam* is attributed to the difference in the personal allowance granted to each chief, which was settled on the merits of each case. The burden of the civil administration and military defence of the major portion of the kingdom was thrown on these *Saranjam*-holders.

There was yet another class of officers called *Darakdars* (Diwan, Khasnis, Phadnis, Sabnis, Daftardar, Chitnis, Parasnis). These *Darakdars* were designed as a check on the *Saranjamdar*, who was expected to keep an additional staff of three clerks with an annual salary and for this a *Saranjam* is assigned. The *Saranjamdars* had a civil staff of their own who were assigned villages for their maintenance. The *Saranjamdar* was to allow the muster of his stipulated quota and to receive an acknowledgment after the muster had been taken. He had then, to deduct from the revenue the sum due to the civil staff and the cavalry force in his employ as well as his personal allowance which was fixed by the *Sarkar*. The balance was paid into the Government treasury. A *Saranjam*-holder has thus a two-fold duty to perform. He was not only a military commander, but also a civil administrator and in the latter capacity he had to defray the expenses of the army under his command. Before taking the army to the field from his headquarters he had to advance to his *shiledars* a part of their pay. This was called *Nalbandi*. They had to purchase arms and ammunition and cattle for transport purposes. Shahu's Government could not advance the necessary funds and the *Saranjam*-holder had to provide for these items as best as he could. As a rule he contracted a loan which he expected to return out of proceeds of war; when a *Saranjamdar* expected financial help he was given an additional *jagir* in the expectation that he would be able to meet the expenses of his contingent. If a *Saranjamdar* failed to render any military service or to compensate for it in cash, Shahu Raja used to order the confiscation of the fief of such *sardars*. The documents relating to grant of *Saranjam* of the military commandants, administration for realization of revenue from the *saranjam* land

assignment of certain *parganas* towards the expenses of the forts, issue of warning letters, etc., are found in Rumals 13 to 26, 36, 42 and 47.

4. Suits regarding disputes of *Vatan*, adoption, partition, partnership, boundary-disputes and other cases of like character were heard and decided by the Raja. The decision was made to rest chiefly on the evidence of the witnesses on both sides, who were examined under the sanction of the most effective oaths and solemn asseverations [on the water of the sacred rivers]. Documents dealing with suits of above nature and the decisions of the Raja are in Rumal Nos. 9, 10 and 37. From these one can study the development of a peculiar type of judicial system of the Marathas.

5. In the matter of distribution of grants for religious purpose, it can be seen that the bulk of the benefactions which are styled as *Daitas, Agarhar* were conferred upon Brahmins. But the old Muslim grants were continued to Dargas and mosques and many new grants were made to Muslims and even Christians. There was no religious prejudice in the distribution of charity. Documents containing *Devasthans* and *varshasan* allowances granted by Shahu are found in Rumal Nos. 9, 11, 12, 37.

6. Rumal Nos. 35, 39, 40, 42, 49, 50, 51 of Shahu Daftar contain papers relating to orders issued by the Chhatrapati to officers of Rank and to the subordinate administrative authorities in the different parts of the State. Such orders pertain to a number of items or subjects and are briefly described below.

(i) Orders issued in connection with the administration of the State officers of the territory, *saranjamdars* and *sardars* for attending on the Chhatrapati either with their forces or alone. Orders were also passed to the officers in charge of the various *Thanas* to be alert at their respective headquarters.

(ii) Grants of land and villages in *Inam* for services rendered and grants made for religious purposes.

(iii) *Adnyapatras* or written assurances—these were often given to persons to encourage trade within the territories of the state for rehabilitating a village deserted through fear or violence.

(iv) Stay orders for withholding the execution of *Varat* orders for producing certain persons before the Chhatrapati, collecting land revenue or dues on account of *deshmukhi, sardeshmukhi* or *babti* rights and similar other orders.

7. Soldiers on the battle-field were awarded grant of *watans* for their exemplary action by their commanders. *Sanads* granting such *watans* by the generals or the members of Rajamandal[1] would not come in force unless these *Sanads* were entered in the *Roznishis* and endorsed by the Chhatrapati under his seal and signature. Papers dealing with such *Sanads* and grant of *inams* are found in Rumal Nos. 48 and 55.

8. Mujumdar, one of the officers of the Rajmandal, had to give instructions (*chithyas*) to the Daftardars for the preparations of *Sanads*, letters to be sent by the Raja to foreign dignitories and for corrections in the draft *Sanads*, etc. These *chithyas* were written under oral instructions of the Raja, which are found in Rumal Nos. 41 and 50.

[1] *Rajmandal.*—King's council or the Peshwa's council of ministers at Poona.

9. Rumal Nos. 41, 42 and 53 contain documents called "*Rawasudgi*" and "*Rasanagi*". Rawasudgi was the day book of "*Varats*" or cash orders issued on the treasuries or stores of the prant officers or tributary chiefs in favour of pensions and creditors of all kinds. *Rasanagis* are with royal seals. They contain day-to-day orders, given to the *Gumastas*[1] for supplying material required by the members of the royal family. They show the expenditure incurred for and by the various members of the royal family and other near relatives of the royal house. The expenditure includes personal expenses of various members of the royal family as also expenses for religious and other purposes incurred by them.

10. Rumal Nos. 9 and 38 contain accounts of expenditure incurred by Chhatrapati Shahu's Government for the maintenance of cavalry, horses and stables. The horses formed the property of the Government under the care of their officers and lands were assigned to meet the expenditure of the Department. The accounts refer to minute details such as the daily rations of a horse, its equipment, the pay of the servants attending on it and similar items.

11. Letters addressed to the Chhatrapati, Tarabai, members of the Rajmandal and subordinate officers are found in Shahu Daftar. So also the *Rokhas*[2] sent by the Chhatrapati and the female members of the royal house have place in Shahu Daftar. Letters showing the relations of the Raja with the neighbouring state, and his feudatories, letters regarding civil and military administration are found in Rumal Nos. 35, 37, 48, 51 and 52, 53.

12. In Rumal Nos. 35, 37, 47 and 48 there are documents relating to revenue management of the Huzur's *Mahals*. Revenue collection of the *Huzur Mahals* was conducted by the *Kamavisdar* or Mamlatdar, and his establishment and its contingency were all paid by the *Huzur*, the general proportion of charges being about 10 per cent of the collection. The number and pay of the *Karkoons* and *Sibandi*, i.e., horsemen and sepoys were carefully fixed in a sort of budget or *Beheda* statement.

Besides these documents students can lay their hands on material relating to various subjects such as the Maratha Army, Navy, Revenue and justice and other social and religious topics.

It is hoped that the index of these records will prove a useful reference tool to *Scholars* who want to make investigation and researches into the Shahu Daftar.

The preparation of this reference tool has taken more than four years of work for the team entrusted with it. I must mention here the unstinted devotion shown by Mr. V. G. Khobrekar in putting into practice the ideas we discussed from time to time. Mr. Khobrekar worked with the assistance of Shri M. M. Omkar, Research Assistant, Compilers—Smt. S. N. Shastri, Shri V. S. Bhat, Smt. S. Y. Deshpande and Smt. S. G. Tendulkar, Typist—Smt. P. D. Bhingarkar and Copyist Smt. Manisha Kanekar who with commendable enthusiasm and understanding carried out the project out-lined for them by Mr. Khobrekar. To all these colleagues I offer my appreciative thanks.

P. M. Joshi.

---

[1] Gumasta.—An agent, a steward, a confidential factor.

[2] *Rokhas*.—Written acknowledgment for money borrowed or an order from the state issued to an individual to a village or to the district to make a specified payment or furnish certain supplies.

संपादकाचे निवेदन

पेशवे दप्तरांत जे मराठेकालीन ऐतिहासिक कागद आहेत त्यांतील शाहू दप्तर विभाग हा एक. ह्यात ५६ रुमाल असून त्यांतील एकंदर कागद संख्या ८०,५३९ आहे ह्या ऐतिहासिक कागदांचा कॅटलॉग करण्याच्या कामास सुरवात जुलै १९६१ मध्ये होऊन ते काम सन १९६४ अखेर पुरे झाले.

कॅटलॉगची आवश्यकता :—पेशवे दप्तरांत सुमारे ३ कोटी कागद असून ते ३६ विभागांतील सुमारे ३५,००० दप्तरांत (रुमालांत) बांधून ठेविले आहेत. मराठ्यांच्या राज्यकारभाराची माहिती देणारे हे कागद इतिहासाभ्यासूंना केवढे महत्त्वाचे आहेत, त्याबद्दल मि. जॅक्सन[1] आपल्या रिपोर्टात म्हणतात, "हिंदुस्थानातील दुसऱ्या कोणत्याही सरकारापाशी पुणे दप्तराइतके महत्त्वाचे व स्थानिक भाषेतले दप्तर नाही. या देशाचा अभ्यास करणारांना हा संग्रह अभ्यासता यावा अशी व्यवस्था सरकारने करावी. हे सरकारचे कर्तव्य होय."

मराठ्यांचा हा पत्रसंभार बहुतेक मोडी लिपीतच आहे. ते लिहिणेच मुळी आधी पुष्कळांना अलिकडे वाचता येत नाही. शिवाय कोणाकडून, कोणास, कधी व कोठून पत्र लिहिले याची माहिती प्रत्येक इंग्रजी पत्रावर असते तशी मोडी पत्रांवर नसते. तसेच तर्जुमे, चिठ्या, इनामपत्रे, सनदापत्रे, निवाडे, ताकीदपत्रे, आदी जे मोडी कागदपत्रांचे शंभराहून जास्त प्रकार[2] आढळतात, त्यापैकी बहुतेक प्रकारच्या कागदांवर विशेषतः पेशवाईतील राजकारणी पत्रांवर ती तात्पुरत्या महत्त्वाची समजली जात असल्याने कालाचा पूर्ण निर्देश प्रायः नसतो. कधी रजब ६ तर कधी माघ वद्य ११ असे अपुरे कालनिर्देश असतात. कधी कालनिर्देश अजिबात नसतो. त्यामुळे अशा पत्रांचा काळ ठरविणे अतिशय जिकीरीचे होते. तेव्हा मोडी पत्र वाचणे, त्याचा प्रकार ठरविणे, तारीख लावणे, इत्यादी अडचणी ह्या दप्तरांतील कागदांचे कॅटलॉगिंग करताना येतात.

गेल्या शतकाच्या अखेरीस रा. ब. ग. चिं. वाड यांनी विशेष मेहनत घेऊन मोठ्या खटपटीने सातारकर महाराज व पेशवे ह्यांच्या रोजनिशीतील निवडक उतारे नकलून प्रत्येक कलमाचा इंग्रजी सारांश लिहून ते कागद लिहून काढले. क्रमवार, सालवार लाविले. कठिण शब्दांचा कोश तयार केला. सर्व कागद पेशवेवार, सालवार व विषयवार लाविले. त्याचे एकंदर खंड १५. डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, या संस्थेने छापून प्रसिद्ध केले. या खंडास न्यायमूर्ती म. गो. रानडे यांनी प्रस्तावना लिहिलेली प्रसिद्ध आहे.[3]

हे दप्तर इतिहासाभ्यासूंस खुले करावे अशी खटपट हिस्टॉरिकल रेकॉर्ड कमिशन द्वारा सर जदुनाथ सरकार यांनी केली. त्यास यश येऊन त्या वेळच्या मुंबई सरकारने हे काम रियासतकार डॉ. गो. स. सरदेसाई यांजवर सोपविले. सरदेसाईंनी आपल्या

---

[1] A. M. T. Jackson, I.C.S.: सन १९१० साली ह्या प्राच्यविद्या पंडिताचा नाशिक येथे कलेक्टर असताना खून झाला.

[2] राजवाडे यांनी कागदांचे ७८ प्रकार सांगितले आहेत. पहा: भा. इ. सं. म. अहवाल शके १८३२, पृ. ६५—६७.

[3] राजवाडे, म. इ. सा. खं. २.

मदतीस चार इतिहास संशोधक घेऊन सन १९२९ ते १९३३ ह्या कालात पेशवे दप्तरात बसून सपाटून काम करून मराठ्यांच्या राजकीय उलाढाल्या सांगणारे कागद निवडले. त्यांच्या नकला करविल्या, तारखा ठरविल्या आणि ते ४६ खंडांत छापून काढिले. त्यामुळे ह्या दप्तराचे महत्त्व इतिहासाभ्यासूंच्या नजरेत जास्तच भरले. तेव्हापासून आपल्या ऐच्छिक विषयावरील कागदपत्र अभ्यासण्याकरिता अनेक इतिहास संशोधक ह्या दप्तरांत जाऊ लागले. पण कागदपत्रांवर क्रमांक घालून पाश्चात्य देशांच्या धर्तीवर आधुनिक तऱ्हेने वर्णनात्मक सूची तयार नसल्यामुळे संशोधकांस आपल्या ऐच्छिक विषयावरील कागद शोधून काढण्यास शेकडो दप्तरे व हजारो कागद पहावे लागतात. त्याकरिता कित्येक महिने सतत खपावे लागते. एवढा कालापव्यय व श्रम करूनही समाधान होण्याजोगे कागद मिळतील असेही नाही. ही शोचनीय परिस्थिती इतिहासाभ्यासूंनी सरकारच्या वेळोवेळी नजरेस आणिली. तेव्हा मुंबई सरकारने ह्या कामी लक्ष घालण्यास सुरवात केली.

सन १९४० मध्ये हिंदुस्थान सरकारचे कीपर ऑफ रेकॉर्डस् डॉ. सुरेंद्रनाथ सेन ह्यांनी मुंबई सरकारच्या विनंतीनुसार पेशवे दप्तरांतील कागदांची तपासणी केली व अहवाल तयार केला. त्यात कागदपत्रांच्या सूचीकरणाची आवश्यकता सांगितली. रेव्हेन्यु खात्याने हा त्यांचा बारापानी विस्तृत अहवाल आपल्या जा. क्र. ए. एल. ओ. ५८-१९५३१५-ए-१, दिनांक ११ डिसेंबर १९५८ च्या पत्रासोबत पुण्याचे सेटलमेंट कमिश्नर व डायरेक्टर ऑफ लॅण्ड रेकॉर्डस् यांजकडे पाठविला. पुढील वर्षी अन्यक्रामण कार्यालय सल्लागार समितीने आपल्या दिनांक १३ ऑगस्ट १९५९ च्या बैठकीत कागदपत्रांचे सूचीकरण करण्याबाबतचा ठराव मंजूर केला. तसेच भारत सरकारने नियुक्त केलेल्या रिसर्च ॲण्ड पब्लिकेशन कमिटीने नवी दिल्ली येथे दिनांक ८ जुलै १९६० रोजी भरलेल्या बैठकीत "राज्य सरकारांनी आपापल्या दप्तरखान्यांतील कागदपत्रांच्या वर्णनात्मक सूची तयार करवून घेऊन त्या प्रसिद्ध कराव्या व या कामास प्राधान्य द्यावे" अशी शिफारस ठराव क्रमांक ९-अ ने केली.

या सर्व सूचना लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेख विभागातील सहायक संचालक श्री. वि. गो. खोबरेकर यांनी पेशवे दप्तरातील ऐतिहासिक कागदपत्रांच्या वर्णनात्मक सूचीकरणाबाबत एक योजना तयार करून संचालक, पुराभिलेख विभाग, ह्यांस त्यांच्या इच्छेनुसार सादर केली. त्या योजनेतील मुख्य उद्देश असे—

(१) प्रत्येक कागदास क्रमांक दिल्यामुळे त्या कागदांचे स्थान निश्चित होऊन त्यामुळे अभ्यासार्थ वा शासकीय उपयोगाकरिता ज्या दप्तरांतून तो कागद काढला असेल त्याच ठिकाणी तो परत ठेवला जाईल.

(२) कागदांचे सूचीकरण होईल.

(३) जीर्ण किंवा फाटलेले कागद दुरुस्त केले जातील.

(४) सर्व रुमालांची साफसफाई होईल.

(५) रुमालांची अद्यावत् पद्धतीने पुनर्रचना होईल.

त्यावेळचे पुराभिलेख विभागाचे संचालक डॉ. पु. म. जोशी ह्यांना ह्या योजनेची उपयुक्तता पटून त्यांनी ती कार्यान्वित करण्याचे ठरविले. शासनाकडून काही सेवकवर्ग मागून घेतला व अशा रीतीने पेशवे दप्तरांतील कागदांचे सूचीकरण करण्यास जुलै १९६१ पासून सुरवात झाली.

सूचीकरणपूर्व संस्कार.—वर्णनात्मक सूचीकरण करण्यास सुरवात करण्यापूर्वीची कागदपत्रांची स्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे. पेशवे दप्तरांतील मोडी कागदपत्रे प्रायः पुडक्यांत बांधलेली आढळतात. प्रत्येक पुडक्यात साधारणतः १०० ते १५० कागद असतात. अशी २० ते ५० पुडकी एका रुमालात बांधून ठेवलेली असतात. म्हणजे प्रत्येक रुमालात सरासरी एक ते दीड हजार कागद असतात. हे कागद अनेकदा हाताळले गेल्यामुळे चुरगळलेले, फाटलेले, दुमटलेले, अस्ताव्यस्त स्थितीत असलेले असे सापडतात.

अशा कागदपत्रांचे रुमाल सूची करण्यास घेण्यापूर्वी त्यातील कृमी, वाळवी, जंतू वगैरेचा नाश होण्यासाठी ते फ्युमिगेशन चेंबरमध्ये ठेवावे लागतात. आठ दिवसांनी हे कागद बाहेर काढल्यावर प्रत्येक कागद दोन्ही बाजूंनी साफ केला जातो. याप्रमाणे रुमालातील सर्व कागद साफ केल्यावर प्रत्येक पुडक्यातील कागद शक्यतो तारीखवार, सालवार व शक्य झाल्यास विषयवार लाविले जातात. हे काम करीत असताना रुमालातील वाळवी लागलेले, फाटलेले अथवा एकमेकास चिकटलेले कागद बाजूस काढून ते दुरुस्तीसाठी दिले जातात व त्यांची नोंद एका स्वतंत्र वहीत ठेवतात. हे कागद दुरुस्ती होऊन आल्यावर ते पूर्वी जिथे होते त्या ठिकाणी ठेवण्यात येतात.

सूचीकरण—सूची तयार करताना शाहू दप्तरामधील कागदपत्रे विषयानुरोधाने व कालानुक्रमाने जुळविण्याचा कसोशीने प्रयत्न केलेला आहे. प्रत्येक कागदास पृथक क्रमांक देऊन ते कागद कालानुक्रमाने विषयवार, वेगवेगळ्या लहान पुडक्यात (तबलखात) ठेवले आहेत. अशा अनेक लहान पुडक्यांचे (तबलखांचे) एक मोठे (हातात धरण्यास सोयीचे असे) पुडके तयार करून अशा प्रत्येक पुडक्याच्या वेष्ठनावर त्या पुडक्याचा रुमालातील अनुक्रम नंबर, त्यात ठेवलेल्या पत्रांचे सुरवातीचा व शेवटचा असे दोन क्रमांक दर्शविले असून एकूण पत्रसंख्याही दर्शविली आहे. पुडक्यातील पत्रे ज्या विषयासंबंधी व ज्या कालमर्यादेतील असतात ते विषय व ती कालमर्यादा यांचा उल्लेख वेष्ठनावर केलेला आहे.

सामान्यतः एकाच विषयासंबंधित कागदपत्रांची पुडकी एका रुमालात ठेवलेली असून या रुमालातील पुडक्यांची व कागदपत्रांची संख्या व ज्या विषयासंबंधी व ज्या कालमर्यादेतील ते कागदपत्र असतात ते विषय व त्या कालमर्यादा यांची नावे दर्शविणारी चिठी प्रत्येक रुमालावर लाविलेली आहे.

शाहू दप्तरातील सूची प्रत्येक कागदातील विषयास प्राधान्य देऊन केलेली आहे. सूची करण्यासाठी प्रत्येक पुडक्यातील कागदपत्रांचा संग्रह हा स्वयंपूर्ण असा कल्पिला आहे. प्रत्येक पुडक्यातील कागदपत्रांच्या सूचीच्या सुरुवातीस अग्रभागी तत्संबंधित रुमाल व पुडके यांचे क्रमांक, पत्रांचे क्रमांक व त्यांची संख्या, कालमर्यादा यांचे उल्लेख केलेले आहेत.

सूची करताना पत्रातील मजकुराच्या सारांशाची नोंद करून तिच्यापुढे त्या पत्राचा क्रमांक कंसात लिहिला आहे. एकाहून अनेक पत्रांतील मजकुराचे सारांश पूर्णपणे एकाच स्वरूपाचे असतील तर सुरवातीच्या पत्रांतील सारांश लिहून त्यापुढे त्या पत्राचा क्रमांक कंसामध्ये घातला आहे व बाकीच्या पत्रांचे क्रमांक हे त्यापुढे वेगवेगळ्या कंसांत अनुक्रमे घातलेले आहेत. चार अथवा चारांहून अनेक स्थाने व्यापणाऱ्या क्रमांकाचे बाबतीत फक्त एकं ते शतं स्थानापर्यंतचेच अंक सूचीत योजिलेले आहेत. क्रमांक देताना भिन्न शतक आल्यास त्या ठिकाणी संपूर्ण क्रमांक दिलेला आहे. प्रत्येक विषय शीर्षकाच्या सुरवातीच्या नोंदीपुढील क्रमांक संपूर्ण दिलेला आहे. पेशवाईतील पत्रांचे राज्यकारभारविषयक पत्रे, व्यावहारिक कारभाराची पत्रे व खाजगी पत्रे असे तीन मुख्य प्रकार. पहिल्या व दुसऱ्या प्रकारातील तहनामे, करार, कानून, खंडणीपत्रे, आज्ञापत्रे, दस्तके, सनदा पत्रे, रोखे

आदी कागदांवरून शिर्षके देता येतात. बाकीच्या कागदपत्रांस त्यांतील विषयांवरून शीर्षके दिलेली आढळतील. इतिहासाचार्य राजवाडे यांनी ऐतिहासिक कागदांचे एकूण ७८ प्रकार सांगितले असल्याचे वर उल्लेखिलेले आहेच. पण शाहू दप्तर सूची करताना ७८ हून आणखी प्रकार आढळले तो प्रकार शीर्षक म्हणून घेऊन मजकुराच्या सुरवातीस दर्शविला आहे. सूची करताना अशा नोंदी वेगवेगळ्या शीर्षकांखाली घेतलेल्या आहेत. एकाच कागदपत्रात भिन्न भिन्न विषयांसंबंधी एकाहून अनेक नोंदी असल्यास त्या नोंदींचा सारांश त्या त्या विषयाखाली लिहून प्रत्येक वेळी त्या विशिष्ट कागदाचा क्रमांक दर्शविला आहे.

शाहू दप्तरातील कागदपत्रांचा विषय.—शाहू दप्तरामधील कागदपत्रे अनेक विषयांसंबंधी व अनेक स्वरूपाची आहेत. पहिल्या क्रमांक १ ते ९ व ४९ या दप्तरांमध्ये रोजकीर्दी आहेत. रोजकीर्दीच्या प्रारंभी 'राजमंडळाची हुजूर रोजकीर्द' असे शीर्षक दृष्टोत्पत्तीस येते. यात रोजकीर्दी, चिटणिशी पत्रे, दस्तके, तलब, नेमणुका संबंधीची पत्रे येतात. तसेच त्यात राजकारण, समाज व्यवस्था, न्याय, इत्यादी संबंधात छत्रपतींच्या नावाने दिलेले हुकूम व दस्तके, सनदापत्रे, निवाडे, ताकीदपत्रे, अभयपत्रे, आदी प्रकारही येतात.

राज्यातील उत्पन्न दाखविणारे कागद रुमाल क्रमांक २६ ते ३४ व ४७ यांत सांपडतात. यामध्ये कारकुनांच्या अकारविल्हे याद्या, त्यांचे तैनात वेतन यांच्या खतावण्याही आहेत. उत्पन्न दाखविणारे जे कागद मिळतात त्यांत बऱ्याच वेळा सरंजामाचा मुलूख व कमाविशीचा मुलूख असे भाग केलेले आढळतात. सरंजामाचे महाल हे मुख्यत्वे सरंजामदारांच्या अधिकाराखाली असत. त्या महालाच्या अंतर्गत बाबतीत सरकार फारसे लक्ष घालीत नसे. बहुतेक वेळा हे महाल मराठी राज्यातील होत. पण यातील उत्पन्न सरंजामाप्रीत्यर्थ खर्ची दिलेले असे. या उलट कमाविशीचे महाल उत्पन्नाच्या दृष्टीने सरकारचे होत. यातील सर्व उत्पन्नाची विल्हेवाट सरकार स्वतः जातीने लावताना दिसते. स्वराज्य प्रदेश व त्या बाहेरील छत्रपतींचे हक्क व हितसंबंध असलेला मोगलाई प्रदेश यातील परगणे, गावे व इतर हक्क यांची वहिवाट व कारभार कोणाकोणा सरदाराकडे व केव्हा नेमून दिला यासंबंधीच्या नोंदी संबंधित कागदांवर क्रमवार लिहिलेल्या आढळून येतात. त्यांत बरेचसे कागद मोंगलाई मुलुखातील कमाविशीच्या वसुलाचे काम त्या काळी कसे चालत असे हे दाखवितात. इनाम दिलेल्या जमिनीसंबंधीच्या नोंदी गाववार व नाववार केलेल्या आढळतात. अशा स्वरूपाच्या कागदांना गाव व महाल खतावण्या असे म्हणतात. छत्रपतींनी बहुतेक सरदारांना व कमाविसदारांना जे मोकासे व महाल-मोकासे दिले त्यांची माहिती व त्यांच्या नोंदी या रुमालांत भरपूर आहेत. स्वराज्यातील प्रत्येक गावाची व स्वराज्याबाहेरील प्रत्येक परगण्याची व काही थोड्या गावांची वहिवाट कोणाकडे व किती काल होती यासंबंधीची बिनचूक माहिती या कागदांवरून मिळते.

रुमाल क्रमांक १३ ते २५, ३६, ४२ व ४७ यांतील कागदांवरून पुढील माहिती मिळते: छत्रपतींचे अधिकारी, कारखान्यावरील लोक, पोतनीस, पारसनीस, वाकनीस इत्यादी दरकदार, सेवक मंडळी, शिलेदार, राजमंडळचे सेनाधिकारी, फौजी सरदार, त्यांच्या दिमतीतील पथके व त्यांचा मुशाहिरा व तो भागविण्याकरिता परगणे, गावे व जमिनी यांचे दिवाणी वसूल पूर्वी नेमून दिलेले असत. अशा नेमणुकास सरंजाम असे नाव कागदपत्रांत दिसते. चिटणिसाची नेमणूक, तिजोरीतून जाणारे वेतन व परभारे मुलखातून दिले जाणारे वेतन यांची विभागणी व व्यवस्था यांच्या नोंदी स्वराज्यातील किल्ल्यांवरील

शिबंदी, दारुगोळा, गल्ला यासाठी येणारा खर्च भागविण्याकरिता राज्यातील काही गावांचे दिवाणी वसूल नेमून दिलेले असत. याही नेमणुकांना सरंजाम असेच म्हणतात. नूतन सरंजाम देणे, तत्संबंधी ताकीदपत्रे देणे, सरंजाम दूर करणे, इत्यादी संबंधीचा पत्रव्यवहार यात दृष्टोत्पत्तीस येतो.

रुमाल क्रमांक ३५, ४५, ४६, ४७ यांत मराठी राज्यकारभारातील आर्थिक व्यवहार व मालकी व्यवहारासंबंधीच्या नोंदी येतात. निरनिराळ्या पातळीवर दिसणाऱ्या उत्पन्नाच्या व खर्चाच्या बाबी एकमेकापासून स्पष्टपणे अलग अलग करता येत नाहीत, हे खरे असले तरीही हिशेबातील व्यवहार व त्याचा तपशील हचा कागदांचा अभ्यास केल्यास सांपडतो. या कागदांतून वारंवार येणाऱ्या विविध तऱ्हेच्या कागदांचे काही प्रकार असे—

(१) जमीन झाडा—यात जमिनींचे प्रकार, त्यांची मोजणी व आकारणी दिलेली आढळते. प्रांत हिंदुस्थान व याव्यतिरिक्त सर्व प्रांतांच्या कागदपत्रांत या प्रकारचे कागद आढळतात.

(२) थलझाडा—यात जमिनींचे संबंधातील व्यक्तींची नावे, त्या जमिनींची मोजणी व दर्जा दिलेला मिळतो. हे कागद प्रांत हिंदुस्थान व प्रांत कर्नाटक याव्यतिरिक्त इतर सर्व प्रांतांत आढळतात.

(३) कुलारग—शेतकरी व इतरांची यादी व प्रत्येकाचा खातेउतारा या कागदांत आढळतो. हिंदुस्थान प्रांताखेरीज इतर कागदांत असे कागद मिळतात.

(४) हिशेब झडती—विविध प्रकारच्या जमेच्या बाबी व हिशेब पूर्ण केला तेवढचा कालावधीतील जमा झालेल्या व येणे राहिलेल्यांचा तपशील या कागदांतून मिळतो.

खर्चाच्या व उत्पन्नाच्या बाबींचे काही शब्द व संज्ञा यांचा अर्थ—

१. नख्त=पैसा.

२. गला=धान्य.

३. सिवाये जमा=जमीन महसुलीच्या व्यतिरिक्त इतर प्रकारचे उत्पन्न.

४. कमाविस=चोऱ्यामाऱ्या, गैरवर्तन व सरकारच्या कामात दिरंगाई केल्याबद्दल शिक्षा, या स्वरूपात जमा केलेले हे उत्पन्न व एकंदर झालेली वसुली.

सामान्यतः ज्या व्यक्तीकडे जे खाते अथवा प्रांतिक कारभार होता त्याच व्यक्तीच्या नावाने तो कारभार होत असे. स्वराज्यातील प्रांतिक सरकारे स्वराज्याबाहेरील मोगली मुलुखावर असलेल्या हक्क व हितसंबंधाचा प्रांतपरत्वे कारभार ज्यांचेकडे सोपविला असेल असे घटक अधिकारी व सेना विभागातील प्रमुख सरजामी सरदार यांच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या सर्व आर्थिक व मुलकी व्यवहार संबंधित नोंदी पृथकपणे त्यांच्या त्यांच्या नावाखाली एकत्र घेतलेल्या दिसतात. हे राजमंडळाचे कागद असून यास बोटखते असे म्हणतात.

दिवाणी व फौजदारी कायद्यांची अंमलबजावणी करणारे कागद जे सरकारची निकाडापत्रे म्हणून प्रसिध्द आहेत ते रुमाल क्रमांक ९, १०, ३७ मध्ये प्रामुख्याने दिसून येतात दिवाणी कज्जे मुख्यतः वतन, दत्तक, वांटणी, भागिदारी, हद्द, सामाजिक हितसंबंध, धार्मिक हक्क इत्यादी संबंधाने असत. या प्रकरणी हुजूरकडून निवाडे दिले जात असत. मोठमोठ्या

दिवाणी कज्ज्यात जे निकाल होत ते मुख्य सरकारकडे जाऊन त्यास हुजूरची मंजुरी मिळाल्यानंतर त्याचा अंमल होई. या निवाडचांचे कामात शिवकालीन व क्वचित् प्रसंगी तत्पूर्वकालीन संबंधित संदर्भाचे तपशीलवार उल्लेख दिलेले सापडतात. त्यावरून तत्कालीन महत्त्वाची माहिती मिळू शकते व न्याय पद्धतीचाहि बोध होतो.

मराठा साम्राज्यात देवस्थान, वर्षासने व इनामे, अग्रहार इत्यादी देणग्या समाजातील अनेक भिन्न भिन्न वर्गाच्या, जातीच्या, धर्माच्या लोकांना दिलेल्या असत. तत्संबंधी कागदपत्रांचे भिन्न भिन्न वर्ग, जाती व धर्म यांना अनुसरून वर्गीकरण केलेले आहे. हे राजमंडळाचे कागद असून इनाम, देणगी धारण करणाराचे नाव, गाव इनाम देण्याचे कारण, इनामाचे ठिकाण व त्याचे स्वरूप यांची नोंद केलेली त्यांत आढळून येते. तसेच इनामे चालू ठेवणे, वारसाकडे चालविणे अथवा दूर करणे यासंबंधींच्या नोंदीही अनुक्रमाने त्याच कागदावर केलेल्या आढळतात. अशा प्रकारचे कागद रुमाल क्रमांक ९, ११, १२, ३७ यामध्ये आहेत.

छत्रपतींकडून नूतन इनाम गाव कोणास दिला, त्याची पत्रे व वतनपत्रे, मोकासेगत तैनातेस जमीन वगैरे दिली त्याची पत्रे, नवा अंमलदार, कमाविस वगैरेच्या सनदा, कदीम इनाम, वतन, वर्षासन भोगवटचाची पत्रे ही सर्व मजमू दप्तरांतून होत असत. वरील संबंधात दाद लावून घेण्यासाठी त्या त्या संबंधित व्यक्तीला हुजूरकडे विनंतीवजा अर्जी करावी लागे. अशा पत्रांच्या प्रारंभी त्यांची यादी म्हणून नामोल्लेख केलेला आढळतो व त्यातील विनंती मान्य झाल्याचे चिन्ह म्हणजे त्याचे शेवटचे 'देणे' अशी अक्षरे संबंधित अधिकारी यांनी लिहिलेली आढळतात. या यादींना 'रसानगी यादी' असे नाव असून त्यांच्या आधारावर सनदापत्रे लिहिली जात असत. अशा 'रसानगी' याद्या रुमाल क्रमांक ३५, ३९, ४०, ४२, ४९, ५०, ५१ मध्ये आहेत. छत्रपतींच्या प्रधानांनी म्हणजे पेशवा, मुजुमदार, सुरनीस, वाकनीस, सचिव आदींनी अथवा इतर राजमंडळाच्या लोकांनी दिलेली इनामे छत्रपतींच्या राजपत्रांनी मान्य करवून घेण्यासाठी मूळ देणगीदारांच्या सनदापत्रांचा रसानगी यादीत उल्लेख करून सोबत त्यांच्या नकला जोडीत असत. असे कागद रुमाल क्रमांक ४८ व ५५ मध्ये राखिलेले आहेत. अष्टप्रधानांपैकी अमात्य यांना त्यांची कामगिरी, फडणिशी, चिटणिशी, पत्रांवर निशाण करणे, छत्रपतींच्या तोंडी खास परवानगीवरून राजपत्रे लिहिणे, राजपत्रे, सनदा इत्यादी मध्ये दुरुस्ती करणे, मसाले चिठ्या, वराता लिहिणे वगैरे ही कामे करून घेण्यासाठी राजमंडळाचे संबंधित अधिकारी मजमू (अमात्य) दप्तरला चिठ्या पाठवून कळवीत असत. हचा चिठ्या रुमाल क्रमांक ४१, ५० मध्ये आहेत.

तसेच हुजूरच्या खर्चासाठी व्यापाऱ्यांकडून जिनसा आणल्या जात. त्यासाठी व्यापाऱ्यांकडे अधिकृत चिठ्या (मोर्तब उठविलेल्या) पाठवीत असत. त्या रसानगी चिठ्या रुमाल क्रमांक ४१, ४२, ५३ मध्ये आहेत.

मराठेशाहीत हुजूरपागा म्हणजे छत्रपतींचे घोडदळ हे नेहमी सुसज्ज असे. शिवाय युद्धप्रसंगी शिलेदार आपआपले घोडे घेऊन हजर असत. त्यामुळे हुजूरच्या घोडदळांची संख्या बरीच मोठी होती असे मानले जाई. पण प्रत्यक्षात वस्तुस्थिती निराळी होती हे हुजूरच्या घोडस्वारांचा व घोडचांच्या खर्चाचा तपशीलवार हिशोब, घोडचांच्या व स्वारांच्या नावनिशा, गणत्या, हाजिऱ्या, पगार वाटण्या इत्यादी संबंधी कागदपत्र रुमाल क्रमांक ९ व ३८ मध्ये आहेत हचावरून दिसते. जासुदांच्या हजेऱ्यासंबंधी कागद व जामदारखाना, पोता इत्यादी संबंधी हिशेब, जिनसा जमा झाल्याची आयपत्रे वगैरे कागद रुमाल क्रमांक ९, ३८, ४४, ४७, ४७-अ, ४९, ५३, ५५ मध्ये आहेत.

छत्रपती, मातुश्री आईसाहेब (ताराबाईसाहेब) प्रधान मंडळी व इतर कारकून लोक यांना आलेली काही पत्रे शाहू दप्तरात आहेत. तसेच छत्रपती व मातुश्री आईसाहेब यांनी पाठविलेले रोखे (शिक्के नसलेली पत्रे) व इतरही खाजगत मजकुराची पत्रे व चिठ्या हया दप्तरात आहेत. अशी पत्रे विशेषतः मुलकी व इतर कारभारासंबंधीची असून ती रुमाल क्रमांक ३५, ३७, ४८, ५१, ५२ व ५३ मध्ये आहेत.

याशिवाय हुजूर खासगीकडील महालाच्या खासगी वतनाच्या कमाविशा यासंबंधी कागदपत्र रुमाल क्रमांक ३५, ३७, ४७ व ४८ यांत असून जामीन कतबे, कबजे, जाबते, निरख, करार वगैरे दस्तऐवजी कागद रुमाल क्रमांक ३८, ४७ व ४९ मध्ये ठेवलेले आहेत. गावांच्या व महालांचे झाडे तसेच कापडाच्या व जिनसांच्या व इतर यादी, गावागावांचे वसुलासंबंधी व इतर हिशेब वगैरे कागद रुमाल क्रमांक ३४, ३५, ३७, ३८, ४२, ४३, ४९, ५२, ५३ व ५४ यांत आहेत.

छत्रपतींच्या राज्यकारभारातील अष्टप्रधान, पदाधिकारी, सरदार, हशम इत्यादीच्या यादी व इतर काही कागद रुमाल ५६ मध्ये आहेत. अधुरे व फाटके कागद तसेच मुखपत्रे, आवर्जे इत्यादी रुमाल क्रमांक ५४ मध्ये सापडतील.

ही सूची वर्णनात्मक असावी हा हेतू मनात ठेवून मराठी पत्रात पत्रलेखक जे अनेक विषय हाताळतो, त्या प्रत्येक विषयाचा सारांश शक्यतो एका ओळीत घेऊन त्याच्या चिठ्या त्या त्या विषयाच्या शीर्षकाखाली मांडल्या आहेत. त्यामुळे काही ठिकाणी एकच क्रमांक अनेक ठिकाणी दृष्टोत्पत्तीस येतो. तसेच प्रत्येक पत्राची तारीख ठरविणे हे एक महाकठीण काम कालापव्ययाचे तसेच दर्दी संशोधकाचे ! सुरवातीस दोन नवे सहायक व त्यांना समजावून देणारा एक संशोधन सहायक अशा तीन माणसांच्या मदतीने हे सूचीचे काम सुरू केले. पुढे दोन वर्षांनी हया संशोधनात अनभिज्ञ अशा दोन सेवकांची मदत मिळाली म्हणून हे दिसते त्या स्थितीतले काम डिसेंबर १९६४ अखेर पूर्ण करू शकलो. त्यातील उणीवांची जाणीव इतरांपेक्षा प्रस्तुत संपादकास जास्त आहे. कारण त्यास कॅटलॉग करण्याच्या मार्गात ज्या अनेक अडचणी आल्या त्यांशी मुकाबला करावा लागला. पण शेवटी कॅटलॉग पूर्ण झाला, हे मोठे समाधान मानून हयातील उणीवा पुढील कॅटलॉगमध्ये दृग्गोचर होऊ नयेत हयाची काळजी घेतली आहे. हया कॅटलॉगनंतर "पुढील संशोधनासाठी निवडलेले कागद" हया विभागाचा कॅटलॉग तयार केला असून त्यातील कागदांच्या तारखा काढल्या आहेत व सारांशही सुधारला आहे तो प्रेससाठी तयार आहे.

हा कॅटलॉग करणारे अन्यक्रामण कार्यालयातील मदतनीस व हयाची मुद्रिते बारकाव्याने तपासणारे व सूची तयार करणारे संशोधन शाखेतील सर्व सहायक हयांचा मी आभारी आहे.

२९-४-१९६९. वि. गो. खोबरेकर.

शाहू दप्तर सूचि

दप्तर अंक १

पुडकें क्र. १ ते १६

पुडकें क्र. १

का. सं. १–३ (३), सु. ११०४, इ. स. १७०३–४.

अमात्यपद— परशराम त्रिबक (२).

सरंजाम— सयाजी जगताप, कृष्णराव शिर्के व आनंदराव सणस (१); बासप्रभू देसाई (३).

पुडकें क्र. २

का. सं. ४–८ (५), सु. १११०, इ. स. १७०९–१०.

इनामें— बाबाजी लक्ष्मण, खंडो भगवंत, नाग जोसी, गोपाळ जोसी, तानाजी पांढरे, शेखमिरा (५); महादेव जोशी, योगेश्वर भैरव व वैजनाथ जोशी (८).

जमेनिसी— कृष्णाजी प्रभू यास सिदोजी निम्बाळकरची (७).

जाबता— सुभानजी पारटा याचे मालियतीचा (४).

मोकासा— आनंदराव रघुनाथ (५); मोंगलांकडील जहागिरदार (६).

पुडकें क्र. ३

का. सं. ९-१० (२), सु. १११९, इ. स. १७१०-११.

याद्या— वेतन दिलेल्या जासुदांच्या (९, १०).

पुडकें क्र. ४

का. सं. ११–२२ (१२), सु. १११३, इ. स. १७१२-१३.

ताकीदपत्रें— संताजी जाधव यास दिलेल्या सरदेशमुखीच्या वतनाबाबत रामजी पवार व कालोजी, हुजरात ठाणें, पाली इत्यादींना, भानसेट सेटचास खरेदी गल्ल्याबद्दल दिलेल्या पैशासंबंधी (११); मानसिंग मोरे यास बळजबरीने मुकाश्याचा वसूल घेतल्याबद्दल (१२); वाईच्या मोकदमास सरदेशमुखी वसुलासंबंधी (१७).

निवाडपत्र— रघुनाथ भट नरहरी भट, व आपदे भट नरसीभट यांच्या वतनासंबंधी (२०).

पत्रें— कारखानदारास ऐवज देण्याबद्दल नीळकंठ बलाल यास (१८); माणको त्रिबक धायगुडेचे कुलकर्ण वतनाबद्दल, दादसेटी सोनार व तुकोजी यादव यांच्या स्त्रिया महिमतगडी सापडल्या त्या हुजूर पाठविणे म्हणून विठोजी सिर्के यास (२२).

यादी— शेतें दिली त्या लोकांची (१४).

वेतनें— पिलाजी जाधवच्या जथ्यास (१३); हुजूर आणविलेल्या कामगारांना (१५); यादव परभू व भवानदास हरकारे यांना (१६).

सनदा— रायाजी विठल (१९); तुलाजी लाटकर बारगीर (२१).

दप्तर अंक १

पुडकें क्र. ५

का. सं. २३–६२ (४०), सु. १११५, इ. स. १७१४-१५.

इनामें— झोटिंगराव तमाजी, मीर नबी (२४); चापाजी रामजी गायकवाड (२९); बापूजीपंत यांची स्त्री लक्ष्मीबाई (३६).

करार— किल्यांकडील तनख्याचा (३६).

गुमास्तेगिरी– नरसो लिंगदेव यास प्रतापगड बारगिरांच्या बक्षीची (५७).

चिठी— (५४).

जमेनिसी— केसो रंगनाथ यास (२४).

ताकीदपत्रें— देवजी सोमवंशी व नाईकजी कडू यांच्या सरंजामाची (३१).

पत्रें— रुस्तुमराव व लुयाजी पांढरे यास हुजूर येण्याबद्दल (२८); सुधागडी टांकसाळ घातल्याबाबत कृष्णाजी जाधव यास (३६); सटवोजी निंबाळकराचे मुकासेबाबत व महादजी कृष्णाचे कर्जाबद्दल (३७); आपदेवभट गुळवणी याच्या इनामाबद्दल जमीदारांस (४२); बाळंभट पुराणिक याच्या इनामाबाबत (४५); बावाजी मोराजी लावघरे यांच्या वतन वादासंबंधी (४६); रायाजी व विठोजी घारे, कृष्णाजी व खंडेराव दाभाडे यांच्या इनामांबद्दल (५५); बुवाजी व दुर्गाजी पाटील येवले यांच्या साहित्याबद्दल (५६); बाबदेवभट व सदाशिवभट गिजरे यांच्या ज्योतिषपणाबाबत जमीदार वगैरेंना (५९–६२).

बक्षीस— केसो नीळकंठ यास घोडा (३०).

मजमू— रामाजी खंडेराव यास सेखोजी थोराताची (२४).

मोकासे— यादवराव पिलाजी मुनशी (३७); कान्होजी, विठोजी, दौलतराव शिर्के आणि मल्हार खंडेराव (४३).

वतनपत्रें— खंडोजी दाभाडे यास मोकदमीचें (२६–२७); बाभुलगांवचे खराडे यांस (४७–५१).

वृतिपत्रें— नारायणभट व गोपाळभट गिजरे यांस ज्योतिष कुलकर्णपणाचे (३९–४१).

वेतनें— जासूद (२३); कामगार (३२, ३३); मलीकजी (३८); कान्होजी आंग्रे याला आणावयास पाठविलेले हुजरे (५२–५३).

सनदा— मल्हारजी पोळ (२४); सिदोजी दळवी, हरबाजी टकले, सिदोजी सालोंखी, कमलोजी कडके (३४–३५).

सरंजाम— नाईकजी कडू (२५).

पुडकें क्र. ६

का. सं. ६३–१०० (३८), सु. १११४, इ. स. १७१३-१४.

इनाम जमिनी–बहिरो कासी (६९), (८२); खंडोजी व बहिरजी दळवी यास चिखली येथें (७७); शाबाजी भोसले (७९); संभाजी हंबीरराव यास जमीन व मोकासा (८३); दमाजी निंबाळकर, कृष्णाजी नाईक व अमरसिंग (९९).

चिठ्या— वेंकाजी भास्करकडून ठेवीचा पैका आणणाऱ्या जासुदास (८४); जासुदांन (९८).

ताकीदरोखा– उधो श्रीपत यास लावणी ऐवज देण्याबाबत सिदोजी पोळ यास (७८).

पत्रें— पंतप्रधान, मानसिंग मोरे व सुलतानजी निंबाळकर, पंताजी शिवदेव यांना हुजूर येण्याबद्दल, होनाजी जाधवाची बटिक परत देण्यासंबंधी संताजी मोहितेस, किल्यांवरील कुणबिणी पाठविणेबाबत वारूगड, प्रतापगड, चंदनगड इत्यादि किल्यांस (७०); बालजी सामराज याच्या शेतासंबंधी मोकदमास, प्रतापजी भोसले यांनी बंदुका आणल्याबाबत, दोनशे टाक्या हुजूर पाठविण्याबद्दल अनाजी नारायण यास (८३); शहाजी व वणगोजी निंबाळकर, सोमाजी जगताप व माने यांना नतिजा देण्याबाबत

दप्तर अंक १

पुडकें क्र. ६—चालू

सरदारांना (८७); रामचंद्र गौड याजकडे जकाती देण्याबाबत जमीदारास (८९); गौतमगिरी गोसावी याचे कर्ज देण्याबद्दल पिसाळ यास (९०); त्रिंबकराव धायगुडे यास जमावासह येण्याबद्दल (९२); देवाजी गुंडो यास दरुणीमहालाकडील मुकासा हिशेब घेऊन येण्याबद्दल, प्रभाकरभट घारे यास हुजूर पाठविणे म्हणून विठोजी सिरके यास (९५); बाळाजी पंडित प्रधान व नारो पंडित सचीव यांना ऐवज हुजूरी पाठविण्याबद्दल (९६); खासबारदाराकडून सरदेशमुखी न घेण्याबाबत जोत्याजी केसरकर यास (९९).

मोकासा— शामजी बल्लाळ प्रभू यास जमाव बेगमीस (९९).

यादी— महाल व सरदार यांची (७२).

वतनपत्रें— गोपाळ विश्वनाथ व बावाजी शंकर यांना कुलकर्णाचे, अंताजी व भिकाजी केसकर यांना देशपांडेपणाचे (६३–६८).

वेतनें— सिदोजी दळवी (६९); जासूद (७३, ९३); तिळगूळ देऊन पाठविलेल्या हुजऱ्यांना (७४); जासूद कालोजी भोसले, कृष्णाजी नाईक याचे कर्ज फेडीसंबंधी पत्रे नेणाऱ्यांना (७७); उद्धव श्रीपत, नारो सामराज (७९); पागेचे लोक (८०); शेख महंमदाकडील लोक (८१); उदाजी वाग हुके बारदार (८३); लबे कामगार (१००).

सनदा— बहिरजी जाधव (७१); शंकराजी अनंत यास जमेनिसीची, मल्हार खंडेराव यास मोकाश्याची (७६); अनाजी नारायण, जोगोजी हुके बारदार (७८); नरसो तमाजी (८५); बालजी भोसले किल्ले सातारा येथील दास्तानाबाबत (९१); सुभाना मांग (९४); आनंदराव बाजी व आपाजी शिंदे (९७).

सरनौबती— केदारजी घाटगे यास वैराटगडची (९९).

हिशेब— तर्फ सौंदलच्या जमेचा (७८).

पुडकें क्र. ७

का. सं. १०१–१०३ (३), सु. १११६, इ. स. १७१५–१६.

हजेऱ्या— सातारा येथील जासुदांच्या (१०१–१०३).

पुडकें क्र. ८

का. सं. १०४–१८४ (८१), सु. १११७, इ. स. १७१६-१७.

आज्ञापत्र— निम्म्या तक्षिमेच्या वसुलाबाबत गडकऱ्यांना तगादा न करण्याबद्दल (१७३).

इनामें— कृष्णाजी नाईक जोशी (१०४); माधवराव परभू, सोनी भोई (१०५); नारो नरसिंह यास सातारा व विशाळगडचे वेढ्यांतील कामगिरीबद्दल (१०६); रायाजी (१०७); महाडिक (१०८); दादजी सिगोजी पवार (१०९–१०); अमरसिंग, बाळ जोशी (११०); आनंदराव रघुनाथ यांस इनाम व त्यांच्या सनदांची यादी (११४–१५); त्रिंबकराव कदम (१३०); श्रीजुगाईस येलवण गांव व कारखान्याकडे येळूर गांव (१३१); बागाजी महाजन (१६२–६३); यादवराव मुनशी, सुभानराव पाटणकर, नारो पंडित सचीव (१७५).

कमाविशी— रामजी लोंढे (१३१); बाळाजी गोजदेव, जिवाजी राम यास सरदेशमुखीची (१५०).

चिठ्या— हुजरात वाईच्या लोकांना (१११–१२), (१५८), (१६०); आपाजी माने, गुजर इत्यादीकडे पाठविलेल्या जासुदांस (१४८), (१५४).

तलब— विठल गोपाळ, सुलतानजी गोळे, मानाजी येरुणकर इत्यादींना (१४७).

दप्तर अंक १

पुडकें क्र. ८—चालू

ताकीदपत्रें— कान्होजी भोसलेकडील मुकासें गावांना (१४१-४२); सेनापतीकडील सरंजामाबाबत महालांस, फडतरच्या कमाविसीबद्दल पिलाजी जाधव, पंतप्रधान वगैरेस (१५५); त्रिंबकराव धायगुडे-कडील मुकाश्याबाबत गावांस (१८४).

दस्तक— सुलतानजी निंबाळकर यास कोठीचे (१७७).

नाइकी— मानसिंग यास (१०५); नागोजी नाईक यास जासुदांची (१०८).

पत्रें— निजामन मुलुक बरोबर भागानगरचा तह करण्याबद्दल चिमाजी राजाज्ञा यास (११३); धीराजी पवार यास हुजूर येण्याबद्दल (११६); संताजी मोरे, जोत्याजी व यमाजी गायकवाड यांच्या शेतास देशमुखी तगादा न करण्याबद्दल संताजी जाधव यास (१८४).

पोतदारी— रामाजी दामोदर यास सेनापतीची (१०६).

फडणिसी— नारो सामराज (१०५).

मजमू— अंताजी केशव (११०).

मोकासे— आनंदराव खासनिवीस (१०५); जगजीवन परशुराम (१०७); कालोजी भोसले (१३०); विचित्रगडाकडे (१३२); सज्जनगडास बाबती व मोकासे (१५९); महादाजी कृष्ण, सुभानजी, कृष्णाजी शंकर (१६२–६३); नारो राम (१७५); खंडेराव दाभाडे (१७८); बसवंतराव (१७९).

मोकासें— त्रिंबकराव धायगुडे (९४५); रघुनाथ उमाजी, चिमणाजी बल्लाळ यास जमावासाठी, लक्ष्मण गोविंद (९८४); सखोजी वागमोडे (९८७–८८); मानाजी मोरे (१००५); बाळाजी खंडेराव (००८); प्रतापराव बहादर (०२६); रायाजी जाधव (०२८); तुकोजी जेठी (०२९); महादाजी गदाधर मौजे आतीत (तर्फ उंबरज, सातारा) (०३५); नारो राम मंत्री (०३९); दिंमत मजमू (०५१); निळो फडणीस, दौलतराव शिर्के (०५५); राघो आण्णाजी यास कमाविसी व मुकासा (०५७).

यादी— कान्होजी आंग्रेकडून आलेल्या जिनसांची (१०२०).

वतनपत्रें— कोंडूजी न्हावी (९४६–४७); कुसाजी प्रभुणे (९६६–७५); आनंदराव पवार (९७७–८०); गंगाजी देकोजी खोमणे, जेजुरी (१००२–०३); बाळाजी चव्हाण (००६); रामजी गाडे (०१०); चांदखान अतार मेहेतर (०२९); दादो मल्हार खीरसागर (क्षीरसागर) यास कुलकर्ण व ज्योतिषपणाचें मौजे विसरे, सेलगांव (पाडगांव तालुका) (०३४); खंडोजी धावडसर यास सरपाटीलकीचें (०४२).

वर्षासन— भट्टाचार्य नाशिककर यांस (९६२).

समाधानपत्रें—तुकोजी गुजर यास फत्तेसिंगाबरोबर चांदे प्रांती जाण्यासंबंधी (१००४); मानसिंग यादव यास (०१०); हुजूर भेटीस येण्यासंबंधी सरदारांना (०४६).

सरंजाम— सुभानजी पारटे (९७६), व अमरसिंग शिर्के (१०००–०३).

दप्तर अंक २

पुडकें क्र. १ ते ४-अ

पुडकें क्र. १

का. सं. १०६२–११४० (७९), सु. ११२६, इ. स. १७२५–२६.

अग्रहार— ब्राह्मणांना रामडोहो हा गांव (१०६२–०८३); व टोकें, प्रवरासंगम (१२१).

अभयपत्र— बाजी काकडे यास (११२२).

अमानत— येसाजी नलगा (रांजणगाव) याची कोलगावची पाटीलकी (१०६२).

आज्ञापत्रें— भगवती भोपे हिला फत्तेसिंगाकडे जाण्याबद्दल (१०६७–०८१).

इनामें— सुभानजी खंडागळे, खंडोजी जगताप (१०६३), बालजी अनंत (०६३-६४, ०७७); भवानीबाई महाडिक (०६६); खंडो बहुधान्य (०६८, ०८५); बयाजी नागनाथ (०७०, ०८५); सोनाजी शिवाजी व राणाई मोहिते (०७२–७३); जिवाजी दादाजी (०७७); गंभीरराव (०८५); मलोजी गाढवे (०८५, १००); अमरसिंग शिर्के (०८८); गिरी गोसावी (०९५); परशुराम (१०१–०२); मोरो सामराज प्रभुणे (१०३, १०८); रामभट बाबदेभट अग्निहोत्री (१२१); नागोजी शिंदे (१२२); विश्वनाथ गोसावी, विश्वनाथभट रघुनाथभट पुरोहित (१२३, १२६); विश्वनाथ जोशी (१२५, १२८), कृष्णेश्वर–सदाशिव पेठ यास गणेशभट अनंतभट सप्रे, कृष्णाजी नीळकंठ (१२६), विठोबा नाईक श्रोत्री, बाबदेव गिजरे (१२७), यशवंत महादेव (१२८); परशराम श्रीनिवास (१३०); रंगाजी गणेश (१३१); मकाजी मोरे (१३२); गोसावी, विठोबा देव–देहू (१३६); मदनसिंग भोसले, रामजी माळी यास (१३८).

करार— आनंदराव काटकर यास गहनगडचा हवाला दिल्यासंबंधीचा (११०७).

चिठ्या— (१०६५, ०८२, ०९२–९३, ०९६, ११०, १२०, १३३, १३५).

जकात करार—खंडोजी भोसले याजबरोबरचा (११२१).

तलब— कोळगांव पाटीलकी कज्याबाबत येसाजी नलगे यास (१०६७); सुभानजी निंबाळकर व गाडेकर यांच्या कज्याबाबत मोकदमांस (०८७).

ताकीदपत्रें—बालोजी पाटील याला मोंगलाकडून दस्त केल्यासंबंधी जमीदारांस (१०७०); खंडो मुकुंदचे वाड्या–विषयी नारो हिरवे यास (०७४); नरहरी रामकडील सरदेशमुखीसंबंधी (०८६).

दस्तकें— हुजूर कोठीचे (१०७२–७३); सुखानंद यांच्या कबिल्यास (०८१); अजमखानचे कबिल्यास (११८); कुसाजी येसाजी यास (१२३).

नेमणुका— जनार्दन हरी व नरसो सामराज यांस धीराजी पवारकडील फडणिशी व सबनिशी (१०८५); गंगाधर कृष्ण यास कंठाजी कदमची जमेनिसी व कृष्णाजी सामराज यास राणोजी भोसलेची सबनिशी (१२३); विसाजी रंगनाथ यास व्यंकटराव नारायण याची मजमू व जमेनिसी (१२४–२५); व खंडेराव तानदेव यास राणोजी भोसलेची मजमू (१२६).

पत्रें— नरहरी रामकडील सरदेशमुखीबाबत (१०६२); रांजणगांवची आबादानी करणेची कामिगिरी सचिवाकडे दिली त्याबाबत (०६४); खंडो पाठक व सखो विसाजी यांना त्यांच्या कुलकर्ण तंट्या-बाबत (०६७); राधा व हेगोजी पाटील यांस चौथाई देण्यासंबंधी (०६८); रामराव पाटणकर यास वतनासंबंधी (०६९); तिमाजी रघुनाथ याच्या ज्योतिष कुलकर्णाबाबत (०७०); उदमी, व्यापारी यांचा माल परत करण्याबद्दल सुलतानजी टवरे यास, खासगी गावांच्या शिवेच्या तंट्या-बाबत शिवाजी बाबाजी यास, मोरो नरहरीचा वाडा खंडो देशपांड्यांनी घेतल्यासंबंधी जमीदारांना (०७१); छपरबंदास हशील माफीसंबंधी (०७२–७३); भुतोजी व त्रिंबकजी कदमराव यांच्या समझोत्यासंबंधी (०७२-७३, ०७६); महादजी घाटगे यांच्याबाबत पिलाजी जाधव व घाटगे यास, जानोजी निंबाळकरकडून कारकुनास उपसर्ग न होण्यासंबंधी साबाजी नाईक यास, परिंचकर जाधव याकडून कर्ज येण्याबाबत बापूजी श्रीपती यास, मिर सिकारे पाठविल्याबाबत कान्होजी

दप्तर अंक २

पुडकें क्र. १—चालू

आंग्रे यास (१०७५); श्रीनिवास प्रतिनिधी यांस सामील होण्यासंबंधी सेनापति व सरलष्कर यांना (०७७); मल्हारजी गायकवाड यांच्या वतनाबाबत रायाजी हांडे यास (०७८); बाजी घोरपडे यास मनसबीसाठी शिफारसपत्र देण्यासंबंधी सुलतानजी निंबाळकर यास (०७९); विठोजी शिर्के व रायाजी शंकर यांना रोजमुऱ्याबाबत (०८०); हरि शंकर साहुकार याच्या अभयासंबंधी, बाबाजी डाके याचे कर्जाबाबत (०८१); देवजी निंबाळकरच्या कर्जाबद्दल बापूजी श्रीपती यास (०८३); न्याहारखानाचा जहागिरी अंमल मयाराम यास देण्यासंबंधी रायाजी जाधव व मलोजी पवार यांस, घणदेवीची मोंगलाई व सरदेशमुखी बाजीरावास दिल्यासंबंधी (०८४); सुभानजी निंबाळकर व गाडेकर यांच्या कज्याबाबत प्रधानास (०८९); रामजी गाडेकर यास दस्त करण्याविषयी (०९१); नरसिंगराव नागनाथ यास सबनिशी दिल्यासंबंधी चिमणाजी माणकेश्वर यास, खंडेराव दाभाडे यास सरंजाम देऊन त्यास स्वारीकरिता येण्यासंबंधी (०९४); तुकोजी वाघ याजकडून घेतलेला ऐवज देण्याविषयी कान्होजी आंग्रे यास (०९५); सुलतानपूर व नंदुरबार महालीची ठाणी सोडून देण्याबाबत कंठाजी कदम व सेनापति यांस, फकरुद्दी अलीखान यास सोडून देण्यासंबंधी सेनापति व पिलाजी गायकवाड यांस, तळेगावचा वेढा उठविण्याबाबत धीराजी पवार यांस, अनवरखान–बहिरमदखान व शहा इसा यांच्याकडून वाजंदी चौथ व सरदेशमुखी घेण्याबाबत (०९७); सैद अबदुलां याची मालियत परत देण्याविषयी कंठाजी कदम यास (०९८); दाजी मोहिते याचे मुकाश्याबाबत फत्तेसिंगास, सुलतानजी सूर्यवंशी याच्या वतनाबाबत (०९९); बाजीरायाकडे जाण्यासंबंधी महादजी घाटगे यास, चिमाजी देवकांते व त्रिबकजी खंडागळे यांना जगजीवन बाळकृष्णाचे निसबत रहाण्याबद्दल (११००); धीराजी पवार याच्या सरदारींत रहाण्याबद्दल कृष्णाजी व मालोजी पवार यांना (१०४); फकरुद्दी अलीखान यास सोडून देण्याबाबत पिलाजी गायकवाड यास व नंदुरबार आंणि सुलतानपूरची ठाणी सोडण्याबाबत कंठाजी कदम यास (१०६); हुजूर ऐवज पाठविण्याबद्दल कान्होजी आंग्रे यास (१०८); वडवाजीचे कर्जाबाबत (१११); शिकारी कुत्रा पावल्याबाबत बजाजी आटोळे यास (११३); पीरखान यास हुजुर आणल्याबाबत (११४); राजगडच्या तनख्याबाबत (११५); हिरडचाबाबत कान्होजी आंग्रे यास (११९); फत्तेसिंगाकडील गावास उपद्रव न देण्याबाबत सुलतानजी निंबाळकर यास, सुलबाजी निंबाळकर, अदरकीचा पाटील यास बाजी महिपतीची घोडी परत करण्याबाबत, मल्हार रंगनाथ याचे चालविण्याबाबत तुकोजी गुजर यास, चिमणाजी माणकेश्वर धायगुडे यास बारामतीचे जकातीबाबत (१२१); मकाऊच्या कर्जाविषयी, मुकदमीचा महजर स्वामींचे नावे करून देण्यासंबंधी जमीदारांना, संभाजी शिंदे यांच्या कर्जाविषयीं, पांडवगडच्या तनख्यासंबंधी (१२२); दुलबाजी नावजी भोकरचे मोकदमीबाबत, दुर्गोजी भोईटे याच्या पाटीलकी कज्याबाबत (१२३); कुणबिणी सोडण्यासंबंधी कोंडाजी माने यास, वारुगडकऱ्यांना ताकीद करण्यासंबंधी जानोजी निंबाळकर यास, वाघेरी गांवचे कुलकर्ण कृष्णाजीचे दुमाला करण्याबाबत, जोत्याजी केसरकरची माणसें मारणाऱ्यांचे पारिपत्य करण्यासंबंधी कान्होजी आंग्रे यास (१२५); चित्ता पाठवून देण्याविषयी उदाजी पवार यास (१२९); उदाई जोशिणीच्या नवऱ्याच्या खुनाबाबत सुभानजी महार्णवर यास (१२२, १३४); फत्तेसिंगास बाबती अंमल देण्यासंबंधी जानोजी निंबाळकर व सरलष्कर यांना, इंदापूर जकातीबाबत सुलतानजी निंबाळकर यास, इंदापुरावर स्वारी न करण्याविषयी मालोजी व महादजी निंबाळकर यांना, भागानगर सरदेशमुखीबाबत फत्तेसिंग व चिमणाजी पंत यांस (१३९).

मोकासें— निळो खळनाथ फडणीस (१०६२); मल्हार खंडेराव (०७२-७३); शंकराजी रामचंद्र (०७४); श्रीनिवास प्रतिनिधि (०८५); सुलतानजी निंबाळकर (०९०); कृपाराम मिश्र (१०५); सखोजी वागमोडे (११२); आप्पाजी जगताप, नारो राम मंत्री (१२३); मलजी ढोणे (१४०).

याद्या— विजयादशमीच्या नजरांच्या (१११६-१७).

वतनपत्रें— बाजी व सिवजी जगदाळे यांना (१०६४).

वर्षासन— बाळ जोशी यास (११२७).

वस्त्रें— श्रीनिवास माधवराव यांस (११०९).

दप्तर अंक २

पुडकें क्र. १—चालू

समाधानपत्रें—कान्होजी भोस्लेकडील पथकांना (१०७६).

सरंजाम— खंडेराव दाभाडे (१०९५); प्रतापराव बहादूर (११३७).

पुडकें क्र. १-अ

का. सं. ११४१–१२७२ (१३२), सु. ११२६, इ. स. १७२५–२६.

अभयपत्रे— शिवाजी व जनाजी मोरे यांस पाटीलकीच्या कज्यासंबंधी (११४२); द्वारकाबाई काटकर हिला (१२४५).

इनामें— सिदोजी पोळ (११४१); बाळंभट वालवडे, नाईकजी भवानजी सालोंखी, काशीनाथ भट (१५१); पीरजादे बेळगांवकर, रामचंद्र गोविंद (१५२); नारो तुकदेव (१५३); मदनसिंग भोसले, मल्हार खंडेराव (१५४); विठोबा व सीताराम नाईक श्रोत्री, बाबदेव गिजरे, विश्वंभर गोसावी, मेढेचें देशमुख देशपांडे (१५७); उमाभट ऋषी, शिवाजी रघुनाथ, शिलेदार दिमत दाभाडे, कृष्णाजी माहाले, यशवंतराव, हरजी, संकराजी व जनाजी यांना सैयद याचा बीमोड केल्याबद्दल (१८१); रघुजी व कंठाजी कदम (१८३); माणकोजी वायसे (१८५–८६); रामचंद्र टिपणे, नारो तुकदेव, गुरवांस वेठबिगार माफी व इनाम, रामचंद्र पोलादखानी (१९४); तुलाजी पाटील (१९४, २०५); कृष्णाजी नाईकजी, नागोजी राम दाणवे, दर्याजी पवार, नारो राम, आनंदराव रघुनाथ सुमंत, बाळकृष्ण बाबा ब्रम्हचारी (२०५); गोविंद येसाजी, गिरी गोसावी, अंतोजी जवळकर (२२७); मुद्गलभट उपाध्ये, देवजी राजे शिर्के (२३०); सदाशिव, कृष्णाजी, अंतोबा नाईक, कृष्णाजी शंकर, राघोबा गोसावी (संप्रदाय रामदास स्वामी), राजाजी शेजवला, रघुनाथ लोणकर (२४८).

करार— महादेव यात्रा हशिलासंबंधीचा (१२०७).

चिटणिशी पत्रें—जोगोजी बावने यास इनाम, सितळ सुकल यास रहदारीचे दस्तक (११४४); फलटणच्या खालसा कमाविसीबाबत, रामजी माळी यास जमीन करार (१४५); रखमाजी राम, पथक महादजी बल्लाळ, मुतालिक दिमत राजाज्ञा यांस मुकासें, सरदेशमुखी वसुलाबाबत किल्लेकऱ्यांना, भागानगरची सरदेशमुखी दादोराय भीमसेन याकडे असल्यासंबंधी, गणेशभट सप्रे यास इनाम व वृत्ति, काशीबाई—बापूजी महादेवची कन्या, कृष्णाजी नीळकंठ, नाईकजी सालोंखी यांना इनामें (१५६); सिदोजी पोळ यास मुकासें (१५६-५७, १६३); पांडवगडच्या मोकासे गांवांस सरदेशमुखी वसुलासंबंधी तगादा न करण्याबाबत संताजी चव्हाण यास, शेताचा वसूल देण्याबद्दल विठोजी शिर्के यास, नरहरी व्यासचे इनाम चालविण्याबद्दल देहायच्या मुकदमास, आप्पाजी नायगुडेच्या घोडीचा ऐवज देण्याबाबत आप्पाजी सोलसकर व खंडोजी पाटील यांस, काशीनाथभट हरभट यास इनाम देण्याबद्दल, महादजी बल्लाळ यास मुकासा (१५८); मल्हार खंडेराव फडणीस यास मुकासा, आप्पाजी गोसावी यास इनाम, खान महंमदच्या कर्जाबाबत कासोजी कदम यास, अमृतराव बांडेचा ऐवज देण्यासंबंधी भिकाजी कदम यास (१६०); बाळंभट वलवडेकर, सैद अबदुल, अबदुल कादर यांस इनामें, धीराजी पवार व लष्करातील सरदार यांस मुकासें (१६१); दुर्गोजी भोईटेवर तुफान घेतल्याबद्दल सिदोजी भोईटे यास व शेख महंमद सादक याचे लुटलेले कापड परत देण्याबाबत फत्तेसिंग व चिमणाजी पंडित राजाज्ञा यास (१६३); तडवले ठाणें बापूजी नारायण यास दिल्याबाबत सरलष्कर व कृष्णाजी मजमदार यांस, बसंतरावच्या जहागिरींतून रास्त चौथ सरदेशमुखी वसूल करण्याबाबत पत्रें, आनंदराव सुमंत यास मुकासा, रायसिंग फौजदार यास दस्तक (१६६); फत्तेसिंगाजवळ रहाण्याबद्दल बदनसिंग यास, गुरवांना वेठबिगार माफी व जमीन इनाम (१७०–७२); संभाजी शिंदे याच्या कर्जाबाबत, दरुणीमहालास मुकासा, नरहरीभट सप्रे याच्या वृत्तीबाबत कान्होजी आंग्रे यास, जेजुरी देवास इनाम (१७५); माधवराव गणेश व तावजी जगताप यास मुकासे करार व सर्जेराव पोळ यास इनाम (१७९); चिमणाजी पंडित राजाज्ञा व बावाजी लक्ष्मण यांस मोकासे, डोंगराई देवपूजेबाबत गुरवांसंबंधीचा निर्णय, जगन्नाथभट सोमयागी यास वर्षासन, महादजी गदाधर व नारो प्रल्हाद यांच्या इनामासंबंधी त्रिबकच्या मोकदमास, धोंडो त्रिमल यास फत्तेसिंग भोसलेची मजमू दिल्याबाबत शाबाजी व सुभानजी दरेकर यांस (१९५);

दप्तर अंक २

पुडकें क्र. १-अ–चालू

माणको कृष्ण यास कुळकर्णी व ज्योतिषीचे वतनपत्र दिल्यासंबंधी, महादेवभट पुरोहित याच्या इनामाबाबत, दत्ताजी रघुनाथ व बाळाजी जनार्दन मुतालिक यांस मुकासें, महादजी विठ्ठलचे शेत व कबिला चालविण्यासंबंधी येसाजी जाधव व वंदनगडास (११९६) ; वंदनच्या तनखा व मुकाश्याबाबत सुलतानजी निंबाळकर यास, नागोजीराव दाणवे यास इनाम दिल्यासंबंधी (१९७) ; दर्याजी नाईक, तुकोजी नाईक पवार, होनाजी पंडित, त्रिंबकराव दाभाडे यांस मुकासे दिल्याबाबत, महादजी गदाधर याची बटीक सोडण्याबद्दल जानोजी निंबाळकर यास (१९८) ; गदाधर बाबाजी, अंतोजी माने, महादेवभट पुरोहित, नाडेकर गुरव यांना इनामें, विरोजी, शिवजी व देवजी माने यांस इनामें व देशमुखी वतनपत्र, नारो गोसावी यास भूमिदान, कचेश्वरभट ब्रह्मे यांस वर्षासन, दारकोजी पाटणकर यास मुकदमी वतनपत्र, धीराजी पवार यास मुकासा व प्रधान यांस बाबती मुकासा (२०६) ; महादजी गणेश यास इनाम व मुकासा कमाविसी, पुरंदर व वज्रगडचा सुभा त्रिंबक कृष्ण यांकडे व रामचंद्र कृष्ण याकडे सचिवांची मुतलिकी दिल्यासंबंधी, संतोषगडच्या तनख्याबाबत (२१३) ; सिदोजी चव्हाण यास दूर करणें व घाटावर येण्याकरिता दस्तकें देण्याबद्दल कान्होजी आंग्रे यास, यमाजी चावरे यास इनाम (२१६) ; त्रिंबकराव यास फौजेसह प्रतिनिधीकडे रवाना केल्याबाबत खंडेराव दाभाडे यास, प्रधान व प्रतिनिधी गौरव करतील यासंबंधी कान्हो सावटे यास, धीराजी पवारच्या मोकाश्यास उपसर्ग न देण्याबाबत, नरहरी रामकडील सरदेशमुखी रामाजी मजमदार यास, बदनसिंग भोसले यास मोकासे, नारो राम कस्तुरे यास इनाम, अर्जोजी सिंगटा यास शुद्धी पत्र (२२३–२४) ; नारायण भट, महंमद अली, मुर्तुजाकुली बेग, राघोबा गोसावी यांना इनामें, केसो गंगाधर यांस बाबती, बदनसिंग भोसले यास मोकासा, काकाजी गोसावीच्या कर्जाबाबत पदाजी बंडगर यास (२२६) ; फत्तेसिंगाकडील ऐवजाबाबत, बाजीरायास दौलताबादपैकीं महाल दिल्यासंबंधी व संतोषगडास तनखा (२४०) ; प्रतिनिधी व कुसाजी भोसलेकडून ऐवज घेतला त्याबाबत कान्होजी आंग्रे यास, त्रिंबकराव धायगुडेच्या कलावंतिणीची वस्तभाव परत करण्यासंबंधी मुकुंद लिंगोजी यास, मल्हार खंडेराव यास मुकासे, नाग जोशी व गोपाळ जोशी यांस इनामें (२४९) ; जेजुरी यात्रा जकातीसंबंधी, रामडोहो गांव अग्रहार दिल्याबाबत, आनंदी कलावंतीण हिस जमीन करार (२५०) ; सेवलीकर, श्री भार्गवराम, काशीबाई यांस इनामें, चिमणाजी बल्लाळ यास मोकासा (२५१) ; महादजी घाटगेच्या मुतालिकास उपद्रव न देण्याबाबत प्रतिनिधीस, काशीबाई गोसावीकडील चोरीबाबत, सैद समसुदीन मुस्ताकअली यास इनाम (२५४) ; संभाजी अहिरराव यास मुकासा, रामचंद्र, त्रिंबक हरी यास इनाम (२५८) ; शामा नायकीण, बाळकृष्णभट पंढरपूरकर, श्री विठ्ठल यांस इनामें, श्रीनिवास माधवराव यास मुकासा, कृष्णाजी नीळकंठ व महालोजी गायकवाड यांस जमीन करार (२५९) ; रथ गाडचा औरंगाबादेहून आणण्याबद्दल दस्तक, जगजीवन परशुराम याच्या कुणबिणी परत करण्याबद्दल कान्होजी आंग्रे यास (२६६).

चिठ्ठ्या— (११६४, १६७, १९१, २०८, २०९, २१७, २२२) ; पुरंदरच्या दास्तानाबाबत (२२१), (२३१, २३८, २३९, २५७, २७१, २७२).

तलब— विठ्ठल गोपाळ सुभेदार यास (११८७).

ताकीदपत्रें— त्रिंबकराव धायगुडेची कलावंतीण परत करण्याबद्दल लिंगोजी यास, नारो शंकरच्या साहोत्रा वतनाबाबत महालास (११५९).

दस्तक— फत्तेसिंग यास पोशाखाचें (११४६).

नेमणुका— चिमणाजी माणकेश्वर यास बाबतीची कमावीस (११९२) ; नारो अनंत यांस संतोषगडचा सुभा (२०१) ; संताजी इंगळे यांस सज्जनगडचा हवाला (२१०) ; देवजी रघुनाथ यांस वंदनची सबनिसी (२४३).

पत्रें— जयाजी मायाजी व संताजी फडतरे यांस पाटीलकीबाबत (११४३) ; भगवंतराव बाबाजी यास जिल्हेहायपैकीं ऐवज पावता करण्यासंबंधी प्रतिनिधी, प्रधान व सचीव यांस (१४८) ; हरबाजी नीळकंठ याच्या पाटीलकीबाबत (१६५) ; प्रतापगडच्या भवानीची वस्त्रे व सरंजामासंबंधी (१७३) ; दौलतराव शिर्केच्या मुकाश्याविषयीं फत्तेसिंग यास, धीराजी, कृष्णाजी,

दप्तर अंक २

पुडकें क्र. १-अ–चालू

मालोजी व उदाजी पवार यांच्या भाऊपणाच्या सरंजामाबद्दल (११७४); नारायण व रामकृष्ण वैद्य यांजकडून औषधोपचार करून घेण्याबद्दल जानोजी नाईक यास (१७७); उदाजी चव्हाणाबरोबरच्या लढाईत मालोजी घोरपडचांनी पाडाव केलेला घोडा हुजुर पाठविण्याबद्दल मोकादमास (१८४); काशीराम सावकार घारुरकर याच्या कर्जाबाबत, माणकोजी आटोळे याच्या सरंजामाविषयीं (१९९); किल्ले सातारच्या तनख्याबद्दल, ऐवजखानास चौथाईशिवाय उपद्रव न करण्याबद्दल रायाजी व जोगोजी जाधव यांस, परगण्यांत धामधूम न करण्यासंबंधी भावसिंग टोके यास, आनंदरावाच्या कर्ज व मोकाश्यासंबंधी (२०२); गुरें सोडण्यासंबंधीं माणको त्रिमल यास (२११); हमीदखान यास सामील न होणें व प्रधानाशी कटकट न करण्याबद्दल कंठाजी कदम व पिलाजी गायकवाड यांस, देवजी सोमवंशी व धीराजी पवार यांस धामधूम न करण्याबाबत (२१४); देवाजी नाईक दरदाणी याचे सावकारीबाबत माफीसंबंधी (२१८); कृष्णी पाटील हिच्या वर्तनाबाबतच्या कैफियतीसंबंधी (२२५); काजी अली सावकार यास आमदरफ्तीबाबत, भागानगर सर-देशमुखी दादोराव भीमसेन याकडे असल्यासंबंधी (२३२); माटमरलीच्या पाटीलकीसंबंधीच्या कैफियतीबद्दल (२३३); तुळजापूर श्रीच्या इनामाबाबत पदाजी बंडगर व देशमुख देशपांडे यांस, व तिळगुळाबाबत (२३६); कान्होजी आंग्रेकडील जमा सरकारात झाल्याबाबत (२४१); बाजीरायाचें ठाणें व कमाविसदार सोडण्याबाबत कान्होजी आंग्रे यांस (२४२); ऐवजाबाबत रायाजी जाधव यांस (२४४); वसंतगडच्या तनख्याबाबत महादजी कृष्ण यास (२४६); जैतजी झावरे याच्या मोकदमीबाबत (२५२); मल्हार प्रभू यास हुजुरीं पाठविण्याबद्दल, रामराव भानवसे याच्या मुकदमी वतनासंबंधी, व राजाजी सेजवला याच्या इनामाबाबत (२५३); गोमाजी नाईक पानसंबळच्या कर्जाबाबत आप्पाजीपंत देशपांडे यांस (२५५); जनार्दनभट याच्या ज्योतिष कुलकर्णाबाबत व बाळ सावंत याच्या देशमुखीबद्दल (२५६); येसजी सेटगेकडून पालीची वस्तभाव देवविण्याबाबत कुवरजी शिर्के यास (२६०-६१); तर्फ पिलोदे बाबत रायाजी जाधव यास (२६२); किलेकर याच्या शेतास तगादा न करण्यासंबंधी संताजी चव्हाण यास (२६३); नागोजी व सुभानजी सोलसकराकडून ऐवज हुजुरीं येण्यासंबंधी फत्तेसिंगास (२६४); खंडेराव दाभाडचाचे महालास उपद्रव न देण्याबाबत रायाजी जाधव यास, सोंधेकराबाबत प्रधान व प्रतिनिधी यांना (२६५); काटे देशमुखाचें वतन चालविण्याबद्दल शंकराजी महाडिक यास (२६७-६९); उदाई जोशी हिच्या नवऱ्याच्या खुनासंबंधी (२७०).

पोषाख— सिदोजी घोरपडे यास (११४७).

मोकासें— महादजी चिमणाजी सभासद (११५०); शेख मानुला, श्रीनिवास माधवराव (१६२); रेखोजी आटोळे (१७६); राणोजी जाधव व गोविंदराव वाघ (१७८); बाबूराव कृष्णाजी, खंडेराव दाभाडे, जावजी म्हसके, माणकोजी वाईसे, येसाजी कोलावणी, चितो मजमदार, बाबाजी राकसे (१८०); हिरोजीराव पाटणकर (१८२); फत्तेसिंग भोसले (१८८); महादजी खंडेराव जमेनीस व मल्हार अनंत फडणीस (१८९); कृपाराम मिश्र, संतोषगड, त्रिंबकराव धायगुडे, राधाबाई माने (२००); बाजीराव प्रधान (२०४); भवानीदास पारसनीस (२३५).

यादी— नजराण्यांची (१२१२).

वतनपत्रे— नारो राम यास नाडगौडकीचे (११५५); भीमाजी व भगवंत बाळाजी दंडवते यांस (१९०).

वेतनें— भगवंतजी निकम व कृष्णाजी खेडकर (१२१५); फरसुंगीच्या कामगारांस (२१९); दर्याजी नाईकच्या जथ्यास (२३७); वेतन चिठ्या (१४९, १९३, २२०, २२८, २२९, २३४).

सनदा— येसाजी जाधव व देवजी रघुनाथ यांस वंदनगडच्या नेमणुकीची (१२०३); बाळकृष्ण पंडित अमात्य व रायाजी जाधव यांस (२४७).

सरंजाम— नारायण ढमढेरे यास (११६८-६९).

दप्तर अंक २

पुडकें क्र. २

का. सं.१२७३–१४२५ (१५३), सु. ११२६ इ. स.१७२५–२६.

अभयपत्र— अंदोजी सावंत यास (१३५६).

इनामें— गोविंदगीर गोसावी (१२८२); शहा भोल फकीर (२९६); आनंदराव सुमंत (३०२); बाबूराव, गोपाळ व कासी बोकील (३१७); रामचंद्र महादेव पटवर्धन (३५३-५४); लक्ष्मण पाटील (३५७); हरि नारायण बावाचे सांप्रदायी (३५८); कासीगिरी गोसावी (३६९); नाग जोशी, गणेशभट, श्री संगमेश्वर (३८१-८२); आनंदराव व बाजीराव महादेव यांस मोकासा व इनाम (३८६); कचेश्वरभट ब्रह्मे, बुवाजी बल्लाळ देशमुख (३९४); दादंभट, रघुनाथभट व रामभट राजऋषी (४०५–०६); नागोजीपंत (४१२), कलावंतीण (४१३);

करार— सारंगडच्या तनख्याचा (१२८१).

चिटणिशी पत्रें—नारो राम मंत्री यास मुकासा दिल्याचें, नरहरी राम, प्रतिनिधी व प्रधान यांस सरदेशमुखी दिल्याबाबत, होनाजी अनंत यास मुकासा व बाळकृष्णबावा यास इनाम (१२७४); भवानीबाई महाडिक यांस इनाम, कोलगांवची पाटीलकी अमानत केल्यासंबंधी (२८९); नागोजी देशमुख याच्या वतनाबाबत, इंदापूर जिल्हेबाबच्या तहासंबंधी, पालगडची कुमक करण्याबद्दल कान्होजी आंग्रे यास (२९२); पुरदीलखान यास मिरजेचें वाटदस्तक, रंभाजी निंबाळकर यास सामील करून बारामती महाली दंगा केल्याबाबत जानोजी निंबाळकर यास, बंडगर यास सगरची सरदेशमुखी देण्याबाबत पदाजी बंडगर यास, रामभट व गोपाळभट वाळिबे यास वृत्तिपत्र (२९५); महादजी घाटगेची गुरें देण्यासंबंधी जानोजी निंबाळकर यास, नाईकजी गुंड याचे कज्याबाबत (३०५); राजाराम महाराजांच्या वृंदावनासंबंधी, सुभानजी जगताप, श्री. महादेव दहिगांव, येसाजी गायकवाड, अंतोजी डावरे यांना मोकासे दिल्याबाबत, नरहरी अनंत यास कमाविसी (३०८); नाईकजी कडू यास तलब, प्रचंडगडच्या तनख्याबाबत (३१०); सरदारांना समाधानपत्रें, सेखमिऱ्यास मुकासा करार (३२५); जमनाजी महाडिक, महंमद अदल यांस मुकासें, नारो राम फडणीस, चिंतामणि थोरात, सिदो कृष्ण अत्रे, सदाशिव गोसावी, रघुनाथ भट, पद्माकर तासे, बाजीराव बल्लाळ, धोंडो आबाजी, जगन्नाथभट हेदले, नारायणभट रघुनाथभट, अनंतभट यांना इनामें, संताजी पिसाळ यास शेतसनद (३३१–३३); हुजुर खाजगीकडील मुकाश्याबाबत सिदोजी निंबाळकर, संभाजी पवार यांना, गोपाळजी व गोविंद वासुदेव यांस साहित्य करण्याबाबत कृष्णाजी आटोळे यास, करंजे व दरेच्या व्यापाऱ्यांस व्यापाराकरिता अभयपत्र, महंमद अदल यास इनाम, सरकारचे खिलार चारणीस दस्तक (३३४); आबादानी करण्यासंबंधी बावधानच्या वाणी बकालास अभयपत्र, सदाशिव गोसावी कुरालीकर यास जमीन इनाम, धावजी माडूरच्या शेताचा वसूल न घेण्याबद्दल पांडवगडास, देवरुखे ब्राह्मणांच्या वाटेस न जाण्याबाबत कान्होजी आंग्रे यास, धीराजी पवार यास हुजूर तलब (३३५); नरहरी राम यास सरदेशमुखी, खंडो बल्लाळ यास मुकासा, संताजी व सिदोजी पवार याच्या कर्जाबाबत कान्हो कृष्ण यास , कासिगिरी गोसावी यास इनाम, बाबूभट परांडकर व भिकाजी नाईक यांच्या कज्याबाबत सिदोजी व केशवराव देशमुख यांना (३३६); नारायणजी समसर, कारकून दिंमत पंतप्रधान यांना मोकासें, बयाजी पंडित न्यायाधिश यास पंताजी शिवदेवच्या मुकाश्याची कमाविसी दिल्यासंबंधी सटवोजी जगताप यास, जनार्दन अच्युतभट बापट, नारायण भट व मल्हार गोसावी यांस इनामें (३३७); सिदो कृष्ण अत्रे, नारो काशी जगदळे यांना इनामें दिल्यासंबंधी, धीराजी पवार यास समाधानपत्र, नीळकंठराव जाधवच्या गांवास उपसर्ग न देण्याविषयी सुलतानजी निंबाळकर व गोविंद रघुनाथ यास, प्रतापगडच्या घेऱ्याची शेते न तोडण्याबाबत प्रतापगडास (३३८); नारो राम फडणीस यास इनाम, तिमाजी जगदाळेस हुजूर येण्यासंबंधी, भिवजी व प्रतापजी पाटील यांच्या कज्याच्या निवाड्याबाबत चांदवडीच्या देशमुख देशपांडे यांस, नानाजी रघुनाथच्या कर्जाबद्दल नारो आपदेव यास (३३९); धोंडो आबाजी ताम्हणीकर, चिंतामणि थोरात यांना इनामें, राघो महादेव याच्या सज्जनगडावरील नेमणुकेबाबत हवालदार यास

दप्तर अंक २

पुडकें क्र. २–चालू

(१३४०) ; जादा बाबती न घेण्याबद्दल भिवजी वीर यास, ठाणे खासगी कामाविसदाराच्या स्वाधीन करण्यासंबंधी माणकोजी बंडगर यास, सिदोजी पोळ यास मुकासेबाबत, अंतोबा नाईक जोशी यास कापडाचें दस्तक, गोविंदजी महाडिक याची सून परत करण्याबाबत उधो सबनीस यास, रामचंद्र प्रभू, भगवंत रेणावीकर, राघोबा गोसावी अंबर्डेकर यांना इनामें, जगन्नाथ भट देवण-भट बेदले, अनंतभट अरणीकर, जमनाजी महाडिक, जगन्नाथभट यांना वर्षासने (३५९–६१) ; संताजी जगताप यास तलब, कान्हो कृष्णाकडील संताजी व सिदोजी पवार यांच्या कर्जासंबंधी (३६४) ; राघोबा अंबर्डेकर व भगवंत रेणावीकर यांना इनामें, भीवजी यास शेत सनद (३६६) ; महादेव यात्रेंतील चोरीबाबत, नरहरी रामचे सरदेशमुखीबाबत, घोरपडे–चव्हाण यांच्या स्वारीविषयी, धनाजी जाधव यास मोकासा (३७१–७२) ; शेख मिरा यास इनाम, नानाजी रघुनाथ यास मोकासें (३७३) ; शेख अजम याचा कबिला आणण्यासाठी दस्तक, महादेव यात्रेंतील लुटीबाबत (३७४) ; महादजी कृष्ण, अर्जोजी व भगवंतजी ढमाले यांना इनामें, लिहिणार दिमत भांडारगृह, परशुराम पंडित प्रतिनिधी, जगजीवन बाळकृष्ण यांना मोकासें (३७९) ; लक्ष्मण जाधव, बाळाजी सुते, नारायणभट, वीरेश्वर गिजरे, जनार्दन गोसावी, शेख महंमद, जिवाजी देशमुख यांस इनामें, मल्हार अनंत यास मालोजी बंडगरची मजमू करार, मल्हारजी पवार यास सचिवांची जासुदनाइकी, पथके शिलेदारांना जमिनी (३९९–४०१) ; नारायणभट गिजरे, बलरामगीर गोसावी, रघुनाथभट अग्निहोत्री, राणीवसा, वृंदावन, गंभीरसिध गोसावी परंपरा, वडवालसिधनागेश, शेख महंमद, केसो मल्हार यांस इनामें, रत्नोजी पांढरे याची मजमू करार, लक्ष्मण व गैगाजी गणदास सोनार यांच्या पुजारीपणाच्या कज्यासंबंधी (४०३) ; जिवाजी गोविंद यास इनाम, खंडेराव दाभाडे यास संरजाम (४१४) ; दुर्गोजी महाडिक यास सरंजाम, खंडेराव दाभाडे, माणको त्रिमल धायगुडे व रुस्तमराव जाधव यांना मोकासे (४१८) ; रामकृष्ण यास रहदारीचें दस्तक, बयाजी गोसावी यास इनाम (४२१) ; त्रिबकराव दाभाडे, नारायणभट सत्यऋषी, सखंभट जोशी यांना इनामें दिल्याबाबत, प्रतापराव व हरि नारायण यांस मोकासे (४२२) ; सैद सुलतान, सुलतानजी घाटगे, बहिरजी पाटील यांना इनामें (४२२, ४२४) ; मोरो सामराज यास बाबती दिल्यासंबंधी ब्रह्मपुरी, मंगळवेढे वगैरेना, हरि नारायण यास बाबती मोकासा दिल्यासंबंधी, तुकोजी गुजर यास समाधानपत्र, चवडू श्रीरामशेट सावकार यास गोव्यास व्यापार व वसाहत करण्याविषयीं अभयपत्र, देवजी पाटील सातारकर, श्री उत्तरेश्वर यांना इनाम दिल्याचे (४२३) ; शरिफजी राजे महाडिक व चिमणाजी बल्लाळ यांना मुकासें (४२४) ; धीराजी पवार व महादाजी राम प्रभू यांना मोकासें, शंकरभट, रामभट महाबळेश्वरकर, केसोजी हणगभवर, नारायणभट सप्तऋषी, शिवरामदास पाटील यांना इनामें दिल्यासंबंधी (४२५).

चिठ्या— (१२८८, २९०, ३०१, ३०३, ३१३–१५, ३२९, ३३०, ३४२, ३४३, ३४८–५१, ३६५, ३८५, ३९३, ३९८).

तलब — रामभारथी नागो गोसावी यास मुकादमाच्या कलहाबाबत (१४०९) ; सेख हया यास (४१९).

दस्तकें— जाधव पांडे सावकार यास औरंगाबादेच्या रहदारीचीं (१२७८-७९).

नेमणुका— गणेश संभाजी यास लोहगडची नामजादी (१३१८) ; अंतोबा नाईक भिडे यास पालखीची (३५५) ; अंताजी विठ्ठल यास पाटीलकी (४०७) ; बाबाजी राम यास जोत्याजी केसरकरची सवनिसी, चिटको तुकदेव यास संतोषगडची नामजादी व महादजी यमाजी यास शेत (४२०).

पत्रें— कान्होजी आंग्रे यास दस्तकाबावत (१२७३) ; कुरले गावाची पहाणी करण्यासंबंधी जमीदारास (२७५) ; नलगे याच्या पाटीलकीबाबत सुभानजी लगड, नागोजी कुलकर्णी व येसाजी नलगे यांस (२७६) ; केरोजी पवारांनी सरंजामाची वांटणी केल्याबाबत धीराजी पवार यास (२७७) ; जिन्नस पावल्यासंबंधी कान्होजी आंग्रे यास (२८३) ; सटवोजी पाटणकरशी कज्या न करण्या-संबंधी नागोजी पाटणकर यास (२८५) ; सिदोजी चव्हाण यास दूर करण्यासंबंधी कान्होजी आंग्रे यास (२८६) ; मानाजी घोरपडे यास दस्तक देण्याबद्दल आईसाहेब यांस (२८७) ; चव्हाणच्या चौथाईबाबत, महालात धामधूम न करण्याबद्दल खंडो बल्लाळ व थोरात यांना (२९१) ; माळव्यातील अंमलाबाबत केसो महादेव यास (२९३) ; सारंगडडच्या बेगमीबाबत विठोजी शिर्के

दप्तर अंक २

पुडकें क्र.२—चालू

यास (१२९७, २९९); महिमानगडच्या गावास उपसर्ग न देण्याबद्दल जानोजी नाईक निंबाळकर यास, सुमंत यास सरदेशमुखी दिल्यासंबंधी देशमुख-देशपांडे यास (२९८); नारो राम मंत्री यास दस्तक देण्याबद्दल आईसाहेबास (३००); हरिदास व किशोरदास सावकार यांच्या कर्जा-बाबत लिगो कुलकर्णी, संभाजी कोले वगैरेस (३०४); प्रचंडगडच्या तनख्याबाबत मोकदमास, सचिवांचे साहोत्र्याबाबत माणको बहिरव यास (३०६); तुकोजी गुंड याच्या मोकदमीसंबंधी (३०७); शिंगणापूरच्या महादेवास गांव दिल्यासंबंधी (३०९); उदाजी चव्हाणची खबर पाठविण्याविषयी सिदोपंत यास (३१२); शंकराजी केशव यास सरदेशमुखी व बाबूराव विश्वनाथ यास बाबती अंमल देण्यासंबंधी, खासगी महालांचा अंमल देण्याबद्दल पिलाजी गायकवाड यास (३१६); मनसुबा कळविण्याबाबत प्रधान, प्रतिनिधी, सरलष्कर व दाभाडे यांना (३१९); रंगो त्रिंबक यास पाठविण्याबद्दल धीराजी पवार यास (३२३); पांढरे याचे मोकाश्याबाबत फत्ते-सिंगास व यात्रेस येण्याबद्दल जानकीबाई घाटगे यास (३२४); इंदापूर रयत कौलाबाबत जीवनराव शंकर यास (३२८); भागानगर सरदेशमुखी यादोराव भीमसेन याला दिल्याबाबत त्रिंबकराव दाभाडे व पंतप्रधान यास, रघूजी सोनाराच्या कर्जाबद्दल कान्होजी आंग्रे यांस, रामदास स्वामींच्या इनामास उपसर्ग न देण्याबद्दल बळवंतराव जिवाजी यास (३४१); पाटील याच्या तलबेबाबत व इंदापूर पाटलास हुजुरीं आणण्याबद्दल जीवनराव शंकर यास (३४४-४५); सरदारांस लष्करासह हुजुरीं येण्यासंबंधी (३४६); सिदोजी थोरात यास अभय दिल्यासंबंधीं व गनिमास शह देण्याबद्दल त्यास आणि सरदारांना (३५२); पिंपळगांव शीव खटल्याबाबत (३६३); बाजी शिंदे याची माणसे पोहोचविण्याबद्दल भिवजी वीर यास (३६७); घोरपडे व उदाजी चव्हाण यांना शह देण्याविषयीं सिदोजी थोरात यास, गुजरात, माळवा मुकासा चिमणाजी बल्लाळ व त्रिंबकराव दाभाडे यास निम्मेनिम देण्याबाबत (३६८); सुपें व इंदापूर वसुली तहाबाबत (३७०); राज-गडच्या तनखा गांवासंबंधीं (३८७–९०); मनसबा कळविण्याबद्दल प्रधान व प्रतिनिधी यास (३९१-९२); दमाजी थोरात व येसाजी गायकवाड यांचे कबिले बाळाजी पंडित प्रधानच्या ताब्यांत दिल्याबाबत (३९५, ३९६); सरकारचा ऐवज पाठविण्याबाबत कान्होजी आंग्रे यास (३९७); मानभावास उपसर्ग न देण्याबाबत (४०२); चिमणाजीपंताबरोबर असलेल्या फत्तेसिंगाकडील लष्करच्या सरदारांना (४०४); यशवंतराव व रुस्तुमराव पांढरे यांना फत्ते-सिंगानी कैद केल्याबाबत भिकाजी पांढरे यास (४१०); कान्होजी आंग्रे यास हुजुर येण्याबद्दल (४१७);

मोकासें— मल्हार खंडेराव फडणीस (१२८०); मानाजी जाधव (३११); कुसाजी काळभोर (४१५); दत्ताजी माने (४१६).

याद्या— सर कारकून, मोहरीर सरदारांच्या (१३२६–२७); नजर जमेची (३८०); शेत सनदांची (४११),

वेतने— (१२९४, ३७५–७७).

सनदा— डौलाची (१२८४); भिवजी वळंब (३६२); आबाजी पिंगला व कमलोजी यांना (३८१–८२), शेत सनदा (४११).

सरदेशमुखी—प्रतिनिधी यांस कडेवलीतची (१३७८).

सरंजाम— अमरसिंग शिर्के (१३४७); जीवन हजारी यास हुजरातचा (४०८).

दप्तर अंक २

पुडकें क्र. २-अ

का. सं १४२६–१९४० अ (११६), सु, ११०८–११५०, इ. स. १७०७–१७४९.

आज्ञापत्रें––जानोजी जाधव यास हुजुरीं येण्याबाबत (१४३०); चिमणाजी राजाज्ञाकडून ऐवज मागणीसंबंधीं (५२४).

इनामें–– सुभानसिंग राऊळ लांबकानीकर (१४३५, ४४६); बाबूराव दाभाडे (४४०, ४६); शिवाजी राजजी जगताप, बाजी शिंदे जामदार (४४८); हरि यादव (४५४); राणोजी गायकवाड, रुद्राजी राणा, माणकोजी भोसले, हणगोजी शिंदे, राणोजी जगदेव पवार (४५५); नारो पंडित सचिव (४६१, ७४); त्रिंबक सिवदेव (४७३); गोविंद पारब्रम्ही व दुलबाजी जाधव (४७८); खंडोजी जगताप (४९८); श्रीनिवास माधव व रुद्र जोशी (५०७); काशीबाई (५२३); जनार्दन देव, राणोजी बहिरजी गायकवाड (५३८); तिमाराव हरकारे यांस गांव इनाम (५४०).

चिटणिशी पत्रें––दौलतराव शिरके यास इनाम, सरदेशमुखी कमाविस दाभाडे व बजाजी गुंडो यांच्या स्वाधीन केल्याबाबत महालांस (१४३३); निळो होनप यास इनाम, नरहरी रामकडील सरदेशमुखीबद्दल पत्रें, कृपाराम मिश्र यास मोकासें (४३६–३७); सिवाजी जगताप यास जमीन, बाजी शिंदे यास इनाम, सरंजामांत घालमेल होणार नाहीं यासंबंधी देवजी सोमवंशी यास, हैबतराव धापटे यास बोलावणें, गणोजी बेरड याच्या मुकादमीचा निवाडा करण्याबद्दल सुलतानजी निंबाळकर यास, व नारायण सुतार याच्या कर्जाबाबत सखो महादेव यास (४४१); रायाजी जाधव याकडे वराता, मळोजी गाढवे यास जमीन व निळो होनप यांस इनाम दिल्याबाबत (४४५); बहिरजी सोळसकर यास जमीन, रघुनाथभट यास वर्षासन व बाबती सरदेशमुखीचा इजारा खंडेराव दाभाडे यास दिल्याबाबत (४४९); प्रतापगडास तनखा, सटवोजी निंबाळकर यास मोकासा, माधवराव गणेश व मोरभट पटवर्धन यांना वर्षासनें (४५२); संभाजी महाराजांच्या समाधीस व हरि यादव निंबकर यांना इनामें, नारो आप्पाजी यास वैराटगंडी आसामी, शंकराजी यास इंदापूरचा सुभा व कृष्णाजी बल्लाळ यास रायाजी जाधवची फडणिशी दिल्यासंबंधी (४५३); सुरत खाजगी महालाबाबत, सहा जमीदारांना व गंभीरसिंघ यास इनामें, महिपत खंडेरावच्या कर्जाबाबत व भागानगरच्या बंदोबस्तासंबंधीं फत्तेसिंगास (४६२); खंडोजी पवार, भिवजी चव्हाण, महादजी कदम यांना जमिनी, श्रीनिवास माधवराव यास मुकासा (४७९–८१); त्रिंबकराव दाभाडे यास गुजरातचा मोकासा व इनाम, नरसो त्रिमल व त्रिंबक जिवाजी यांस इनाम दिल्याबाबत (४९३); सुलतानजी निंबाळकर यास सरदेशमुखी, सरंजामांत घालमेल होणार नाही याबद्दल देवजी सोमवंशीस, व बदनसिंगाबाबत फत्तेसिंगास (४९९); बहिरजी यादव यास जमीन, कंठाजी कदम यास भेटीस बोलाविल्यासंबंधी (५०४); राणोजी निंबाळकर, श्रीनिवास माधवराव यांना मोकासें, पांडुरंगभट याच्या वृत्तीबाबत (५०६); रोखे न करण्याबद्दल रामराव द्वारकोजी व नागोजी पाटणकर यांना, महमंद तकीखान यास इनाम (५१४); मानाजी व सुलाबाई जाधव यांना इनामें, सखोजी वागमोडे यास मुकासा (५२२); यशवंत महादेव, यादवराव मुनशी, फत्तेसिंग भोसले, चिमणाजी पंडित राजाज्ञा, महादाजी बल्लाळ मुतालिक राजाज्ञा यांना मोकासें, काशीबाई, नानाभट महादेवभट, सुलाबाई जाधव, जनार्दन देव यांना इनामें (५२८); महादजी व राणोजी गायकवाड यांना जमीन करार, कुणबिण सोडविण्याबद्दल यशवंतराव गाढवे, चांगोजी शिंदे यांना (५३२); नानाभट पारखडीकर यास इनाम, चिमणाजी पंडित राजाज्ञा याच्या मोकासे देहांची यादी (५३४); सुलाबाईस इनाम, चितोडहून बंदुका आल्यावर देऊ म्हणून माणकोजी घाटगेस जाब, गाव खंडणीबाबत भिकाजी पाटील यास तलब (५३६); खंडोजी जगतापच्या वेळापूर गांवाबाबत सुलतानजी भोसले यास जमीन करार (५३९).

चिठ्या–– (१४२९, ४३२, ४५८–६०, ४६९–७२, ४८२, जमा व वराताच्या (४८७–८८); (५०८, ५०९, ५२५).

तलब–– गाडे याचे पाटीलकी इन्साफासाठी पाटलांना (१४४२).

दस्तक–– न्यारखान यास सोरा आणण्याबाबत (१५१६).

नेमणुका–– मोरो सामराज यास प्रतिनिधीची मुतालिकी व जानो शंकर यास बहुमान (१५२६); नारो अनंत यास संतोषगडचा सुभा (५४० अ).

दप्तर अंक २

पुडकें क्र. २-अ—चालू.

पत्रें— दादो क्षीरसागर याच्या मुतालिकाकडून कुलकर्ण कामें घेण्याबद्दल (१४२६); खोजे मनप्पर याच्या मुकदमीसंबंधी व रामसिंग परदेशीच्या कर्जाबाबत पिलाजी जाधव यास (४२७); यशवंतराव व रुस्तुमराव पांढरे यांच्या उर्जितासंबंधीं द्वारकाबाई पांढरेस (१४२८); हरि नारायण याच्या इनामाबाबत (४३१); भागानगरच्या सरदेशमुखीबाबत (४३४); कराडच्या वसुली तहासंबंधीं जमीदारांना (४३८); बागलाण सरदेशमुखीस दिकत न करण्याबद्दल भावसिंग टोके यास व त्रिवाडी ब्राह्मणांसंबंधी कंठाजी कदम यास (४३९); नारो सचिव यांच्या जिल्हेदारीसंबंधी (४४३); चौकी पहारा करण्याबद्दल हिरोजीराव दरेकर यास (४४७); गुजरात माळवा चौथ सरदेशमुखीबाबत प्रधानास, घणदेवी प्रधानाच्या स्वाधीन केल्याबाबत, सुरतची बाबती—सरदेशमुखी, कल्याण भिवंडी खालसा सरदेशमुखी व जंबुसर येथील मोकाश्यासंबंधीं (४७६); मोरो सामराज यास जमावानिशीं हुजुरी बोलाविल्याबद्दल (४९०); लछीराम याची वस्तभाव परत देण्याबाबत जानोजी बावने यास (४९२); खासगी महालाबाबत प्रधान व सेनापति यांना व नजरेबाबत कृष्णाजी पवार यास (४९४); यशवंतराव व रुस्तुमराव पांढरे आणि चिमणाजी पंडित राजाज्ञा यांच्याकडून ऐवज येण्यासंबंधीं (४९५–९६); मच्छिद्रगड फते झाल्याबाबत जासुदांना वस्त्रें दिली त्यासंबंधी (४९७); केरोजी पवारकडील गुजरातमधील मोकासे करारावाबत प्रधान व दाभाडे यांना, धीराजी पवार याच्या पाटीलकीबाबत (५०१); केरोजी व धीरोजी पवार यांच्या मोकाश्यासंबंधीं (५०२); शिवाजी व मालजी नागोडा यांच्याकडून मकाई तेलिणीचा पुत्र सोडविण्यासंबंधी प्रधानपंतास (५०३); मानसिंग मोरे यास घोडा दिल्याबद्दल (५१०); फत्तेसिंग व पांढरे यांच्या कलहाबाबत यशवंतराव, रुस्तुमराव व भिकाजी पांढरे यांना (५११-१२); नागोजी घाटगे याजबरोबर कलह न करण्याबाबत लिंगोजी सरनोबत वर्धनगड यास (५१३); तुकोजी मोहिते याचा मुलगा परत देण्याबद्दल द्वारकोजी पाटणकर यास, बाजीरायास बाबती अंमल सुरळीत देण्याबद्दल खंडेराव दाभाडे यास, भोईटे तंटयाबाबत अदरकीकर यास हजर करण्यासंबंधी जानोजी निंबाळकर यास (५१७-१८); चिमणाजी पंडित राजाज्ञाकडून ऐवज येण्याविषयी व दुर्गोजी भोईटे याच्या कज्याबाबत जानोजी निंबाळकर यास (५२१); प्रधानांच्या दिमतीस महादजी घाटगे यास दिल्यासंबंधीं पिलाजी जाधव, घाटगे व चिमणाजी बल्लाळ यांना (५२७); गुंडाजी कानोजी याच्या मुकदमीचे वतन कज्यासंबंधी (५२९); बहिरजी कोडे यांचे देशमुखीचे वतनाविषयी देशमुख, देशपांडे व आनंदराव यांना, महादजी कदम यास इनाम दिल्याबद्दल मल्हारजी, धुरोजी व सुभानजी जाधव यांना (५३०); सुभानजी खंडागळे याच्या वतनाबद्दल सखोजी पवार व पुंजाजी गाढवे यांस (५३१); नीलकंठराव जाधव यास नबाबाच्या कैदेंतून सोडविण्यासंबंधी प्रधान व पिलाजी जाधव यांना, गुंड सेठ कोष्टी याच्या कर्जाबाबत परसोजी भोसले यास (५३३); खासगी गांवांची गुरें परत करण्याबद्दल सुलतानजी निंबाळकर यास, देवळाली खासगी गांवाच्या कमाविशीबाबत मोकदमास (५३५); समस्त देवगांवकरांस हुजूर पाठवून देण्यासंबंधी निमसेठ सेठी यास (५३७).

मोकासें— गोविंद रायाजी मुतालिक व राणोजी निंबाळकर (१४४४); आनंदराव रघुनाथ व व्यासराव भुजबल यांना जमाव बेगमीस, मानाजी मालुसरे (४५६); होनाजी अनंत (४८५-८६); लिंगोजी गायकवाड (५२०).

याद्या— नजर जमेची (१४७७); शिलेदारांच्या वांटणीची (४८३); वस्त्रें दिली त्यासंबंधीची (४८४); वल्लभगडच्या तनख्याची (४९१); मच्छिंदगड फत्ते केला त्या बाबत जासुदांना वस्त्रें दिली त्या संबंधीचीं (४९७).

वेतन चिठ्या— (१४५१, ४७५); सिवजी इंगवला व सिदोजी दळवी यांस (५००).

समाधानपत्रें— सरदारांना (१५०५).

सरंजाम— राणोजी निंबाळकर (१४५०); मुजुमदार जमेनिस दिमत सेनापति (४५७); साबाजी व कान्होजी भोसले (४६३–६८); सिदोजी पोळ (४८९).

दप्तर अंक २

पुडकें क्र. ३

का. सं. १५४१–१६५० (११०), सु. ११२०, ई. स. १७१९-२०.

अभयपत्र— माहुलीजवळ नवी पेठ वसविल्याबाबत (१५७७).

आज्ञापत्र— फौजेसह रहिमतपुरी जाण्याबाबत रखजी जाधव यास (१५५०).

इनामें— श्री देव चिंचवड (१५६४); सिदोजी नाईक निंबाळकर व पथक हुजरात दिमत सिदोजी पोळ (१५७६); सातारा किल्लेकरी व बुवाजी बल्लाळ देशमुख (५७८); बुवाजी देसाई (५७९); सिदोजी थोरात (५८१); आनंदराव मोरे (६३१); विश्वंभर गोसावी (६४०).

करारपत्रें— प्रधानाकडे खासगी महाल कमाविसीबाबत व रावजी नाईक यास मोकासा दिल्याबाबत (१५६०); सिदोजी थोरात यास खालसा व बाबती अंमल दिल्याबद्दल (५६९); गुजरात माळवा मोकासा त्रिबकराव दाभाडेस दिल्यासंबंधीं (६०४).

चिटणिशी पत्रें—जखू लोहार व सुभानजी शिंदे यांना इनाम व जगन्नाथ बळिराम यांस बैलाचे दस्तक दिल्याबाबत (५४१); सयाजी गुजर यास इनाम, बाळाजी रामचंद्र व कृष्णराव महादेव यांस इनाम व कुलकर्ण करार, होनाजी पंडित यास मोकासा (५४४); कान्होजी आंग्रे यास पंताजी शिवदेवच्या वतनाबाबत व हुजूर ऐवजाबाबत, रुस्तुमराव पांढरेकडील हुजूरच्या ऐवजाबद्दल, मच्छिद्रगडच्या मोकाश्यास उपसर्ग न देण्याबद्दल सिदोजी थोरात यास, विसाजी नारायण, कासिगिरी गोसावी, भास्कर रघुनाथ वैद्य यांना इनामें (५४८); फौजेची व ठाण्यांची बेगमी करून गनिमास नतिजा देण्याबद्दल सिदोजी थोरात यास, गोपाळ यास फत्तेसिंग भोसलेची मजमू (५४९); येसजी जाधव, राघो राम, गरीबपुरी गोसावी, राणोजी, आप्पाजी व सेटचाजी रणनवरे, विसाजी नारायण, आबाजी महादोबा गोसावी यांना इनामें, आप्पाजी भावजी प्रभू याला कालोजी भोसलेची जमेनिशीची सनद (५५२); संताजी पाटील यास मारल्याबद्दल रघोजी व अनदोजी पाटील यांना तलब, कान्होजी आंग्रे यास हुजूर ऐवजाबाबत, रुस्तुमराव पांढरेकडील ऐवजापैकी मुकासबाबेतून ऐवज दिल्यासंबंधीं जमीदारांना, पंताजी शिवदेवच्या मुकदमीसंबंधीं कान्होजी आंग्रे यास (५५९); महादजी कृष्ण, सखोजी शिंदे यांना इनामें, बाजीराव पंडित प्रधानाकडे सरदेशमुखी (५६१); कोकरे याजबरोबर कलह न करण्याबाबत जानोजी नाईक निंबाळकर यास, चिमणाजी राजाज्ञाकडे मुकासा करार (५६२); बाजीराव पंडित, श्री देव चिंचवड यांना इनामें, नागोजी गणसेट वालेकर यास सेटेपणाचे वतनपत्र (५६३); बाजीराव बल्लाळ, महादजी कृष्ण, सेखोजी शिंदे, तिमाजी राजहंस यांना इनामें व बाजीराव, चिमणाजी बल्लाळ, रामचंद्र महादेव यांस मोकासें (५६५); जगजीवन बाळकृष्ण पंडित यास मोकासा, बाजी गंगाधर यास सयाजी बावनेची मजमू (५६६); केसो बल्लाळ यास इनाम व केसो सामराज यास संताजी आटोळेची मजमू (५६७); कुसाजी व येसाजी भोसलेस मोकासा, सिदोजी थोरातकडे खालसा व बाबती अंमल (५७१); नारायण ढमढेरे, सताजी वायबर; वाकोजी ढमढेरे यांना सरंजाम, सोमठाणें, जावजी म्हस्के व कमलोजी पाटील यांना इनामें, तुकोजी व आनंदराव पवार यांना मोकासें (५७२–७४); खालसा व हुजूर वसूली ऐवज साबाजी नाईक याकडे देण्याबाबत, दहिगावास विश्वनाथभट दिवेकर यास इनाम (५८२); शिवाजी दामोदर, दौलतराव शिर्के, व्यंकटराव कृष्ण यांस सरंजाम, गणेश बल्लाळ यास मजमूची फडणिशी करार (५८६); बाळाजी महादेव यास रहदारी दस्तक, शामलाची स्वारी आल्यास खबरदारीने रहाण्याबद्दल हिरोजी दरेकर यास, तिमा अवटीची बटीक परत देण्यासंबंधी जोगोजी जाधव यास (५८९); इंदापूरच्या पाटीलकीबाबत निवाडपत्र, धावजी दरफळे यास खासगी महालाकडील कमाविशी दिल्याबद्दल (५९१); कान्होजी भोसले यास समाधानकारक वागणूक देऊन भेटीस आणण्यासंबंधी फत्तेसिंग व नारो राम मंत्री यांना, होनाजी पंडित यास बाबतीचा अंमल (५९९); बावाजी लक्ष्मण, शंकराजी रामचंद्र, यादवराव यांना मोकासें, आनंदराव मोरे, रामदास स्वामी मठ यांस इनामें व वेंकटभट याच्या वतनाबाबत (६०७); सुभानजी शिंदे यास तलब, दाभोळच्या वतनदारास व रयतेस, श्रीनिवास पंडित प्रतिनिधीकडील ठाणी स्वामीस पावल्याबाबत (६२६); नवाब ऐवजखानचे उंट परत देण्याबाबत कृष्णाजी पवार यास, मुताखान यास

दप्तर अंक २

पुडकें क्र. ३—चालू

घोडे रवाना केल्याबाबत रहदारीचे दस्तक (१६३३); खोजे अबदुलाखान दिवाण मोगलाई निजामनमुलुक यास मोकासा, रंगभट पुराणिक यास वर्षासन, केरोजी वाहवाला यास इनाम (६३९); हरि सबनिवीस, विश्वंभर गोसावी, भवानीशंकर ज्योतिषी, जोशी यांना इनामें, बळवंतराव विश्वनाथ यास जमेनिशी, गोविंद हरि यास फडणिशी, रघोजी भोसलेची फडणिशी विश्वंभर देवाजी यास, मजमू यास मुकासा दिल्याबाबत (६४३); भिवराव कोनेर व विश्वंभर गोसावी पैठणकर यांना इनामें, मोरो बल्लाळ प्रभू यास लुयाजी पांढरेची जमेनिशी, महादजी गणेश यास बाबती चौथाईची सनद करार, मोकदम व गोविंद पुरुषोत्तम यांना जमिनी करार (६४४); मल्हार खंडेराव फडणीस यास बाबती मुकासा करार, जोत्याजी केसरकरकडील कमाविसदारास वसूल देण्यासंबंधीं सिदोजी थोरात यास, वृंदावनाकडे अन्नछत्राबाबत, वसुलासंबंधीं, श्री रवलनाथ देव याकडील बाबतीच्या वसुलाबद्दल, सूर्याजी पिसाळचा पुत्र व इंदापूरच्या काजीच्या सोयरिकेबाबत जीवनराव शंकर यास (६४५); आप्पाजी कुलकर्णी यांच्या वतन तंट्याबद्दल संभाजी पाटील यास, तुलाजी पवार याच्या पाटीलकीच्या तंट्यासंबंधी सिदोजी थोरात व जमीदार यांना, केसो बल्लाळ यानें गांव खराब केल्यासंबंधी, जानोजी पवारकडे अवसे येथील ठाणें देण्याविषयीं माणकोजी बंडगर यास, कोनेररावाच्या शेतास कथला न करण्याबद्दल उत्तराजी भोसले यास, कृष्णराव मारवाडी मोदी यास रहदारीचें दस्तक (६४६); पिलाजी गणोजी, देवजी पिलाजी व गुणाजी बहिरजी शिर्के व कान्होजी रामोजी शिर्के यांच्या देशमुखीच्या वतनाबाबत, महादजी गणेश यास शेत, निळो रवलनाथ फडणीस, शामराजी चंद्रभान यांना मोकासें (६४७); आप्पाजी गोसावी, मोरोबा गोसावी, सखाराम गोसावी, आनंदा नायकीण, बापूजी सोनाजी व जनाजी राम प्रभू यांना इनामें, जगजीवन बाळकृष्ण यास मोकासा, गोविंद महादेव सभासद यास शेत सनद (६४८).

चिठ्या— १५७०, ५९८; देवजी सोमवंशी व काळोजी भोसलेकडे पत्रें नेणाऱ्या जासुदांना मसाल्याची (६०६); बाजीराव प्रधान व सेनापती यांना मसाल्याच्या (६१५); जोगोजी जाधव व मकाजी भणगे यांना आणावयास गेलेल्या हुजऱ्यांना (६१८-१९, ६२८); कृष्णाजी पवारकडे पाठविलेल्या जासुदांना मसाल्याची (६३४).

तलब— मकाजी भणगे यास (१६१४).

ताकीदपत्रें—मकाऊबाईस उपसर्ग न देण्यासंबंधीं रंगोजी जाधव यास व बाबती मुकासे करारावद्दल दमाजी पंडित न्यायाधिश यास (१५४७); दौलतराव शिर्के, शिवाजी धालवडे यांच्याकडील सरंजामाबाबत (५८७); नरहरी रामच्या सरदेशमुखीविषयीं महालांस (६०९).

दस्तक— दत्ताजी व कुसाजी यास हरजिनसी (१६०३).

निवाडपत्रें— त्र्यंबक, रामजी व संताजी गोपालजी थोरात यांच्या मोकदमीच्या वतनासंबंधी (१५५३-५८).

नेमणुका— गोविंद यास किल्लेहायचा सुभा, रामचंद्र कृष्ण यास शामजी हरीची मजूम (१५९०).

पत्रें— भागानगरची सरदेशमुखी फत्तेसिंग भोसले यास दिल्यासंबंधी, आनंदराव पंडित यास हरसूल दिल्याबद्दल चिमणाजी राजाज्ञा यास (१५४२); पैठणचे उपाध्येपण गोविंद जोशी वगैरे पैठणकर ब्राह्मणांना दिल्याविषयीं (५४३); ताजुदीअलीखानास चौथ सरदेशमुखीची तोशिष न देण्याबद्दल, किल्यांच्या तनख्याविषयीं (५४५); महादजी गुरवचा वाडा परत देण्याबद्दल महादजी नाईक यास (५४६); विठ्ठलदास गुमास्ता याच्या वरातेचा ऐवज देण्यासंबंधी बाजीराव पंडित प्रधान यास (५६८); वाकोजी ढमढेरे यास आनंदरावाकडे सत्वर जाण्यासंबंधी व धीराजी पवार यास भेटीस येण्याबद्दल, साबाजी नाईक निंबाळकर यास इनामाबाबत (५७५); अंताजी नरसिंह यास श्रीच्या दर्शनास येण्याविषयी व त्याच्याबरोबर स्वार देऊन त्यास पोहोचविण्यासंबंधी सिदोजी थोरात यास (५९६); सूरसिंग व जयसिंग भोसले यांना भेटीस येण्याबद्दल (५९७); कान्होजी आंग्रेकडील हुजूर ऐवजाबाबत (६००); अर्जुनजी भोसले यास फौजेत सामील होऊन स्वामीकार्य करण्याबद्दल (६०१); महादजी नाईक निंबाळकरची माणसें

दप्तर अंक २

पुडकें क्र. ३—चालू

मारल्याबाबत मोकदमास, मकडईकर गोडच्या पारिपत्यासाठीं सैन्यास सामील होण्याबाबत अर्जुनजी भोसले यास (१६०२) ; खंडेराव दाभाडे यास ससैन्य सामील होण्यासंबंधीं देवजी सोमवंशी व काळोजी भोसले यांना (६०५) ; खंडो बल्लाळच्या कुरणास उपद्रव न करण्याबद्दल, गोविंदजीच्या कर्जाबाबत संताजी आटोळे यास, कान्होजी धरफळेचा हिशेब रूजू करून देण्यासंबंधी केसो मल्हार यास (६०८) ; जीवनराव शंकर याजकडील ऐवजाबाबत (६०८, ६१३) ; बाळाजी पंतास औंधी स्वामीचे भेटीस प्रथम पाठवून आपण दसऱ्यानंतर येण्यासंबंधी खंडोजी जगताप यास (६११) ; अंताजी गोविंद याच्या कर्जाबाबत नागोजी यादव व सुभानजी निकम यांना (६१२) ; नरसोजी पालकरच्या कर्जाबाबत, बाल किसन संतोषराव याची मोती परत देण्यासंबंधीं, सवाई जयसिंगच्या कमाविसदारास उपद्रव न देण्याबद्दल (६१६) ; मकाजी व महादजी यांना तंटा इन्साफीकरिता हुजूर पाठविण्याबद्दल जोगोजी जाधव यास (६१७) ; फौजेसह विजयादशमीस पंढरपूरचे रोखे येण्यासंबंधीं बाजीराव प्रधान व खंडेराव दाभाडे यांना, भेटीस येण्याबद्दल जानोजी भोईटे यास (६२०) ; खंडेराव दाभाडेबरोबर फौजेसह मसलतीस जाण्याबाबत व हुजुरीं येण्याबाबत धीराजी पवार यास, हत्तीचे खंबाऱ्याचे ऐवजाबाबत जीवनराव शंकर यास (६२१) ; मिरजकरांस सामील होऊन गनिमास नतिजा देण्यासंबंधीं सिदोजी थोरात यांस (६२२) ; येसाजी घाटगे व धीराजी पवार यांना भेटीस येण्याबद्दल, जीवनराव शंकरकडील ऐवजासंबंधीं, रामोजी घाटगे यास धामधूम न करण्याबाबत, पटलोजीची घोडी बहुमानास दिली त्यासंबंधी, इस्लामपूरच्या ऐवजाची बेगमी करण्यासंबंधीं सिदोजी थोरात यास (६२४) ; सेखोजी लोंढे यास दिलेल्या घर ठिकाणासंबंधीं साकरोजी व पिराजी लोंढे यांना, सुलतानजी निंबाळकर यास किल्ले सातारच्या मोकाश्यासंबंधीं (६२५) ; हत्तीच्या अंबारियाच्या ऐवजाबद्दल जीवनराव शंकर यास (६२७) ; नारो शंकर पंडितव्या साहोत्रा वतनाबद्दल मानसिंग खुळे यास (६३०) ; स्वारानिशी सेनापतीस सामील होण्याबद्दल देवजी सोमवंशी यास (६३५) ; फौज सज्ज ठेवण्याबद्दल चिमणाजी राजाज्ञा, सिदोजी थोरात वगैरेंना (६३६) ; चंद्रभान बेलदारानें सबुवा गोसाव्यास दारु पाजल्याबाबत सयाजी जाधव यास (६३७) ; श्रीनिवास पंडित यास वराडचा बाबती सरदेशमुखीचा जिल्हा दिल्याबद्दल कान्होजी भोसले यास, विठ्ठल शिवजी या कमाविसदाराजवळ जिल्ह्याचा वसूल देण्यासंबंधी तेथील जमीनदारांना, व्यंकटेशभट व निबाद्रीभट यांची योग्य संभावना करण्याबाबत कृष्णाजी नारायण मजमदार यास (६३८) ; खान अलमखानकडून जादा वसूल न घेण्याबद्दल धर्मोजी देवकांते यास, खान वालाशान मुतवरखान याजकडून ज्यादा वसूल न घेण्यासंदंधी मुकासे व सरदेशमुखीच्या कमाविसदारास, रामचंद्र मुस्तफीकडून चौथाईचा ज्यादा वसूल न घेण्याबद्दल, निजामनमुलुकच्या मुलुखांत धामधूम न करण्याबाबत सेनापति, पिलाजी गायकवाड, कंठाजी कदम यांना, रामसिंग मुनशी यास दिलेल्या जहागिरीबद्दल (६४१) ; प्रधान व सेनापति यांना फौजेनिशी पंढरपूरचे रोखे येण्याबद्दल (६४२) ; सिदोजी थोरातकडून त्रास दिला जाणार नसल्याबद्दल रामोजी घाटगे यास, बाळाजी घाटगेच्या तनख्याच्या गावास उपद्रव केल्याबाबत सिदोजी थोरात यास, देवजी सोमवंशीच्या सरंजामांत रोखे न करण्याबाबत खंडेराव दाभाडे यास, व देवजी सोमवंशी यास रोखे मना केले जातील व सेनापतीबरोबर मसलतीस फौजेनिशी जाणेसंबंधीं (६५०).

ोमीन यास सरकार भेटी व हासील वगैरे बाबत (१६२९).

वमणाजी राजाज्ञा (१५९४) ; नारो राम मंत्री (६१०).

गराव उद्धव यास मुकासा इनामें व शेत सनदा दिल्याची (१५५१) ; हशम लोकांना वस्त्रे दिली त्यासंबंधीची (५८८) ; विजयादशमीस स्वारीस नजर केलेल्या लोकांची (६२३).

खमाजी पाटील यांस (१५८३–८५).

१५९३) ; भगवानजी निकम, तानाजी पांढरे वगैरेंना (६४९).

णोजी भोसले (१५८०) ; सिदोजी पोळ यांना (५९२).

ल्हार रायाजी यास (१६३२).

दप्तर अंक २

पुडकें क्र. ३-अ

का. सं. १६४१–१७७९ (१२९), सु. ११२०, इ. स. १७१९–२०.

अभयपत्रें— जोत्याजी केसरकरच्या कमाविसदारानें मुलुखात धुमधाम केल्याबाबत तेथील वतमदार व रयतेस (१६५१) ; विजापूर प्रांती बुबाजी मोहितेस ससैन्य पाठवून आबादानीचा कौल दिल्याबाबत (७३४) ; मुकदमीच्या तंटयाबाबत नाईकजी बरगे यास (७५६).

इनामे— बजाजी नाईक (१७२३) ; गरीबपुरी व जश्रामपुरी गोसावी (७२४) ; कोट इस्लामपूरच्या लोकांना वेतनांत जमिनी (७३२) ; शामजी गोविंद अत्रे, बाजी सामराज व गणेश शिवदेव (७३३) ; भवानी महंत पुसेसावळीकर (७३६) ; रघोजी तळेकर (७७२–७५) ; परमेश्वरीदास लोहार, सिदोजी शिंदे (७७४) ; सिदोजी थोरात (७७९).

चिटणिशी पत्रें—वेळापूर परगण्यांत केलेले रोखे मना करण्याबाबत साबाजी नाईक निंबाळकर यास, कासेगांवच्या मोकदमास सनद (१६५४) ; वागमोडे, काकडे यांना मोकासें, जमेनिस दिमत सरलष्कर यांस गांब करार, गणेश रखमानंद व जगन्नाथ चिंतामणि यांस बाबती मुकासा करार (६६१) ; रायाजी जाधवकडे मोकासे करार, पंचमहालच्या जकातीबाबत कान्होजी आंग्रे यास (६६६) ; सुलतानजी निंबाळकरकडील सबनिशी काशी शिवदेव यास, निळो कृष्ण प्रभू यास जमेनिसी, गुलाब शिसे व तबकीर पावल्याबद्दल कान्होजी आंग्रे यास, रामभट गोपाळभट यास इनाम (६७२) ; लखमाजी गरुड, भिकाजी काकडे, मल्हार जगजीवन व शामजी उमाजी यांना इनामें, सुभानजी महार्णवर यास सरलष्करकडील मजमू (६७३) ; महादजी घाटगे यास शेत सनद, गणई बोरकर यास वेतनाऐवजी मोकासा, नारो पंडित सचिवाचे राणोजी देवकांतेकडून घेतलेले नगद, कापड व घोडी परत देण्याबाबत (६७६) ; पुजाजी यशवंत, सखो विठल, देवजी आटोळे यांकडे मुकासा करार, विठल विश्वनाथ , लिंगोजी महाडिक, विश्वासराव बल्लाळ यांना इनामें (६८२) ; पुजाजी यशवंत यास जमेनिसी, गणेश रखमानंद, जगन्नाथ चिंतामणि, होनाजी अनंत यांना मोकासें (६८३) ; गंगाधर रुद्र यास सिदोजी निंबाळकरची जमेनिसी, बाजी सामराज यास मुकासा, महादजी पवार, खंडोजी शिंदे यांना शेत सनदा, होनाजी सेनाकर्ते यांच्या लष्करातील टांकसाळीकडे कृष्णाजी नाईक सावकाराकडील मुतालिक दिल्याबाबत (६८७), विठोजी शिर्के, राघो स्वानंद गोसावी यांना इनामें, खंडेराव दाभाडे यास मुकासा (६८९) ; होनाजी अनंत सेनाकर्ते, श्रीनिवास माधवराव, देऊबाई भोसले, बाळाजी विश्वनाथ प्रधान यांना मोकासें, श्री बहिरव व होनाजी अनंत यास इनाम व मुकासा (६९०) ; खंडेराव दाभाडे, केरोजी पवार, कृष्णाजी दाभाडे, सिदोजी निंबाळकर वगैरे सरलष्कर व सरदारांना पंत प्रधानास सामील होण्याबाबत, पिलाजी जाधव, दामाजी माणकेश्वर व भोजजी उघडे यांना समाधानपत्र (६९२) ; बाळाजी पंडित प्रधानाकडे कर्जाच्या ऐवजाऐवजी बाबती महाल, सेखोजी शिंदे यास मुकासा (६९४) ; सुमंत, नारो गंगाधर, शिवाजी रुद्र दप्तरदार यांस मुकासें, परगणे पाटणकराकडील देशमुखीच्या शिक्क्याचे हक्क व इनामाबाबत (६९६) ; जमावाचे बेगमीस विश्वासराव बल्लाळ यास मुकासा, पिलाजी जाधव यास मुकासा व सरंजाम, जकातीच्या ऐवजाबाबत महालास पत्रें (६९७) ; विश्वासराव बल्लाळ यास मुकासा, जकातीच्या ऐवजाबाबत ढमढेरे यास (६९८) ; महादजी कृष्ण मुतालिक, होनाजी पंडित यांना मोकासें, केरोजी पवाराची मजमू रंगो त्रिबक यास, सिधराज मजमदार, बाळाजी पंडित प्रधानास वेतनाऐवजी गांवे (६९९) ; प्रधान यास खासा वेतनाऐवजी गांवे, विश्वासराव बल्लाळ यास मुकासा, दादाजी भास्कर यास इनाम (७००) ; बाबती व जकातीच्या वसुलाबाबत मानसिंग मोरे, संताजी व रायाजी जाधव यांना, रंगो त्रिबक यास केरोजी पवाराची मजमू, चिमणाजी पंताकडे महाल मोकासें करार (७०१) ; महादजी कृष्ण याकडील मुकाश्यांना उपसर्ग न देण्याबाबत, वेसगांवच्या मोकाश्यास उपसर्ग न देण्याबाबत भोजजी उघडे यास, पिलाजी जाधव यास समाधानपत्र, प्रधानाकडे मुकासा व बाबती (७०२) ; बंदुला व कोंडाजी चौधरी, हेमराज, विठ्ठल, गंगाराम यशवंत व फकिरचंद यांच्या लांकडावरील जकातीबाबत, तिमाराव हरकारे यास चौथाई मुकासा, जळगांवच्या दिवाणीचे काम गोविंद इत्यादि देशपांडयांकडून घेण्याबाबत, आनंदराव पंडित सुमंताकडे महाल मुकास, जाफर मिरखानाकडे दोन गांवांची चौथाई (७१०) ; खान वालाशान तुरुकताजखान याजकड सरदेशमुखी,

दप्तर अंक २

पुडकें क्र. ३-अ—चालू

आनंदराव पंडित यास मुकासें, महादजी चव्हाण यास तलब दिल्याबद्दल व कारभाराच्या सनदेबद्दल सुलतानजी निंबाळकर यास (१७२०) ; नारो प्रल्हाद यास वेतनाऐवजी गांवें, फत्तेसिंग भोसले, रंगराव उद्धव यांना गांवे, यादवराव मुनशी यास बाबती, बाल जोशी, महंमद हयात कालेखान यांना इनामें, येसजी जाधव व आंबाजी पिंगळे यांना शेत सनद (७२१) ; नारायण कनोज, केशरसिंग कोंडाजी व बंघुला चौधरी वगैरेंकडून घेतलेल्या लाकडावरील जकातीबाबत अधिकाऱ्यांना, यादव नागनाथाची घोडी व मसाला देण्याबद्दल संभाजी जाधव यास, महिपाजी आनंदराव यास मूर्तजापूर करार (७२२) ; नारायणभट व कृष्णभट गोखले, मुरार गणेश कुलकर्णी, सुभानसिंगराव, गोविंद विठल, अनाजी नारायण यांना इनामें, प्रतापराव बहादुर जीवन हजारी यांस मोकासें (७२८); सुभानसिंगच्या कर्जाबाबत नेर, भामरे वगैरेच्या लोकांस, सोनगिरीची आबादानी करण्याबाबत तेथील जमीनदारांना अभयपत्र, शंकर पाटील यास इनाम (७२९) ; गोविंद विठ्ठल यास इनाम, शंकरभट सकळकलेची वस्तभाव केसो नारायणच्या स्वाधीन करण्याबाबत नाशिकच्या जमीदारास, अनाजी नारायणच्या इनामास कथला न करण्याबद्दल भोसले यास (७३०) ; सारंगगडच्या तनख्यास मुकासें करार, तसेच त्रिंबकराव धायगुडे, यशवंतराव महादेव यांना मुकासे, अंताजी विठ्ठल, मोरो नरहरी यास बाबती, फत्तेसिंग भोसलेकडील बाबतीच्या मुलुखास उपसर्ग न देण्याबाबत सिदोजी थोरात यास, यादो गोपाळ यास मोकासा (७४९) ; येसजी जाधव, नरसिंगराव तानाजी थानक, तुळजापुरी श्रीस इनामें, तेथील कमाविशी गोविंद त्रिंबक यास, फत्तेसिंग भोसलेस मोकासा (७५०) ; चितो शंकर यास श्रीची पालखी महोत्सवाकरिता देण्याबद्दल गुरवांना, किल्ले महिमानगडास मुकासा, नारो राम यास बाबती व सरदेशमुखी, मानसिंग भानराव याची गुरें वणगोजी निंबाळकरने नेली ती परत करण्याबाबत साबाजी निंबाळकर यास (७५१) ; गोविंद त्रिंबक यास कमाविशी, परशराम भोसले यास तलब (७५२) ; दाऊजी वाळके यास किताब, तुरुकताजखान यास सरदेशमुखी, सातारा येथील गुरवांस सनद (७५३) ; खंडेराव दाभाडे यास इनाम, कृष्णाजी व धीराजी पवार यांस फौजेनिशी त्रिंबकराव दाभाडेबरोबर चाकरी करण्यासंबंधी (७५५) ; ऐवज पाठवून देण्याबद्दल कान्होजी आंग्रे यास आज्ञापत्र, शेताच्या कज्याबद्दल सोनजी गरुडकर यास (७५७) ; कृष्णाजी पवार यास सरंजाम व आबाजी मोहिते यास इनाम दिल्यासंबंधी (७७६).

चिठ्या— (१६५९, ६७८, ७१९) ; कान्होजी आंग्रेकडे पाठविलेल्या लोकांस मसाला (७२७) ; (७५८, ७६०).

तलब— कान्होजी आंग्रे व मोरो केशव यांस (१७७७).

ताकीदपत्र— वरातेचा ऐवज पाठविण्यासंबंधी रायाजी व काळोजी जाधव यांना (१७०३).

निवाडपत्रें— विश्वनाथभट व नरहरीभट यांच्या ज्योतिषपणाच्या वतनाबाबत (१७४५, ४६).

नेमणुका— दाऊजी इंदुलकर यास नारायणगडचा हवाला (१७२५); कान्होजी राजे शिर्के यास सारंगगडची किल्लेदारी (७४०).

पत्रें— साबाजी नाईक निंबाळकर यास फौजेनिशी येण्याबद्दल (१६५३) ; ठोबसे येथील महारकीबाबत कृष्णाजी विठ्ठल यास (६६२) ; व महारकीच्या तंटचाबाबत कृष्णाजी विठ्ठल यास हुजूर आणविल्याबाबत (६६३) ; घोडीबाबत अंदेशा न बाळगण्याबाबत रघू सोनार यास, मुलुखाच्या वसुलासंबंधी ठराव करण्यासाठी प्रतिनिधीकडे जाण्याबद्दल नागोजी घाटगेस, शामलाशी तह करण्याबाबत काळोजी शिर्के यास, नवलोजी काटे यास इनाम व त्यांच्या इनामास उपसर्ग न देण्याबाबत दुर्गोजी महाडिक यास, आऊबाइ, संभाजीबावा व विसोजीबावाचे चालविण्याबद्दल मकाऊस, जीवनराव देशपांडे याच्या बारशी येथील तंटचाबाबत सुलतानजी निंबाळकर सरलष्कर यास, गुजरात व माळव्याची बाबती व सरदेशमुखी बाजीराव पंडित प्रधानाकडे व निमे मुकासबाब चिमणाजी बल्लाळकडे दिल्याबद्दल (६६४) ; मानसिंग हाके याचे चालविण्याबाबत फत्तेसिंग भोसले यास व बाबती सरदेशमुखीचा वसूल उदाजी पवारकडे देण्याबाबत (६६५) ; सुधागडच्या वसुलाबद्दल कान्होजी आंग्रे यास, नागोठण्यास वाण्यांचे बैल जातात त्यासंबंधी रामचंद्र

दफ्तर अंक २

पुडकें क्र. ३-अ—चालू

सेखोजी वागमोडे यास (४०४०); सयाजी गुजर याकडून दरुणीमहालाची चोरून नेलेली घोडी परत करण्याबाबत नीळकंठ जाधव सांडणीस्वार यास (०४२); सेख महंमद यास वस्त्रें पाठविल्याबाबत (०५०); मनसुब्यासाठीं यशवंतराव व बाबूराव दाभाडे यांना हुजूर बोलावणें बाबतचें, सुभानजी वागमोडेचे चालविण्याविषयीं संताजी वागमोडे यास (४०५५); जानोजी व आण्णाजी वेताळ यांमधील पाटीलकीच्या कज्ज्याबाबत (०६०–६७); फत्तेसिंग भोसलेच्या मोकाश्याचा वसूल कमाविसदाराजवळ देण्यासंबंधीं (०६८,०७०); राणोजी जाधव याच्या कर्जाबाबत व जाधवाच्या वतनी गांवाविषयीं कृष्णाजी आटोळे यास (०७१); यशवंतराव दाभाडे यांजबरोबर हुजूर येण्याविषयीं रघोजी कदम यास, सुरतेचा बंदोबस्त करण्यासंबंधीं दमाजी गायकवाड यास (०७२); दरुणीमहालाकडे पाठविलेले पैसे मिळाल्याबाबत सखोजी भालेराव यास (०७३); हुजूर येण्याविषयीं पिराजी सर्ज्याराव घाटगे यास (०७५); सुभानजी जगताप याची वस्तभाव परत करण्याबद्दल खंडोजी माणकर यांस, व त्यास वस्तभाव शोधून देण्याबद्दल ताकीद करण्यासंबंधीं बाजीराव पंडित प्रधान यास (०७९); भगवंताचे घरांतील सहा जण कोण कोण आहेत ते कळविणेंबद्दल धोंडो देशपांडे यास (०८५); उंदेरी हस्तगत करण्याविषयीं सेखोजी आंग्रे यास (०८६); चिमणाजी बल्लाळच्या मोकासें महालांत धामधूम न करणेंबद्दल रखमाजी भापकर यास, येसाजी इंगले यास हुजूर बोलाविलेबाबतचें (०८७); दौलतराव शिर्के यास हुजूर बोलाविलेंबाबतचें (१००); जमावानिशी सरलष्करास सामील होण्यासंबंधीं आनंदराव सोमवंशी, काकडे, वागमोडे, आटोळे वगैरे सरदारांना (१०१); शामसिंग राऊळ दौडाईकर यास हुजूर बोलाविलेंबाबतचें (१०२); गंगाधर गोविंद यास हुजूर बोलाविलेबद्दल, रायगड येथील देवस्थानाची पूजा अर्चा, नैवेद्य, यात्रा सुरळीत चालविण्याबद्दल शामराव रुद्र यास (१०३); रत्नोजी पांढरे यास हुजूर बोलाविल्याबाबत (१११); बेगमीविषयीं कान्होजी शिर्के यास (११३); मौजे भिवंडी व पागरी या दोन्ही गांवच्या सिवेबाबतच्या कजियासंबंधीं (११७); उदाजी व कृष्णाजी पवार, नारो विठ्ठल यांस गुजरात प्रांतीं खासगीच्या बंदोबस्तास गेले त्यांना सामील होण्यासंबंधीं सुरसिंग भोसले यास, गंगा कुणबीण, रायाजी चव्हाण वगैरेंना शुद्धिपत्र देण्याबद्दल देशमुख देशपांडे यांना (१२४); जिवाजी विश्वनाथ यास राहूं देण्याबद्दल आप्पाजी माणकेश्वर यास (१२८); सुरतेचा बंदोबस्त बळकट करण्याविषयीं दमाजी गायकवाड यास (१२९); नारो विठ्ठल प्रभू व उदाजी पवार यांकडे खासगीचे महाल सांगितल्याबाबत जमीदार व सरदार यांना (१३१,१३२); सुपेकरांशीं शिवेबाबत तंटा न करणें म्हणून नांगेच्या मुकदमास (१४१); भिवजी कलंबेस वसुलाचा तगादा न करण्याबाबत मुकदमास (१४६); वराड प्रांत राणोजी भोसलेस देण्याबाबत, नारो पंडित सचिवाच्या साहोत्र्याचा वसूल कमाविसदाराजवळ देण्यासंबंधीं (१५३).

मसाला चिठ्ठ्या—(४०२७,०२८,०३८,०५१,०५६,०५७).

मोकासें— रामचंद्र मिरघे, कारकून जामदार दिमत भांडारगृह (३९९१); मल्हारराव कृष्ण (४०१६); किल्ले रायगड व कोट महाडच्या तनख्यास (०२३); आनंदराव रघुनाथ पंडित (०२४); रामाजी गणेश मुतालिक, आबुराम पंडित अमात्य, जगजीवन बाळकृष्ण काकडे, यशवंतराव दाभाडे (०३९); जनार्दन फडणीस (०४०); यशवंतराव महादेव पोतनिवीस, फत्तेसिंग भोसले (०४२); रामाजी गणेश, जनार्दन जगजीवन फडणीस (०४३); रुस्तुमराव जाधव (४०५३, ५४); बाजीराव पंडित प्रधान (०७६); नीळकंठ रवलनाथ फडणीस (०९९); यशवंतराव खासनीस, आनंदराव पंडित सुमंत (१२७); नारो राम फडणीस (१२८); देवराव घनःशाम (१३६); फत्तेसिंग भोसले (१३७,१३८), (१४७); रामाजी दामोदर (१४८); किल्ले वंदनचे तनख्यास, आनंदराव रघुनाथ पंडित सुमंत (१४९); किल्ले रायगड व किल्ले प्रचंडगड, निळो रवलनाथ फडणीस (४१५४–५५).

याद्या— उमाबाई व यशवंतराव दाभाडे यास बहुमान दिल्याबाबतची (४०२२); विजयादशमीच्या नजराण्याची (१३०).

रवासुदगी— (४००७).

दप्तर अंक ५

पुडकें क्र. १—चालू

रोजकीर्द बंद—(४०३३).

वतनपत्रें— सदाशिव यमाजी यास नाडगौडकीचें (४०४४–४८); जानोजी वेताळ यास पाटीलकीचें (०६९); नारो शंकर पंडित सचिव यास साहोत्र्याचें (०७९,०९१–९६); येल्होजी खेलोजी काले यास मोकदमीचें (११४–१६); मावजी फिरंगोजी मावलदकर यास मोकदमीचें (११८–२३); फकीर महंमद यास आतारांचे मेहेतरकीचें (१३९–४०).

वराता— रवासुदगी व वराता (४००३,००४).

वेतनचिठी— (४०१३).

सनदा— बुवाजी गायकवाड याच्या म्हशीसंबंधीं बेरडास हुजूर तलबाची (४००१); दर्याजी पवार याच्या मुकाश्याची, बाजी भोसले यास शेताची, रखमाजी शिर्के यास जमीन इनामाची (०१७).

सरदेशमुखी—नरहरी राम (४१०४–०७,१०९).

समाधानपत्रें—मुलतानाजी पांढरे यास (४०४२); दुर्जनसिंग यांस (१३३); फिरंगोजी निंबाळकर यांस (१५०).

सरंजाम— रघोजी भोसले (४०८२–८४, ९८, १११); कोंडजी यादव सोलसकर (०८५); फत्तेसिंग भोसले (१४२,१४३); राणोजी भोसले (१५१,१५२).

साहित्यपत्र—राणोजी जाधवाविषयीं कृष्णाची आटोळे यास (४०७४).

पुडकें क्र. १-अ

कां. सं. ४१५६-४३१३ (१५८), सु. ११३४, इ. स. १७३३-३४.

इनामें— खंडो कृष्ण यास वेतनांत जमीन इनाम (४१६७); बनसीपुरी गोसावी यास कर्जाचे ऐवजीं गांव, संताजी तावरे (१७०); रामभट हरडीकर (१७२); महिपतराव बापूजी प्रभू, काकाजी त्रिंबक, मोरो मल्हार, मोरो नरहरी (१८५); सैद आलवी पिरजादे (१९७); सखो बापूजी खलदकर (२०२); शामदेव नरसिंह देव, सुभानजी म्हसके (२०८, २१४); चिंचवडकर देव (२४१); जनार्दन देवजी गालफाडे (२४७); गोपालभट दामोदरभट खाडे (२७५,२७६); दुर्गाबाई जाधव, सिंदखेडकराची कन्या सुलक्षणाबाई (२७९); सैद हशम पिरजादे (२८२); बापूजी महादेवची कन्या काशीबाई (२८६); बापूजी महादेव (२९१); जमन मेहेतर, नीळकंठभट अनंतभट व यादवभट पुरंदरे (३००); मानसिंग यशवंतराव जाधव (३०२); हुजरात शिलेदार रंगो त्रिंबक कुलकर्णी (३०४); नायकीण कलवंती (३०६).

कौलपत्र— आबाजी सर्जेराव घाटगे यास (४२८८).

चिटणिशी पत्रें—अंताजी कृष्ण, आनंदराव सखदेव यांना मोकासें, गोविंद व रामजी मल्हार यांना कुलकर्णिकीचें वतन (४१८६,१८७); म्हसके व भोसले यांना पाटीलकीचें वतन, पांडुरंग कृष्ण यास इनाम, शामराव नरसिंह यास मोकासा, निरजी यास कबिलेसुद्धां हुजूर पाठविण्याबाबत उदाजी चव्हाण यास, यशवंतराव त्रिंबक याच्या कर्जाविषयीं (१९५, १९६); अंताजी कृष्ण यास दिवाण-गिरीची नेमणूक, भिवजी संतकर यास मोकासें, फत्तेसिंग भोसले यास कोठीचें दस्तक (१९९, २००); राजेन्द्रभारती गोसावी याची मालियत परत देण्याबद्दल जमीदार व सरदार यांना, गणेश महादेव यास रघोजी भोसले यांची फडणिसीची नेमणूक (२४२,२४३); सुलतानजी जगतापासी सोयरिकीसंबंधीं जानजी भोपतराय यास अभयपत्र, दप्तरदार दिमत मजमूचे मोकासे वसुलाबाबत मुकदमास, प्रतिनिधीचे कोठीचे बैल परत देणें म्हणून फोंड सावंत यास (२५६,२५७).

चिठ्या— (४२३५,२५०,२६७).

तलब— गोपाळ नाईक, मल्हार नाईक, श्रीपत नाईक व उधो नाईक खिस्ते याचे वांटणीसंबंधीं या सर्वांना (४२८३).

दस्तक— मदारी तांबोळी यास रहदारीचें (४१८१); कुसाजी व येसाजी भोसले यांना कोठीचें (१८९,१९०).

धर्मादायपत्र—बाबा जोशी हिवरकर यास (४३११).

दप्तर अंक ५

पुडकें क्र. १-अ—चालू

निवाडापत्र—त्रिंबकजी रायाजी दळवी व कृष्णाजी व मानाजी पवार यांच्या शीवकज्ज्याचें (४३०१).

नेमणुका— हरि सखाजी यास चिटणिसी, तानको गणेश यास सवाई कटसिंग कदमराव याकडील जमेनिसी (४१६७); मोरो महादेव यास उदाजी पवार याजकडील सबनिसी (१८४); रंगो त्रिंबक यास फिरंगोजी निंबाळकर याची चिटणिसी (२१५); गणेश महादेव यास रघोजी भोसले याची फडणिसी (२४७); चंदोजी मिसाल यास जुमलेदारी तोफखानची (३०९).

पत्रें— सरकारच्या खिलार चारणीस अडथळा न करण्याबाबत सरदार, जमीदार यांना, सिऊबाई जाधव सिंदखेडकर यांच्या मुकदमी वतनासंबंधीं (४१६९); चेनाशा साहुकार मृत्यु पावला म्हणून त्याचे कर्ज त्याच्या बायकोस व भावास देण्याबाबत देशमुख देशपांडे यांना (१७१); चिंतामण थोरात याचा सरदेशमुखीचा वसूल दत्ताजी दादाजी कमाविसदार यास देण्याविषयीं परगण्यांना (१७२); अनुपसिंगाच्या मुलुखांत धामधूम न करण्याबाबत रघोजी व कटसिंग कदमराव यांस, गंगापा मुगावकरची घोडी देण्यासंबंधीं त्रिंबक हरि व राणोजी घोरपडे यांना, रायेभान परदेशी याची बायको परत करण्याबद्दल पिलाजी गायकवाड यास ताकीद करण्यासंबंधीं संभाजी भोसले यास, त्रिंबकराव सोमवंशी हिंदुरावाच्या मुकास महालांत धामधूम न करणें म्हणून रघोजी व कटसिंग कदमराव यांना (१७४); नार प्रभू, कृष्णाजी व उदाजी पवार यांना जमावानिशीं सामील होण्यासंबंधीं सुरसिंग भोसले यास (१८४); वडिलांप्रमाणेंच यश कीर्ति संपादण्याविषयीं राणोजी घोरपडे यास (१८८); गणेश व रामाजी देशपांडे, कमाजी व सिवाजी गोसावी यांना हुजूर पाठविण्यासंबंधीं जानोजी बावने यास (१९३–९४); महालानिहायचा अंमल नारो शंकर याजकडे देण्याबाबत (१९८); हरिदास मनजी गुजर सावकार याच्या कर्जाबाबत (२०१); अद्रसप्पा व गदगपा देसाई यांना कर्ज देण्यास हुजूर रवाना केल्यासंबंधी (२०२); फौजेनिशी फत्तेसिंगास मदत करणें म्हणून फिरंगोजी निंबाळकर यास, लक्ष्मणजी भोसले यास खासगी सरदेशमुखी दिली त्याबाबत जमीदारांस (२०८); सचिवांच्या साहोत्र्याबाबत सरदारांस (२०९); मोरो सुंदर कडून ऐवज देवविण्यासंबंधीं जमीदारांस, राहुजी जाधव याच्या इनामासंबंधीं सिंदखेडास, रासोजी जाधवाच्या इनामाबाबत सयाजी आटोळे यास (२१०); कल्याण भिवडी सरमोकदमीचे ऐवजाबाबत, सयाजी आटोळे याच्या शिग्याबाबत सरदारांस, आनंदराव सोमवंशीच्या मोकाश्याबाबत (२१६,२१७); खासगी महालांबाबत महालास (२१९,२२०); सिद्धेश्वरभट महाशद्धे यांच्या इनामाबाबत, येसाजी गायकवाड यास खासगी बाबती दिल्यासंबंधीं (२२१,२२२); चौलचा कोट मोंगलांस परत द्यावा म्हणून प्रधान व आंग्रे यांना (२२४); मालजी नरसिंगराव व गोदजीराव सितोळे यांच्या वतन तंटयासंबंधीं बाजीरायास, कोंकण मसलतीसंबंधीं पवार मंडळी व नारो विठ्ठल याच्या मदतीस सरदार पाठविल्याबाबत गणेश अनंत यास (२२५); आप्पाजी बालाजीचे वतनावरील कर्जाबाबत जमीदारांना, शंकरभट दादंभट लिमयेस भूमिदान दिल्याबद्दल संभाजी आंग्रे व गांवास (२२६); शामल मसलतीसाठीं आंग्रे यास शह देऊं नये म्हणून फोंड सावंत यास (२२७); नारो पंडित सचिवाच्या बाबती मुकासेबाबत, खंडोजी सालोंखीची वस्तभाव तुलाजी काळभोरकडून देवविण्याबद्दल दाभाडे, गायकवाड व काळभोर यांना (२२८); भगवंत नाईक डांगे याचे कर्ज व घराबाबत, सरकार वेताळवाडी व मेहकरचे महाल बाकीसंबंधीं जमीदार यांस, देवगण ब्राह्मणाचें कर्जासंबंधीं गांवास, सेख महंमूद याच्या मोकासेसंबंधीं, गोविंद महादेवचे कंठाळेचा पत्ता लावणेंबाबत व जमिनीबाबत मोकदमास (२२९); रत्नोजी पांढरे याच्या मोकासेबाबत जमीदारांस, चेऊलचा कोट मोंगलांस देण्यासंबंधीं संभाजी आंग्रे यास, कल्याण, भिवंडी सरमुकदमी बाकीसंबंधी नारो गोविंद, गोविंद राम आठवले व संभाजी आंग्रे यांना (२३०); प्रतिनिधीचे कोठी बैल लुटवले ते नाग सावंताकडून देवविण्याबाबत फोंड सावंत यास, महमद सेकीनच्या कर्जाबाबत कृष्णाजी आटोळे यास (२३१); कान्होजी भोसले याच्या कबिल्यास साहित्य करण्यासंबंधीं सरदार व पाग्यांस (२३२); संभुसिंग भोसले याची वस्तभाव परत करण्याबाबत आवजी कवडे यास (२३३); उदेगिरी गोसावि याचा अटकाविलेला ऐवज परत देण्याबद्दल हरि दामोदर व सयाजी गुजर यांना, तिळगुळाचे जाब (२३४); आनदंराव पंडित सुमंत यांच्या मोकाश्याबाबत महालांस, लक्ष्मण नानाजी फडणीस, चव्हाजी देवकांते यांच्या मोकासेसंबधीं

दप्तर अंक ५

पुडकें क्र. १-अ—चालू

महालास, कृष्णाजी आनंदराव याच्या मोकासेबाबत जमीदार यांस, तुकोजी इंगळे याच्या इनामासंबंधीं (४२३६-३७); परमहंस पांडुरंगाश्रम यांच्या इनामाबाबत (२३८); आनंदराव पंडित सुमंत यांच्या मोकासेबाबत (२३९); चव्हाजी बलवंतराव देवकांते याचे महालीं धामधूम न करण्याबद्दल भापकर व निंबाळकर यांना (२४०); प्रतिनिधींच्या बाबती महालासंबंधीं (२४४, २४५); कान्होजी भोसले यांचे कबिले निर्मळेहून देशी येतां साहित्य करण म्हणून सरदारांना (२४७); गांवास उपसर्ग होणार नाहीं म्हणोन कीर्तिसिंग शिर्के यास, पथाजी कडूच्या कर्जाबाबत जमीदार व सरदार यांना (२४९); गुलाबराय व मुरारदासाचें कर्ज व वस्तभाव देणें म्हणून जमीदारांस, खंडोजी व दामाजी बंडगर यांच्या मोकासेबाबत जमीदारांस (२५२); नथूराम चौधरी यास हुजूर कोठी बैलाबाबत, हुंड्याभाड्याच्या मामलतीबाबत व बेलदारावरील हुजूर पंचोत्रा व चौधरी हक्कासंबंधीं सरदारांना, सरकारी लांकडाचे रहदारीस साहित्य करण्यासंबंधीं संताजी जाधव यास (२५३–५५); भानगांव येथील मोकाश्याच्या वसुलाबाबत पाटील कुलकर्णी यांना हुजूर बोलाविल्यासंबंधीं (२५८); बजाजी आटोळे, माणकोजी उदाजी व सुभानजी आटोळे यांच्या सरंजामाविषयीं (२६४); उदाजी पवारच्या ठाण्यास उपद्रव देऊं नये म्हणून दमाजी गायकवाड व रघोजी कदमराव यांना (२६५); निळोजी भोसले याचे मोकदमीबाबत जमीदारास (२६८); जानोजी भोईटे, दादाजी मल्हार व श्रीनिवास पंडित प्रतिनिधींच्या मोकासेसंबंधीं जमीदार व सरदारांस, लतीफ नाईक याची गुरें देण्याबद्दल खंडोजी जगताप यास (२६९); कासीराव अनंत न्यायाधीश यांच्या सरंजामाबाबत (२७०); रायगडी माल पोंचविण्याबाबत कोठीवाले, लष्कर व घाटास (२७१); खंडोजी भोसले याचे मुकासाबाबत (२७२); श्रीनिवास पंडित प्रतिनिधींचे मोकासेसंबंधीं जमीदार व सरदार यांस (२७४); चिंचवडकर देवांचे इनामाबाबत, अनसाजी व पुंजाजी यांचा सपुरजी शिद्यासी वतन वादांत सपुरजीस पाठवणें म्हणून जमीदार व सरदार यांस (२७५--७६); लुयाजी पांढरे याचे मोकासेबाबत (२७७); मुकासबाबेचे तहाप्रमाणें वर्तणूक करणें, उपसर्ग न देणें म्हणून आनंदराव सोमवंशी यास खास दस्तखती (२७८); चव्हाजी बलवंतराव देवकांते याच्या मोकासेबाबत आनंदराव सोमवंशी यास (२८१); सैद खोजे अहमदच्या इनामासंबंधीं (२८२); दमाजी पिसळचे मोकासे गांवीं धामधूम न करणेंबाबत आवजी कवडे व केसो गोपाळ यांना, रघोजी गुरवाची गुरें देण्याबद्दल मोकदम व संकराजी चव्हाण यांना (२८३); सरकारी शिस्यास जकात तगादा न करण्यासंबंधीं कमाविसदार यास (२८४); कोंकण प्रांत रघोजी व गोंदजी भोसले याचे स्वाधीन करून बाबूराव विश्वनाथ यास बंदोबस्तास पाठविले त्याबाबत किल्यांस व महालांस (२८५); हिंदुराव घोरपडे यांच्या लष्करांतून मोहनसिंग मुलीस आणतील त्याचें साहित्य करणेंस सरदार, शिलेदार, कमाविसदार वगैरेंना, जानोजी भोईटे यास मोकासा दिल्याबाबत (२८७); चंद्रभान परदेशी यास गल्ला आणूं देण्यासाठीं (२८९); इंदूर, भागानगर पेठा लुटल्या ती मालियत देण्याबाबत गोरखोजी भापकर यास, मानवत पेठा मारल्या ती मालियत परत देणें म्हणून रघोजी भोसले यास (२९०); कृष्णाजी महानभावाच्या शिष्याचा दंड परत देणें म्हणून जमीदार व सरदार यांना (२९२); आंबाई पाटलीण कालाइचे वतन गहाणाबाबत, धीराजी पवारकडून हत्ती व वस्तभाव परत दिली जाईल म्हणून दौलतराव शिर्के यास (२९६); जिऊबाई–गोविंद अनंत याची स्त्री हिच्या कुलकर्ण वतनाबाबत, दर्याजी पवारच्या पाटीलकी वांटणीबाबत (२९७); शंकराजी, महादजी कासी व विठ्ठल नारायण कावले यांच्या कुलकर्ण वतनाच्या वादासंबंधीं (२९८); अंतोबा नाईक गुंडे यास गुजरात बाबती सरदेशमुखीचा एवज देणें म्हणून यशवंतराव दाभाडे यास (३०३); केशवराव यास पाठविण्याबद्दल मुरारजी हिंदुराय यास, नारो विठ्ठल व पवार यांजबरोबर हुजूर येण्यासंबंधीं होनाजी पारखे यास (३०५); कृष्णाजी नाईक जोशी यास बाबती सरदेशमुखी गुजरात पैकीं एवज देण्याबद्दल यशवंतराव दाभाडे यास (३०७); अमलाबाबत फौजदारास पत्र पाठविल्यासंबंधीं खानाजी पांढरे यास, राहुजी हंबीरराव जाधव याच्या इनामासंबंधीं (३१०); फौजेनिशी स्वामी दर्शनास येण्याबद्दल उदाजी चव्हाण, व्यासो भुजबलराव व संभुसिंग जाधव यांना (३१२).

मोकासें— महिपत सोनाजी (४१६७); बजाजी आटोळे, फत्तेसिंग भोसले, चिमणाजी व नारायणजी थोरात (१७३); कुसाजी व येसाजी भोसले (१८०); विठोबा नाईक काकडे यास हुजूर खाजगीकडे (१८५); आनंदराव सोमवंशी (२०१); शामराव नरसिंह यास जमावचे बेगमीस

दप्तर अंक ५

पुडकें क्र. १–अ—चालू

(४२१८) ; रघोजी भोसले यास जमाव बेगमीस (२४६) ; आनंदराव सोमवंशी, दादाजी मल्हार, सयाजी आटोळे (२४७) ; दिंमत मजमू (३०४) ; फत्तेसिंग (३०९).

याद्या— पत्रांच्या (४२१२, २१३) ; तिळगुळाचे जाब (२५१).

रोजकीर्द बंद—(४२६६, २८०, २९३).

वतनपत्रें— संताजी मकाजी, संयाजी हिरोजी, सिवाजी पुजाजी, केरोजी सखोजी आटोळे यांना मोकदमीचें (४१५७–६६) ; नारो पंडित सचिव यास साहोत्र्याचें (१७५–७९) ; गोविंद व रामाजी मल्हार प्रभू कुलकर्णी यांस (१८२, १८३) ; संताजी व जिवाजी नरसोजी मोरे यांस मोकदमीचें (१९१, १९२) ; इमाम बावाखान यास मुकदमीचें (२२३) ; भगत पुजारी श्री फिरंगाईचें (२४८) ; सिदो हणमाजी, माणको नर्रासिगराव, मदनाजी कायदेव वाठारे यांना पाटीलकीचें (३०८).

वर्षासन— नरसिंहाचार्य नारायणाचार्य कोमटी यास (४२७३).

वेतन चिठी—(४२९५).

सनदा— विठोबा नाईक वाकडे यास खासगी महाल, जिवाजी मोरेश्वर यास फिरंगोजी निंबाळकर याच्या दप्तरदारीची (४२४६).

सरदेशमुखी—नरहरी राम (४१७१).

सरंजाम— लुयाजी पांढरे (४२०३,२०७) ; फिरंगोजी निंबाळकर (२०४, २११) ; खंडोजी भोसले (२०५, २०६) ; त्रिवकराव सोमवंशी (२९४) ; फत्तेसिंग भोसले , खंडोजी बंडगर (२९९).

पुडकें क्र. २

का. सं. ४३१४-४४४५ (१३२), सु. ११३५, इ. स. १७३४–३५.

अभयपत्रें— अकुलनेर येथील मोकदम व रयतेस गांव व खिस्त्याचे तंटचामुळें तजावजा झाल्याबाबत (४३१७) ; मोकदमीच्या तंटचांत सिवजी व जगताप यांस अभयपत्र (३४३, ३४४) ; पेठेचे आबादानी करितां आंबेटेक पेठेंतील सेट व महाजन यास (३५८) ; सरकारी फौजांनी उपसर्ग दिल्यानें कसब सोनपेट (पा नांदेड) खराब झाला त्याच्या आबादानीकरितां जमीदार यांना (३९७).

आज्ञापत्रें— सिदापा जंगम यास उपसर्ग न देण्याबद्दल व कर्जाचा निकाल करण्याबद्दल देवजी, संताजी आटोळे यांना (४३४५).

इनामें— नारायणभट ठकार (४३२२, ३२४) ; सेखखान महम्मद फकीर (३४२) ; पाथरीचे ब्राह्मण (३४६) ; रामाजी व नारो मल्हार कुलकर्णी (३५५) ; विश्वंभर गोसावी (३५७) ; अळूर व वंझरा संगम येथील सर्व ब्राह्मणांस अग्रहार व इनाम (३६९) ; सुलतान नायकीण (३८६) ; भिकनगिरी व अनंत गोसावी (४०१) ; सदाशिव नीळकंठ गोसावी (४२६) ; नारायणभट पित्रे (४३२).

कमाविसी— वेंकाजी बल्लाळ यास अंबडच्या सरदेशमुखीची (४४१९).

चिटणिशी पत्रें—मल्हार कृष्ण, मजमूच्या दिंमतींतील लेखकांस मोकासें, होनाजी ठोंबरेची घोडी त्यांचे स्वाधीन करणें म्हणून साबाजी नाईक निंबाळकर यास (४३३६, ३३७) ; शामराव नरसी याकडे कुसाजी व येसाजी भोसले यांजकडील मोकासें, दादाजी मल्हार यास मोकासें, गोविंद भट व सिद्धेश्वर भट यांना इनामें (३३८, ३३९) ; लिहिणार दिंमत मजमू यांना मोकासें (३४३, ३४४) ; नेवासें येथील सर्वब्राह्मणांस इनामें व इनाम तिजाई, नारायणभट आपसिंगकर याच्या इनामाबाबत मोकदमास (३६४, ३६५) ; बाबूराव कृष्ण याच्या शेतास खलेल न करणें म्हणून कासाऊ भोसले यास, उदसिंग परदेशीच्या कर्जाबाबत फत्तेसिंग भोसले व चव्हाजी बलवंतरावच्या कमाविसदारास

दप्तर अंक ५

पुडकें क्र. २—चालू

व जमींदारास ताकीद, दादाजी मल्हार क्षीरसागर यांचे ज्योतिष व कुलकर्णीबाबत फिरंगोजी निंबाळकर यास, देवजी दत्ताजीच्या कुलकर्णीबाबत व त्रिंबक गोपाळचें घराचें टक्याबाबत तगादा न लावणें म्हणून संभाजी आंग्रे यास, शंकरराव उदाजीच्या जहागिरीचा वसूल जास्ती न घेणें म्हणून जमीदार, आवजी कवडे, कृष्णाजी आटोळे यांना, बाबती व चौथाईच्या दिमतींतील कारकून व जामदारांना मोकासें (३७३–७५) ; जनार्दन गालफाडे, रासोजी जाधव यांना इनामें, सैद फैजुल यास रहदारीचें दस्तक, काळोजी व जयाजी यास देशमुखी व पाटीलकीची नेमणूक (४०३–०५) ; शंकर दामोदर, तुकसेटी भुंगा यांस इनामें, उमापतीचे इनामाबाबत कृष्णाजी पवार यास (४१५–१८) ; जिवाजी कडू, संताजी व खंडोजी माणकर यांना मोकदमीचें वतन, जानो शंकर यास हुजूर खासगीच्या कमाविसीची नेमणूक (४२०–२२) ; मोकदम व रामाजी सिरोळकर कुलकर्णी यांस इनाम, फत्तेसिंग भोसले यास मोकासें (४२७, ४२९) ; जानोजी वेताळ, पीर शहा जलाल यांना इनामें, लाला भगिरथ यास जकातीचें दस्तक (४३९, ४४०) ; श्रीनिवास पंडित यांजकडे मोकासें, काजी इसूफ हसनचें वतनाबाबत (४४१–४५).

चिठ्या— (४३२३, ३४०, ३४१, ३६२, ३८२).

तलब— उदाजी व येसाजी आटोळे यांना हुजूर येण्यासंबंधीं (४३३१) ; रामचंद्र खंडागळे व सिदोजी डेवरे यांना (३३५) ; चांदोजी घाटगे व देवजी सोमवंशी (३६३) ; नरहरी शंकर यांना हुजूर येण्यासंबंधीं (३६८).

ताकीदपत्रें— नारो पंडित सचिव यांच्या साहोत्र्याबाबत (४३४७) ; व त्यांच्या वतन साहोत्र्याबाबत (३५१–५४) ; नरहरी रामच्या सरदेशमुखीबाबत (३७०–७२) ; उदाजी व मानाजी पवार यांस सरंजाम दिल्याबाबत (३८३–८५) ; हुजूर खाजगीकडे महालानिहाय व त्याची कमाविसी नारो विठ्ठल यास दिल्यासंबंधीं (३८८, ३८९) ; महालानिहाय व प्रांत फत्तेसिंग भोसलेकडे मोकासें दिल्याबद्दल (३९१, ३९२) ; हुजूर खासगीकडील महालानिहायच्या नाडगौडकीचा वसूल कमाविसदाराकडे देण्याबाबत महालांना (४१०–१२) ; खासगीकडील मोकाश्यांचा वसूल विठोबा नाईक कडे देण्याबाबत महालांना (४१९) ; कृष्णाजी पवार विश्वासराव यांच्याकडील सरंजामाबाबत (४३६–३८).

दस्तकें— सरकार कोठीचें हरजिनसीचें (४३१६, ३७३) ; भावसिंग नोकर सरकार यास रहदारीचें (३२७) ; संकर भंगी व चिमणा नाईक वणजरे यांस कौल व दस्तक (३४२) ; लष्करच्या सरदारांना (३९७).

नेमणुका— महालनिहायची सरदेशमुखी हुजूर खाजगीकडे व त्याची कमाविशी चिंतामणि थोरात याजकडे (४४०६) ; सिवाजी भास्कर व विठ्ठल कृष्ण सेणवी यांस मोकदमीची (४३१).

पत्रें— त्रिंबक भास्कर याची भावजय सोडून देण्याबाबत फोंड सावंत भोसले यास (४३१४) ; कालोजी भोसले यास जाब (३१५) ; मुरारजी घोरपडे यास मदत करण्यासंबंधी अंताजी नरसिंह यास (३१८) ; आबाई पाटलीण व राणोजी पाटील काळे यांच्या पाटीलकी तंट्याबाबत (३१९) ; मानसिंग सकपाल पाटील याच्या नाईकीबाबत, विठ्ठल महादजी व विठ्ठल तुकदेव यांना सोडून देण्याबद्दल लखमगौडा बास प्रभू देसाई यास (३२०) ; हरिपंताचे बापाच्या कर्जाबद्दल पिलाजी जाधव यास (३२१) ; मनखान व मनसूरखान यांना हुजूर पाठविणें म्हणून रघोजी भोसले, रघुनाथभट पटवर्धन व जमींदार यांना, कान्होजी भोसलेची वस्तभाव व घोडी वगैरे ते मागतील तेव्हां हजर करणें म्हणून तिमाजी गुमास्ते व जमींदार यांस (३२५, ३२६) ; आंब्याची डाली पोहोंचली म्हणून नागोजी घाटगे यास (३२७) ; शिपी रंगारी तंट्यांसंबंधीं, धावजी व रायाजी बडदरे यांच्या कर्जाबाबत (३२८) ; यशवंतराव गायकवाड यांचे वतन, इनाम इत्यादीविषयीं (३२९) ; हुंड्याभांडियाची खिजमत नथूराम चौधरी यास दिल्याबाबत सरदारांस, व्यापाऱ्याचा सावकारी माल परत देण्याबाबत (३३२) ; दादो भीमसेन यास सरदेशमुखीची कमाविशी व त्याबाबत महालास (३३३, ३३४) ; राणीऊचे गांव येथील पाटलास तगादा न करणें म्हणून जमीदार, कृष्णाजी आटोळे व पांडुरंग शिवदेव कमाविसदार यास, त्रिंबकजी शेळकेची घोडी देणेंबाबत

मल्हारजी नागवडे यास (४३३५); दुर्गभट व महादेवभट फणसलकर यांच्या इनामाबाबत संभाजी आंग्रे यास, राज्यांतून चौथाईचा वसूल ज्यादा न घेणें म्हणून हैबतराव बंडगर यास, कुसाजी येसाजी व फत्तेसिंग भोसलेकडील कोठीचे दस्तकाबाबत उदाजी चव्हाण, रघोजी भोसले व संभाजी आंग्रे यांस, जळगांवास पाटीलकी तंटचांत अभय दिल्यासंबंधीं, कोंडू वोखरा याचे घरी असलेली खंडेराव सुंदरची ठेव देण्याबाबत गणू काळे व कोंडू वोखरा यांना, निळो खलनाथच्या बाबती मोकासेबाबत गांवांना (३४८, ३४९); तेलंगणच्या मामल्यांत लक्ष्मण सुंदरकडून घतलेला ऐवज परत देण्याबाबत दत्ताजी अहिरराव यास, दादजी मोहितेस दिलेल्या म्हशींना वणीचा तगादा न लावणें म्हणून संभाजी आंग्रे यास, सोमाजी व आत्माजी नाईक यांचेमधील देवदेवाच्या तंटचाबाबत आत्याजी कोल्या, जानोजी बावने व जमीदार यांना (३५०); अरबांची तरांडी व घोडी यांना तोशीस न लागू देणें व जिन्नस, घोडे येतील ते पोहोचवून देणें म्हणून संभाजी आंग्रे यास (३५५); रेवपा व नागपा जंगम यांमधील वृत्तितंटचाबाबत (३५७); बावाजी व बहिरजी लाव-घरेच्या कर्जाबाबत (३५८); चौतऱ्यावर दरवेश अली फकीर यास राहूं देणें म्हणून तुलसाई निंबा-ळकर व जमीदार यांना (३६१); राऊलची मालियत परत देऊन गढी खालीं करून देणें म्हणून रघोजी, सवाई कटसिंग कदम यांस (३६६, ३६७); बालाजी अंबाजीच्या नरहर शंकरकडील ऐवजाबाबत कृष्णाजी आटोळे यास (३६८); वर्षासनाऐवजी ७०० रुपये देवराव जगन्नाथ कचेश्वर यास प्रधानांनी दिले त्याबाबत (३७६); गोपालजी खिस्ती याचे कर्जाबाबत जमीदारास व देवजी सोमवंशीस (३७७–७८); जमावानिशी हुजूर दर्शनास येण्याबद्दल रत्नोजी पांढरे यास, मोकासा दिल्याबाबत सिवाजी व बहिरजी पांढरे यांस (३८०); श्रीनिवासकडील बाबतीच्या जिल्हचाबाबत (३८२); खंडो बाबाजी वगैरे देशकुलकर्णाच्या सरकारास व चाकरांस उपसर्ग न करणें म्हणून दौलतराव शिर्के यास (३८७); चिमणाजी अनंत यास बाबूराव दाभाडकडील जामदारखान्याची चिटणिसी व गोविंद केशव यास नारो विठ्ठलकडील जामदारखान्याची चिट-णिसी सांगितल्याबाबत (३९३); पिलाजी साळी यास उदीम करण्याबाबत अभय दिल्या-संबंधी व पाठविलेले जिन्नस पावल्याबाबत भगवंत रामचंद्र यास (३९४); मसकतचे इमामा-कडून आलेल्या मलिक महंमदचा बहुमान करणें म्हणून फोंड सावंत व संभाजी आंग्रेस, फत्तेसिंग भोसले यास कोठीचे दस्तक दिल्याबाबत संभाजी आंग्रे यांस (३९४–९६); शामलास साहित्य करणारांचे पारिपत्य करणें म्हणून फोंड सावंत भोसले यास (३९८); सुरसिंग भोसलेबरोबर स्वामी दर्शनास येणें म्हणून मुरार पाटील व बंधूस (३९९); सटवोजी व रघोजी करडे हे राणोजी भोसलेच्या मोकासे महालास उपसर्ग देतात त्याबाबत मालजी भोसले व सटवोजी, रघोजी, सिवाजी करडे यांना, भवानजी गंगावनाकडील बटीक परटीण निघाली त्याबाबत जानोजी नाईक निंबाळकर यास, वाघोजी कामथे व दरफळे गायकवाड यांच्यामधील मोकदमी तंटचासंबंधीं (४००); शामजी विश्वनाथ याच्या ज्योतिष कुलकर्णाबाबत (४०२); मुसकांत मिठीच्या इनामास उपसर्ग दिल्याबाबत कृष्णाजी आटोळे यास, लाला भगीरथ मुनशीच्या मोकाश्यास उपसर्ग देऊं नये व त्याच्या चाकरास हशिलाचा तगादा करूं नये म्हणून संताजी जाधव यास, नरसिंगराव पालकर याच्या जहागिरी मुलुखांत धामधूम न करण्याबद्दल चव्हाजी बलवंतराव देवकांते यास, स्वामी-निष्ठा दाखविल्याबाबत स्वामीस उर्जित करणें जरूर म्हणून हैबतराव शिंदे यांस (४०८); नरहरी रामच्या सरदेशमुखीसंबंधीं म्हासे येथील देशमुख देशपांडे यास, फत्तेसिंग भोसले याचे सुलतानजी देशमुखाकडील ऐवजाबाबत रघोजी भोसले यास (४२३); कान्होजी भोसलेचे कबिले व त्याच्याकडील लोकांचे कबिले असलेल्या गांवांस मोर्चे लाविले आहेत त्यांना उपसर्ग न देण्यासंबंधीं रघोजी भोसले यास, पाहाडसिंग व सुजानसिंगच्या मोकदमीबाबत रघोजी व सवाई कटसिंग कदम यांस, वराड प्रांतामध्ये धामधूम न करण्याबद्दल रघोजी भोसले यास (४२४); हुजूर खाजगीकडे मोकासें व त्याची कमाविशी येसाजी गायकवाडकडे, व महालानिहाय हुजूर खाजगीकडे व कमाविसी जानो शंकरकडे दिल्याबाबत (४२५); खाजगीकडील सरदेशमुखीची कमाविशी लक्ष्मण भोसले याजकडे देण्याबाबत (४२६); बालाजी रुद्र याच्या कर्जाबाबत संताजी व कृष्णाजी आटोळे यांना (४२८); कुरकुंब येथील नाहावी भगत व गुरव यांच्या कज्ज्यासंबंधीं देशमुख देशपांडे इत्यादींना व मल्हार तुकदेव, संताजी आटोळे यांना (४३२).

मोकासें — लक्ष्मण व्यंकटेश (४३३५); जनार्दन फडणीस, देवराव मेघःश्याम (३५७); सिवाजी पांढरे (३६१); किल्लेहायच्या तनख्यास व नारो पंडित सचिव (३७९); मल्हार तुकदेव, त्रिंबक

दप्तर अंक ५

पुडकें क्र. २—चालू

सदाशिव, लक्ष्मण नानाजी फडणीस, अंताजी कृष्ण (४३८७) ; फत्तेसिंग भोसले (४०१) ; उदाजी, मानाजी व कृष्णाजी पवार (४०२) ; संभाजी जाधव (४०६) ; बाजीराव पंडित प्रधान रामाजी गणेश (४०७) ; त्रिंबक जिवाजी (४०८) ; खंडोजी बंडगर, गोविंद महादेव (४०९, ४०९ अ) ; कृष्णाजी पवार विश्वासराव (४२३) ; कृष्णाजी गोविंद (४२६) ; महादजी गदाधर यास वेतनाऐवजी मोकासें (४३१) ; फत्तेसिंग भोसले व हुजूर खाजगी (४३३) ; गोविंद महादेव फडणीस व संताजी आटोळे (४३४) ;

यादी— पत्रांची (४४३५) .

वतनें— राघो बापूजी बोकील यास नाडगौडकीची (४४१३,४१४) .

वर्षासन— ईश्वरभट कामणभट यास (४३५५).

वृत्तिपत्रें— सिवभट साठे यास (४३५६) ; गणेशभट दामले यास (३५९,३६०) .

सरंजाम— खंडोजी बंडगर (४३३०).

पुडकें क्र. २-अ

का.सं. ४४४६-४५६९, (१२४), सु. ११३५, इ.स. १७३४–३५.

इनामें— श्री देवास, महिपतराव बापूजी जमेनस यास मोकासें व इनाम (४४६७) ; हरि पाठक (४७०) ; शंकराजी आचार्य (४७४) ; नागोजी सावंत (४८२) ; देवभारती गोसावी (४९१) ; वासुदेवभट पारखे (४९२) ; कासीगिर गोसावी (५०१, ०२) ; संकराजी जाधव, बहिरजी जगताप (५०९) ; भिकाजी गोसावी (५१४) ; विश्वनाथभट दिवेकर (५२४) ; नरहरी व चतुर्भुज वैद्य दवे (५२८) ; केशवस्वामी देव (५२९) ; भवानी शंकर (५३३) ; कोनेरभट कामठी (५५६) ; श्रीनिवास येसाजी (५६६,५६८).

कमाविसी— नारो शंकर यास आटोळेकडील (४५१२).

कौल— संभाजीराव कलंबकर यास आपला गांव आबाद करण्यासंबंधी (४५५२).

चिटणिशी पत्रें—श्रीवर्धन दयाळदासचें इनामाबाबत, रामजी गणेश मुतालिक यास मोकासें (४४५२,४५३) ; देवराऊ व जगन्नाथ कचेश्वर ब्रह्मे जोशी कुलकर्णी यांच्या वतनाबाबत, मल्हार लिंगरस यास इनामपत्र (४८३,४८४) ; फत्तेसिंग भोसले यास सरंजाम, विश्वनाथभट माहूलगकर, नीळकंठ करंबेलकर, शंकराजी आचार्य यांना इनामें, धोंडजी वाघचे पाटीलकी तंटयाबाबत संताजी आटोळे, आनंदराव मोमवंशी व जमीदार यांना (४८५,४८७) ; सिवरामदासाच्या कर्जाबाबत नामाजी पाटील,जमीदार यांना, उदाजी व मानाजी पवार याच्या सरंजामाबाबत महालांना (५३९-४१) ; तुकाबा कृष्णाजी गोसावी भांडवलकर, परमहंस पूर्णानंद सरस्वती यांना इनामें, जानो शंकरकडील दमाजी पिसाळ याच्या व खासगीच्या मोक्याश्यासंबंधीं, नेचेसादाचें वतन नूर महंमद मिरामानी यास दिल्याबाबत वतनपत्र (५४६, ५४७) ; सिदोजी अटक व गंगाजी मालवण यांच्या सोयरीक वादासंबंधीं गांवास, सौ. राजसबाई निंबाळकर हीस इनामपत्रें (५५१,५५२).

चिठ्या— (४४५९, ४९६, ५००, ५०८, ५६९).

तलब— गोपाल नाईक खिस्ती याच्या कर्जाबाबत सुभानजी अकुलनेरकर यास हुजूर येण्याबद्दल (४४८२).

ताकीदपत्रें— संभुसिंग जाधव याच्या सरंजामाबाबत (४४५० ४५१) ; महालानिहायच्या मोकाश्याबाबत (४५६) ; हुजूर खाजगीकडील मोकासें महालासंबंधीं (४६६) ; वतन साहोत्रयासंबंधीं (४६८) ; प्रांत देवगडच्या निम्या मोकाश्याबाबत व भोर प्रांताच्या बाबती व सरदेशमुखीचा

दप्तर अंक ५

पुडकें क्र. २-अ—चालू

अंमल श्रीनिवास पंडित यांकडे दिल्याबद्दल (४४७१) ; रघुनाथ देव व रामदास स्वामी यांची इनामें लक्ष्मण गोसावी याच्या स्वाधीन आहेत त्या संबंधीं (५०५,५०६) ; जानोजी भोईटे याच्या सरंजामाबाबत परगण्यांना (५२९).

दस्तकें— संताजी ठोंबरे यास खिलार चारणीचें (४४७१) ; सयाजी पालकर यास रहदारीचें (५१२) ; संतसिंगजी, भोलासिंग व मानसिंग यांना रहदारीचें (५२२,५२३).

नेमणुका— जीवनराव पांडुरंग यास जमेनिसी व पांडुरंग दादाजी यास चिटणिसी (४४८१) ; हुजूर खाजगी कडील महालांच्या मोकाश्याची कमाविसी शंकराजी वेदाजी यास (४९८) ; नथुराम चौधरी यास पंचोत्रा व पाटीलकीचा अंमल (५११).

पत्रें— हंसाजी हटकर देवकांतेच्या सरंजामास उपद्रव न देण्यासंबंधीं चव्हाजी देवकांते यास, रामाजी विश्वनाथ मजमदार यास बेगमीकरितां नवी खेडी दिल्याबाबत रामाजी देवकांते यास (४४४७) ; सपुरजी अनसोजी व पुंजाजी पाटील यांच्या पाटीलकीच्या तंट्याबाबत (४४८,४४९) ; राऊत व एक सरदार पाठवून देणें म्हणून संभूसिंग जाधव यास, पांचशें स्वार गोवलकोटास मानाजी पवार याजकडे रवाना करण्याबद्दल कृष्णाजी पवार विश्वासराव यास (४५४,४५५) ; घोरपडे कारभारांत तंटा करितात त्याबाबत रामाजी माने यास (४५७) ; दिल्लीहून सैन्य येत आहे तरी जमावानिशी सज्ज रहाण्याविषयीं सरदारांना, कान्होजी भोसलेचे कबिले व लोक असलेल्या गांवांत मोर्चे लावून उपसर्ग दिल्याबाबत रघोजी भोसले यास, आवजी कवडे व सभासिंग यांची घोडी देणें म्हणून गोरखोजी भापकर यास (४५८) ; सैद हैदरशा वस्ताद यास मोकदमी व इनाम दिल्याबाबत जमीदार यास, मोकासें महाल फत्तेसिंग भोसलेच्या दिमतींतील लोकांना दिल्याबाबत ताकीदीचें (४६३) ; दत्ताजी अहिरराव व खंडेराव सुंदर यांना तेलंगण प्रांतीचा मामला सांगितल्याबाबत रघोजी भोसले यास, कर्टसिंग कदम व दमाजी गायकवाड यांच्यांतील कलहाबाबत सरदारांस (४६४) ; मल्हारजी नाईक, यशवंतराव निगडेच्या देशमुखीबाबत (४६५) ; गोवलेकोटास फौज रवाना करण्याबाबत आनंदराव सोमवंशी यास (४६८) ; बावाजी गोसावीची पुण्यतिथि त्याच्या शिष्य संप्रदायांनी गोविंद गोसावीच्या विचारे करावी म्हणून जमीदारास व नारोबा यादवच्या कर्जाबाबत रामाजी त्रिबक, जमीदार यांस (४६९) ; संक्रमणाचे तिळगळ पावल्याबाबत नागोजी घाटगे यास, वाफगांवचे मोकदमीच्या खरेदीपत्राबाबत (४७३) ; राघो जनार्दन कुलकर्णी व जोशी यांच्यामधील वतनाबाबत (४७५-७७) ; माहालानिहायचा मोकासा कृष्णाजी व येसाजी भोसले यांना दिल्याबाबत महालांना (४७८,४७९) ; औषधाबाबत (४८०) ; तिळगूळ हुजूर पावला म्हणून आनंदराव सोमवंशी यास (४८१) ; मायाजी दादाजी व जमीदार यांना गोपाळ नाईक यांच्या कर्जाबाबत, (४८२) ; लक्ष्मण नानाजी फडणीस याच्या मोकासा व बाबतीसंबंधी बाजीराव पंडित प्रधान यांस (४८६) ; बाबती अंमल श्रीनिवास पंडितांकडे दिल्याबद्दल व बयाबाई सलगर हिच्या जहागिरीबाबत ताकिदीचें (४८८) ; कृष्णाबाई फौजदार हिच्या सरंजामी मुलुखांत धामधूम केल्याबाबत जानोजी बावने व समस्त घायगुडे यांना, गोपाल राम प्रभू याच्या सिके तरवारच्या वतनाबाबत संभाजी आंग्रे व जमीदार यांना (४८९, ४९०) ; रामफळें पावल्याबाबत नागोजी घाटगे यास (४९१) ; ऐवजाबाबत रघोजी भोसले यांस (४९२) ; भगवंत पंडितनें पाठविलेले पत्र व तिळगूळ पावल्याबाबत (४९३) ; गुरे सोडून देण्याबद्दल महादजी दिमत संभुसिंग जाधव यास, गांवास उपसर्ग न देणें म्हणून चिमणाजी धायगुडे यास (४९५) ; महादजी गदाधर अमात्य याच्या मोकाश्याचा वसूल परतून देण्यासंबंधी (४९७) ; संताजी जाधवशीं एकविचारें राहुन स्वामीकार्य करण्याबद्दल हणगोजी बोरगे यास (५०३) ; जिवाजी खंडेरावच्या मोकाश्यांत खलेल केल्याबाबत हरबाजी विठ्ठल, जमीदार यांना (५०४) ; धोंडजी वाघच्या पाटीलकीबाबत संताजी आटोळे व कृष्णाजी आटोळे यांस, संताजी राजगुरपालची मुलगी देण्याबाबत देवजी सोमवंशी यास (५०७) ; घोडे पोंचल्यासंबंधी उमाबाई

व यशवंतराव दाभाडे यांना (४५११); आप्पाजी माने, कुसाजी कारभोर, तुळाजी बरगे, बहिरजो सालोखी, सटवोजी जाधव यांना हुजूर बोलाविल्यासंबंधी (५१३,५१४); फिरखानाचे वतन दुमाला करण्याबद्दल हैबतराव बंडगर व सिवराऊ जगदेव यांना (५१८); तानबाई हिस पुत्र झाल्याबद्दल देशमुख यास (५१९); सैद इब्राम याच्या चेहूलचे वतनाबाबत यशवंतराव दाभाडे व बाजीराव प्रधान यांस (५३०); विष्णू सोमनाथ नांदगांवकर यास तपकीर खोतींत नुकसानी आली त्या सूट मागणीसंबंधीं (५३८); फत्तेसिंगाच्या दिमतींत रहाण्यासंबंधीं हैबतराव बंडगर यास (५४२); गोसावी यांचे कर्जाबाबत कान्होजी शिर्के यास, रुद्राजी यावलच्या शेत मक्त्याबद्दल संताजी आटोळे यास (५४३) बहादर चाबुकस्वारास आनंदराव सुमंतकडे जाण्यास साहच्य करण्याबाबत औरंगाबादच्या लोकांस, मोरो मल्हार व मोरो नरहरी मेंडजोगी यांस दुकानचें पालकपत्र दिल्यासंबंधीं (५५०); कोनेरभट कोमटी यास इनामाबाबत (५५३); बयाबाई सलगरच्या जहागिरीस उपद्रव न देण्यासंबंधीं आनंदराव सोभवंशी, संभुसिंग जाधवराव व सखोजी वागमोडे यांना (५५४, ४५८); धवलगिरी शंभु महादेव यात्रेस लष्कराचा त्रास होऊं नये म्हणून सरदारांना (५५९); धारराव पाटणकर यास रहदारी साहच्याबाबत (५६०); कोंढालकर व गायकवाड कजियांतील करिणा पाठविण्यासंबंधीं तुलजाजी जाधव यास (५६१); त्रिबक रघुनाथ कुलकर्णी याची वस्तभाव व ऐवज देणें म्हणून यादो बापूजी व मोकदम यांना, प्रल्हादभट वरखल-करांची वस्तभाव परत देण्याबद्दल राणोजी, राघोजी पाटील व कमाविसदार यांना (५६२–६३); गंगाराम यादव याच्या कुलकर्णाबाबत प्रधान व बाबूराव दाभाडे यांना, केशव रघुनाथ यास कर्नाटक प्रांताच्या रहदारीबाबत सरदार पागे सिलेदार यांना, त्रिबकजी भोसले यांच्या हत्तीच्या ऐवजाबद्दल रघोजी भोसले यास (५६४); गणोजी कासार याच्या वादासंबंधीं अवचितजी व समस्त कासार यांना (५६५); गुरें परत मिळण्यासंबंधी खंडोजी जगताप यास (५६७).

मोकासें— संभुसिंग जाधव, आनंदराव सरलष्कर (४४४६); जनार्दन जगजीवन यास मोकासाव इनाम (४६०); हैबतराव बंडगर, फत्तेसिंग राऊल (४७०); यादवराव पिलाजी पारसनीस यास बाबती व मोकासा (४७२); फत्तेसिंग राऊल यास मोकासा व बाबती (४७४); सयाजी आटोळे (५१२); पदाजी बंडगर (५१७); माधवराव गणेश (५२०); नागोजी पवार (५२४); शाबाजी जगताप, बाळाजी जनार्दन (५२५); किल्ले विचित्रगड (५३२).

याद्या— घासदाणा रवाना केलेल्या लोकांच्या (४५१५, ५१६); रोख्याची (५२०); वर्षप्रतिपदेस नजर दिलेल्या लोकांच्या (५३४–३६); भांडारगृहाकडील जमेच्या (५४४, ५४५).

रवासुदगी— (४५४८).

रोजकीर्द बंद—(४५३७, ५५६, ५५७).

वतनपत्रें— अण्णा अवधानी यांस (४४४६, ४४७).

वर्षासन— बाबाचार्य तिमणाचार्य यास (४४६१).

वस्त्रें— सरदारांना (४५४९).

वृत्तिपत्र— रत्नाबाईस हीस (४५१०).

सनदा— गोविंद महादेव (४५२६, ५२७); सुभानजी पवार (५२८); गोविंद महादेव यांना शेतें दिल्याच्या (५३१).

सरंजाम— चिमणाजी माणकेश्वर धायगुडे (४४८२, ५३०) बुवाजी पवार (५२६, ५२७).

हवाला— कृष्णाजी जाधव यास सुधागडचा (४४९९)

दप्तर अंक ५

पुडकें क्र. ३

का. सं. ४५७०–४७७३ (२०४), सु. ११३६, इ. स. १७३५–३६.

अभयपत्रें— आप्पाजी सोमवंशीस त्याच्या सरंजामांत इतर सरदारांची धामधूम न होण्याबद्दल (४५७३); मौजे आळंदाज परगणे कागलचे मुकदमास कीर्द आबादानी करण्याबद्दल (५८५); सेरमाजी राऊत यानें चुलत भावाचा खून केल्याबद्दल (५८७); मानाजी घोरपडे व जोत्याजी यादव यांच्या सोयरिकेबाबत गोदजी गायकवाडास (७६०); जमीदार व कमाविसदार यांच्या कज्ज्याबाबत वैजापूरच्या देशमुख देशपांडे व सेटे महाजनास, गोवलकोटच्या मसलती फौजेस दाणा सामान नेणाऱ्या सेटे महाजन वगैरेंस जकातीबाबत (७६५).

आज्ञापत्रें— विनायक मल्हार यास देवराव कचेश्वरास त्याची मजमू सांगितली त्याप्रमाणें काम करून घेण्याबद्दल (४६१७); हरिनाथगिरी गोसावीचे पैसे देण्याबद्दल बाबूराव सटवाजी व दत्ताजी देशमुखास (७४८); गांवास उपसर्ग न देणें म्हणून रघोजी भोसलेस (७६१).

इनामें— तानी कुणबीण (४५७२); पूर्णानंद सरस्वतीचा नाशिक येथील मठ (६०२); खंडोजी सोमजी जगताप (६१२, ६१५); त्रिंबकराव विश्वनाथ (६१४); वेदमूर्ति आपदेवभट शेषाद्रिभट वैरागकर (६३०); गंगाधर व रघुनाथ त्रिमल हणमंते, उमापति भट गंगाधरभट ऋषी (६४६); कृष्णभट वासुदेव रायकर, वासुदेवभट विनायक कोसे (६५८) नारो बल्लाळ कोल्हटकर, सख जोशी भिंगारकर (६५९); आसाबाई भोसले (६६५); काळोजी वाबने (६९६); सदाशिव दीक्षित, कृष्णभट सोमयागी, शाम पाठक, हरि पाठक (७१२); कान्होजी भोसले (७१३); रघुनाथ जोशी, नारायण जोशी (७३६); सुभानजी जाधव (७४८); भवानीदास मिरघे, कृष्णाजी व मुकुंद रेणुकानंदन (७५७, ७५८); गोसावी याचा मठ, सिदोजी सालोंखी (७६२); हरभट अष्टेकर, सदाशिवभट त्रिंबकभट (७६३); खंडेराव अनंत (७६५); देवजी माये (७६६, ७६७); महादेव हर्षे (७६८).

करारपत्रें— बाबती व सरदेशमुखी गुजरात व काठेवाडांतील परगण्यांची श्रीनिवास पंडित प्रतिनिधीकडे त्यांनीं आपल्यातर्फे कमाविसदार नेमून वसूल देण्याविषयीं (४६०१); मौजे केतकवले गांवाचे मोकासे-बाबत (६१२); पथक हशम हुजरात यांस देहाये मोकासेबाबत करार, मौजे वडगांवच्या मोकाश्याबाबत महादजी पंडित अमात्याचे मानसिंगराव जाधव याचे इनाम त्याचे आईस दिल्याचें (६१७).

गांव लावणी—बाळापूर येथील देशमुखाचे खाली गांव लाविले त्याबद्दल यशवंतराव देशमुख यास पत्र (४५८४).

चिटणिशीपत्रें—कोंकण प्रांतीच्या लोकांस सूर्याजी चव्हाण कोकणराव व समस्त चव्हाण देसाई यांस जमावानिसी स्वामीकार्यास येण्याबाबत (४५९९); येसाजी गायकवाडास बाबतीची कमाविशी, ज्योति अनंत बोध गोसाव्यास इनाम (६५०–५२); बजाजी व माणकोजी आटोळे यांच्या सरंजामाबाबत महालांना, नागोजी मेघःशाम यास चव्हाजी बलवंतराव देवकांते याची फडणिशी (७०७–१०); चव्हाजी बलवंतराव देवकांते यास सरंजाम, हंसाजी देवकांते यास मोकासा व कालोजी भुकणेस रहदारीचे दस्तक (७४६, ७४७).

ताकीदपत्रें— फत्तेसिंग भोसले याच्या मोकाश्यासंबंधीं (४५७०); दुलमाजी देशमुख यास जागिरदारानें अटकेंत ठेविले त्यास सोडवून त्याचें साहित्य करून देण्याबाबत येसाजी आटाळे यास (५८३); अबदुल-खान याची कन्या सुरतेहून येत होती तीस मार्गी बाबूराव दाभाडे यांनी अटकाव न करण्याबद्दल (५७१); फत्तेसिंग राऊळ याजकडे मोकासे गांवे आहेत त्याविषयीं (५७४); फकीरशाहा महमदखान याच्या इनाम गावास तोशीस न देण्याबाबत जमीदारास (५७९); पैठण सरकार दौलताबाद येथील देशपांडेपण दामाजीपंत चोरघडे याच्या नातवाकडे चालविणें, रेणुराव दातार कज्ज्या करतात त्यास ताकीद (६००); आप्पाजीराम मजमदार यास सरंजामाबाबत (६०५); बाजीराव पंडित प्रधान याकडे मोकासे असत त्यांचे कमाविसदारास वसूल देणेबाबत (६०८); मल्हार तुकदेव यास त्याजकडे असलेल्या मोकाशाचा वसूल देण्याबाबत (६०९); हंसाजी देवकांते याजकडील मोकासेस उपद्रव न देण्याकरितां चव्हाजी बळवंतराव यास (६१०); गोविंद महादेव

फडणीस यास मोकाशाचा वसूल मिळण्यास मदत करण्याबद्दल आवजी कवडेस (४६१८); संभुसिंग जाधवानें फत्तेसिंग भोसलेकडील आवसे यास उपद्रव न करणेबाबत (६१९); आत्माराम गोसावी याच्या इनाम गावास उपसर्ग देऊ नये म्हणून रायाजी राऊत यास (६२०); नारो पंडित सचिवाचे साहोत्र्याबद्दल वसूल देण्याविषयीं सर्व कमाविसदारास (६२५); बालाघाट येथील वसूल देण्याविषयीं कमाविसदारांस (६२६); कल्याणकडील वसुलासंबंधीं (६२७); भगवंतराव पंडितशी कजिया वाढवून संभाजी आंग्रे कटकट करतात ती न करण्याबाबत दोघांस (६२८); जानोशंकरच्या तर्फेने पाठविलेल्या कमाविसदारांस वसूल देण्याबाबत (६२९); नरहरी रामकडील सरदेशमुखीविषयीं (६३५, ६३६); सयाजी आटोळ्याचे मोकासेबाबत महालांना (६६३,६६४).

तैनात— जयसिंगरावाकडून आलेल्या रजपुतांस जामीन सिरपाव, झेला व अष्टगोळी व मंदिल (४६२४).

दस्तकें— सुमेरगिरी महंताचे रुपये पोंचविण्याबाबत येसाजी शिंदेस (४५९२); मिर बुढण बेग यास कबिल्याचे, फत्तेसिंगास अरबी घोड्याचे (६६५).

नजर— दसऱ्यानिमित्त निरनिराळ्याकडून आल्या त्यांची नांवे (४६२२); नजर नक्त वरीलप्रमाणें (६२३); नजरा जमा (४७४५).

निवाडापत्रें—गंगाजी खोमणे यास मोकदमी तंटयाचे (४७७०–७२).

नेमणुका— मौजे सिलीम येथील पाटीलकीची मजमू आप्पाजीराम यास (४६०३); संताजी मोहिते नि दुर्गोजी महाडिक यास किल्ले गुणवंतगड येथील सरनौबती (६०४); माणकोजी गंभीरराव यास किल्ले प्रचंडगड उर्फ तोरणा येथील सरनोबती व किल्याची सबनिसी चिमणाजी दामोदर यास (६०५); त्रिबक सोमवंशी यास सरलष्करी (६२४); रामाजी कासी यास मजमूची सर दप्तरी (७३१); त्रिबक चिंतामणि यास सयाजी आटोळेची फडणिसी (७३२, ७३३); व नरसो नानाजी यास राणोजी भोसलेची फडणिसी (७६३).

पत्रें — नारायणजी सेलार यास मुकासेबाबत वसूल देण्याबाबत, परशराम श्रीनिवास याजकडे मोकासे बाबेचा वसूल येण्याबाबत (४५७५); संभुसिंग जाधवास पिरजादेच्या इनामास खराब न करण्याविषयीं, उदाजी व बजाजी आटोळे यांनीं मुकासेचा वसूल देणें म्हणून (५७६); उदाजी आटोळेच्या सरंजामाबाबत जमीदारास वसूल सुरळीत देणें व त्याचे चालवावयास अंतर न करणें म्हणून (५७७); आनंदराव पंडित सुमंत याच्या देवळास पूजे अर्चेकरितां इनाम देणें म्हणून (५७८); फोंड सावंत भोसले सरदेसाई यासी त्यांनीं सरकारच्या महालाचा जंजिरे व सिधुदुर्गाकडील तनखा वसुलीस उपसर्ग न लावण्याबद्दल तसेंच आदिलशाही कारकीर्दीपासून रघुनाथ गोविंद व अनाजी गोविंद यांच्या खारेपाटण येथील वतनास उपसर्ग न देणें म्हणून (५८१); रामदास स्वामीच्या नातूचे पुत्र लक्ष्मण गोसावी यास पेशजीप्रमाणें इनाम चालविण्याबाबत (५८२); आलसद गावाचा मोकासा खंडोजीनाथास देण्याबाबत, हरचे गावचे इनाम नेताजी गंगाजी सुर्वे यास (५९६), अनुपसिंग व कुवर पहाडसिंग यांच्या मुलुखांत धामधूम न करण्याबाबत (५९७); सरदारांस व येसाजी पांढरे व रत्नोजी पांढरे यांना इनाम दिल्याबद्दल (५९८); राऊ मानसिंग नागोरकर याचे पुरे औरंगाबाद व पेडगांव येथें आहेत त्यास वाटेस न जाण्यास देशपांडे यांना (६००); तुळसाई आबाजी गोविंद हिनें दत्तक घेऊन जुन्नर येथील कुलकर्णी वतन दत्तकाच्या नांवें केलें तें चालविण्याविषयीं (६०४); फत्तेसिंग भोसले सुरतहून घोडे खरेदी करून आणीत आहेत त्यास मुजाहिम न करण्याबद्दल दमाजी गायकवाडास, खंडोजी जगन्नाथास कसबे बावडे येथील ठाण्याच्या वतनाचा मोकासा देण्याबाबत देशमुखांस (६०६); जगजीवन गोविंद यास खास दस्तक खताचे, रोजमुरा दर्याजी नाईकच्या जासूद जथ्यास (६१३); वैजापूरचे वतन मानसिंगराव जाधवराव याचे चालविण्याबाबत देशमुखास (६१८); बीड व अंबड येथील हल्लींच्या कमाविसदारास सुरळीत वसूल देण्यासंबंधीं नारो पंडित सचिव यांस, रघोजी भोसले यास स्वामी संनिध येण्यास (६२१); हैबतराव बंडगर यास मौजे कणबसगांवचे पाटीलाचे स्वाधीन करण्याबद्दल, मैना नायकिणीचे सोलापुरांत जात असलेल्या माणसास मना न करण्याबाबत (६२८); रामाजी रंगाजी प्रभूस चेऊलची सर दलाली दिल्याबाबत मानाजी आंग्रे व जमीदारास

(४६३७,६३८); रघुनाथ काळेधरभट आचार्य याच्या इनामासंबंधीं (६३९); यादवभट उद्धवभट ज्योतिषीस उपद्रव करू नये म्हणून जमीदारास (६४०); रघोजी व सवाई कर्टसिंग कदमास हुजूर दर्शनास येण्याबाबत (६४१, ६४२); पांडुरंग गोपाळ याचे कर्ज व गुराबाबत पिराजी जाधवास, गोविंद महादेव फडणीस मजमूचे मोकासेबाबत खंडोजी भोसलेस, किल्यास व आरमारास उपसर्ग न करणें म्हणून फोंड सावंतास, जानोजी भोईटे याच्या मोकासेबाबत जमीदार व सरदार यांना (६४७–४९); विठोबा नाईक वाकडेकडील खासगी महालाबाबत महालास, लक्ष्मण भोसलेच्या सरदेशमुखीबाबत व बहिरो रघुनाथ फडणीस व विठोबा नाईक वाकडे यांच्या मोकासेबाबत जमीदारास (६५३); बलवंत नारायण पंडित पेठे यांच्या इनामासंबंधीं गांवास (६५४); दिनकरसिंग जमीदारास अभय, विश्वंभट गोसावीचे इनामासंबंधीं जमीदारास, गणेशभट व सखोभट यांच्या ज्योतिष वृत्तीचा निवाडा (६५६); निंबाजी ठोंबरेची वस्तभाव परतून देणें म्हणून त्रिबक तुकदेव व आवजी कवडेस, खंडो बाबाजीच्या शेतासी कज्या न करणें म्हणून दौलतराव शिर्के यास, सदाशिव रघुनाथ सुकुलचे मुकदमीबाबत, शिवरामदासाच्या साहित्यासंबंधीं धोंडजी ठाकूर व बिंबाजी ठाकूर यांना (६५७); हरबाजी विठ्ठलकडील सामलतीबाबत (६५८); जामदार व कारकून भांडारगृह यांच्या मोकासेबाबत जमीदारास, फत्तेसिंगाच्या कोठी बैलांच्या रहदारीबाबत (६६०); मदारी तांबोलीच्या बैलांबाबत सरदारांस (६६१); येसाजी गायकवाडास व जानो शंकर यांचे मोकाश्याच्या कमाविशीबाबत महालांना, हरिदास बैराग्याचे इनामासंबंधीं गांवास (६६२); माणकोजी खोमणेकडील हिरद्रे जागडा याचे कर्जाबाबत मुधोजी व जानोजी नाईक निंबाळकरास, सुरत गुजरातचे ऐवजाबाबत उमाबाई दाभाडेस, राणोजी भोसलेकडील लोकांस आणावयास पाठविलेल्या हुजऱ्यांस (६६६–६९); भगवानजी जाधवाकडून व कुकाजी पाटलाकडून जयसिंग जाधवाचा ऐवज देवविण्याबाबत कृष्णाजी आटोळे यास (६७०); आबाजी विसाजीचे कर्जाबाबत गांवास, संताजी केरोजी, सयाजी आटोळे व पुंजाजी यशवंतरावच्या सरंजामाबाबत (६७१–७४); जिवाजी खंडेरावाकडील बाबती मुकासेबाबत जमीदारास, श्री रामदास स्वामीच्या मठाचे बैलास जकात माफीबाबत, नाईकजी कडू याच्या मोकासेसंबंधीं (६७८, ६८१–८३); त्रिबकजी सोमवंशीच्या इनामासंबंधीं, फत्तेसिंग भोसलेचे मुकासे व जकातीबाबत, बालाजी चिंतामणचा निर्वाह चालविण्याबाबत संभाजी आंग्रेस (६८४–८५); चन्हाजी बलवंतराव देवकांते याच्या मुकासेबाबत, कान्होजी भोसलेस स्वारांनिसी येण्याबद्दल (६८६, ६८७); माणको जिवाजी फडणिस यासी घर जमा माफी (६८८); ब्राह्मणांच्या इनामाचे कमाविसीबाबत महालांस, श्रीनिवासाचार्याचे इनामासंबंधीं सखोजी वागमोडेस, जानो शंकराकडील खासगी अंमलाबाबत महालास व सरदारांस (६९२); श्रीनिवास यादवच्या इनाम व मोकासे संबंधीं गांवाना (६९३, ६९५); आपाजीराम मजमदार यांच्या सरंजामाबाबत (६९४); सोन ठाकूरच्या तकसीमेचा व बाबतीचा वसूल जिल्ह्याकडे देण्याबाबत बाजीराव प्रधान व कोथले गावास (७०१); उमाबाई दाभाडेकडे हुजूरचा ऐवज व सावकारास वरात दिल्याबद्दल (७०२); कृष्णाजी आनंदजीच्या मुकासेबाबत मोकदमास (७०३); तनको गणेशचे जामीनकीविषयीं बहिरजी गणेश, वासुदेव हरि, सावकार यांना (७०४); गोपाळ रामराव याचा कबिला सोडण्याबाबत फोंड सावंतास, महिमाजी आनंदराव व नरसिंगराव जगताप यांच्या महाली धामधूम न करणें म्हणून सरदारास (७०५); अनुपसिंग व कुवर पहाडसिंग यांच्या मुलूखांत धामधूम न करण्याबाबत उदाजी पवार व सवाई कर्टसिंग यांस (७०६); रघुनाथभट पटवर्धन यास हुजूर बोलावणें (७११); सागवानी लाकडे नथूराम चौधरीस आणून देणें म्हणून सरदारास (७१८); गागाभट कासीभट व धोंडभट कृष्णभट माईणकर यांच्या ज्योतिष उपाध्ये धर्माधिकारी वृत्तीबाबत जमीदारास (७२६); त्रिबकराव देवजी सोमवंशीच्या इनामाबाबत, गोविंद खंडेरावाचे मुकासेबाबत, शिंपी रंगारी यांच्या भांडणाबाबत (७२९); संक्रमणाचे तिळगूळ पाठविण्याबद्दल (७३०); अंताजी व जगन्नाथ भिकाजी खोत यांच्या वतनाबाबत, प्रल्हाद बापू व यादवराव जोशी यांच्या ग्रामोपाध्येपणासंबंधीं (७३७–३९); वेंकाजी नाईक घाटचा याचे स्त्रीस शुद्ध करून घेतल्याबाबत जमीदारास (७४०); गोविंद व रामाजी मल्हार प्रभू यांच्या वतनाबाबत (७४१); जानो शंकरची गुरें परतोन देणें म्हणून भिऊबाई व रामजी बंडगर यांना (७४२); दुर्गाबाई जाधव

व गोविंद दत्तो यांचे कर्जाबाबत मानसिंग जाधवरावास, कृष्णाजी आटोळे, रघोजी भोसले यांना (४७५२); नारायणजी सेलाराच्या मोकासेबाबत जमीदारास (७५४); गंगाधर व रघुनाथ त्रिमल यांच्या इनामासंबंधीं यशवंतराव दाभाडेस (७५५, ७५६); संताजी व बजाजी आटोळे याची वस्तभाव देणेंबाबत आपाजी सोमवंशीस (७५८); फत्तेसिंग भोसलेच्या मोकाशाचा वसूल सुरळीत देण्याबद्दल वडगांवच्या मोकदमास, गुलजारखा याच्या जहागिरीमध्यें रास्ती चौथाई सरदेशमुखी घेण्यासंबंधीं कमाविसदारांस, गांव खराब केल्याबद्दल देवजी आटोळेस, प्रांतास उपसर्ग न देणें म्हणून आवजी कवडे यास (७६२); विजयादशमीनंतर फौजा पाठवूं म्हणून संकराजी घोरपडे यास (७६४).

परवाना— गंगाजी व येकोजी कातरा कोठीवाले बैल घेऊन हर एक जागीं जिन्नस खरेदी करितील त्यांस तगादा न लावणें म्हणून (४५९१); कुसाजी भोसलेचे कोठीचे बैलास जकातीचा तगादा न करण्याबाबत (५९४).

फडणिशी पत्रें—गोविंद महादेव फडणीसच्या मजमूनें कमाविसदाराशीं रूजू होऊन वसूल देण्याविषयीं (४६१३).

भेट— जमा दिवाळी भेट (४६५५).

मजमू— गंगाधर महादेव यास कान्होजी भोसलेची (४७१९).

मसाला— फत्तेसिंग राऊळ याच्या गांवाविषयीं (४५७३); बापूजी भोई यास पालखीच्या दांड्याकरितां (५८८); उमाबाई दाभाडेकडे पैका आणावयास जासूद पाठविला त्यास (५८९); आनंदराव रघुनाथ दिवाणाकडे माणूस पाठविला त्यास (५९०); केसोजी जामदार यास (५९३).

मोकासे— अजम नूरखान यास (४५७०); खंडोजी जगताप यास बावडे येथील ठाण्यांचा (६०७); उदाजी, मानाजी व बुवाजी पवार (६७६); अंताजी कृष्ण (६९०); तुको निळकंठ चिटणिस, त्रिबक दादाजी पोतनीस व चिमणाजी हरि दप्तरदार (७०६); जिवाजी खंडेराव (७४८); सुभानजी महार्णवर (७५०).

याद्या— मौजे केतकवले हा गांव पुरंदरच्या तनख्यास आहे त्या प्रमाणें कराराची (४६१६); आबाजी विसाजी सोनवलकराच्या कर्जाबाबत (६७७); पाथरीमधील देहांची (७६९).

रसदा— मोईनी रसदा (४७४३, ७४४).

राजपत्रें— त्रिबक जिवाजीकडील मुकासेबाबत, बलवंतराव टोके व मल्हार गोविंदच्या इनामासंबंधीं (४६७५); सुभानजी महार्णवरच्या मुकासेबद्दल (६७९, ६८०); कालोजी बावनेच्या इनामासंबंधीं, कलबुर्गे दर्गा इनाम (६९८); आनंदराव रघुनाथ दिवाणाचे मुकासेबाबत जमीदारास (६९९); कुतरा पाठविणें म्हणून सर्जाराव घाटगे यास, बयाबाई सलगरच्या जहागिरीस उपसर्ग न देण्याबाबत सरदारांस (७००); नरसिंगराव जगताप याच्या पाटीलकी वतनाबाबत जमीदारास, जानो शंकरकडे मुकासा कमाविसी दिल्याबाबत, विष्णुभट नारायणभट टाकणकरास इनाम दिल्याबद्दल जमीदार व गावास (७२०, ७२१); नानकपंथीच्या इनामास उपद्रव न देणें म्हणून उदाजी चव्हाणास, केरोजी व सुभानजी खाटकाची वस्तभाव परत देण्याबद्दल सिदोजी बंडगर यास, सवाई त्रिमलराव कदमच्या इनामाबाबत जमीदारास (७२२); केशवभट व कृष्णंभट ललित यांच्या उपाध्ये वृत्तीसंबंधीं आंग्रे व जमीदारास (७२३); नारायणजी सेलारचे मुकासेबाबत मोकदमास, सुलाबाई इंगळे हिच्या देशमुखी वतन कजियाबाबत येसाजी आटोळे व इंगळेस (७२४); शामलाचे मसलतीस फौज पाठविणें व हुजूर ऐवजाबाबत उमाबाई दाभाडेस

दप्तर अंक ५

पुडकें क्र. ३—चालू

खास दस्तकी (४७२५); अंताणा इदवर पुत्रीमतस्छ यास इनामाचे, कोंडजी यादव सोलसकराच्या मोकाश्याबाबत जमीदारास (७२७); गोवलकोटी जखमी जाले म्हणोन येसाजी जाधवास इनामाचें, अंतोजी डावरेचे मुकासेबाबत जमीदारास (७२८); त्रिबकराव देवजी सोमवंशी यास इनामाचें (७३४).

रोजकीर्द— राजमंडळ (४५८६).

रोजकीर्द बंद— (४६९७, ४७३५).

वतनें— मल्हारजी भोसले फर्जंद यास मोकदमीचें (४६११); रायाजी व विरोजी माने (६९१); मानसिंग जाधव यास देशमुखी व देशपांडेचें (७५१).

सरंजाम— उदाजी आटोळे यास (४५८०); त्रिबकजी सोमवंशी सरलष्कर, महादाजी मजमदार, सिवाजी सालोंखी कारभारी, आपाजी खंडेराव जमेनीस, गंगाधर शामजी सिकेनीस, नारो भास्कर वकील, आनंदराव रघुनाथ दिवाण व चिमणाजी हरि (६३१–३४); भिकाजी काकडे, दिनकरराव (६८९).

हवाला— रघोजी घाटगे निाा संभुसिंग यास किल्ले संतोषगड येथील हवाल्याचा कार्यभाग (४५९५).

पुडकें क्र. ४

का. सं. ४७७४–५००४ (२३१), सु. ११३६, इ. स. १७३५–३६.

इनामें— प्रतापराव मोरे, भवानीपुरी गोसावी (४८०५); गुंडभट थिटे (८३१); रुद्रगिरी गोसावी, रायाजी माळवदकर (८३५); माधव महादेव (८३७); लिंगोजी नागोजी गाढवे (८७२); दामाजी शंकर शुक्ल (८८१); नुरुलाबेग (९४७); रामभट दादंभट भावे व विनायक जोशी, वासुदेव जोशी (९७७–७९).

चिटणिशी पत्रें—रंगराव उद्धवास मजमूची मुतालिकी, उदगीर व चौलहून बदाम बेदाणेची झाडे आणण्याची दस्तकें; येमाजी शिवदेव यास इनाम (४८०३, ८०४); महादाजी पंडित अमात्य, बहिरो रघुनाथ फडणीस, मल्हार तुकदेव, रंगराव उद्धव मुतालिक, दिमत मजमू, बाजीराव पंडित यांना मोकासें, कुसाजी व येसाजी भोसल्याचे बैलाबाबत, राणूबाई केसरकराचे मेंढराबाबत दस्तकें, श्री महाबळेश्वर, नारो गोविंद पिंगळे, विश्वंभर देव चिंचवड, नरहरभट व दुर्गभट सप्रे, केशवराव जाधव यांस इनामें (८२५–३०); नरहरी रामच्या सरदेशमुखीबाबत ताकीदपत्रें व साहित्यपत्रें कान्होजी व भिकाजी बेहरास, शामराव नरसीस जमाव बेगमीकरितां कुसाजी व येसाजी भोसलेकडील मोकासें (८४९–५४); जामदारखान्यापैकीं सिरपाव दिले ते, गोविंद रामाजी व नारोमल्हार कुलकर्णी यांची, बाजी व गंगाधर यशवंत चंद्रचूड यांची, लक्ष्मण गोविंद टुलू यांच्या कुलकर्ण व ज्योतिषीची वतनपत्रें (८५५–६६); कालोजी बावने यास मोकासें, गोवलकोटचे स्वारींत सरलष्करची कुमक करणें म्हणून आटोळे, महार्णवर, देवकांते व वागमोडे यांस पत्रें (८६८–६९, ८७१); सूर्याजी अंताजी पतंगरावास ताम्रापासून अभयाचें, दादंभट व वेंकाजी यांचे खिस्तीचे कजियाबाबत, पराणजी शिर्के यास बाबूराव मुकादमाकडून ऐवज देवविण्याबाबत, दीपाजी कदमरावाची मालियत परत देणें म्हणून संभुसिंग जाधव व आवजी कवडे यांस, दीपाजी पतंगरावाच्या वतनास जहागिरदाराकडून उपद्रव होऊं न देण्याबाबत पत्रें, दामाजी शंकर यास इनाम (८७८–८०); सेटचाजी जाधव व कनडदास व बाबूराव सरवदा यांचे वादांत कनडदास व बाबूरावास तलब, महादजी गणेशकडील मोकासेबाबत पत्र (९२५, ९२६).

दप्तर अंक ५

पुडकें क्र. ४—चालू

चिठ्ठ्या— (४९१८, ३९, ४९).

तलब— मावजी व शिलोजी वाग यास घर लुटीबाबत (४७८०–८२).

ताकीदपत्रें— यशवंत व गोविंद महादेवाच्या मोकाश्याबाबत (४८३२–३४).

दस्तकें— रत्नोजी, सिवाजी व बहिरजी पांढरेस वर्तमान कळविणें म्हणून, सैद अनवी पिरजादेस वाट दस्तक (४८१०); मावजी उधले यास वाटेचें (९४८); गंगेरी पानांचे (९९५).

निवाडापत्रें—धारगाव पारगांवकर यांच्या कजियाचा (४७७५, ७६); बिंबाजी सुभानजी व पिराजी बाबाजी कोंडे देशमुख यांच्या वतनाचा (८७४).

नेमणुका— आप्पाजी खोलाजी पोतदार यास वाईची पोतदारी (४७७४); सुभानजी जगताप यास प्रतापगडजी हवालदारी व परशुराम भोसलेस मंगलगडची सरनोबती (८०९); बालाघाट येथील हुजूर खाजगीकडे सरदेशमुखी (९००); महादजी बाबाजीस कालोजी भोसलेची मजमू (९५७).

पत्रें— सेटचाजी जाधवानें गुरांचा ऐवज दिला नाहीं म्हणोन सरदार व जमीदारास, राहुजी जाधवाची नाईक वाडी अंमल व कर्जाबाबत सरदारास, रासोजी जाधवाच्या कर्जाबाबत (४७७७, ७८); भगवंतराव रामचंद्र अमात्याचे साहित्य करू नये, सिंधुदुर्ग आरमारास त्रास देऊ नये म्हणून संभाजी आंग्रे यास, चिरंजीव संभाजीशी मर्यादेनें रहाणें म्हणून नाग सावंत यास, नीळकंठराव त्रिबककडून कर्ज व नालबंदी आणली ती परत देणें म्हणून जमीदार, सुलतानपुरी, कृष्णाजी कुळकर्णी, जोती विठ्ठल, तुकोजी शिंदे, येसजी पाटील, नरसिंगराय व निंबाजीस, भवानीदासच्या कर्जाबाबत, धान्य पेवा-बाबत व सरकारात कुत्री आणू देण्याबाबत (७९१, ९२); विश्वंभर देवजी गोसाव्याच्या इनामा-बाबत, देवराव मेघःशामच्या गांवासंबंधीं व खासगी मोकाशासंबंधी जमीदारास, विठ्ठल केशव, बाळाजी विसाजी यांच्या जमिनीबाबत संभाजी आंग्रे यास (७९८–८०२); तोफा ओतणारे कारागीर व लोखंड श्रीरंगपट्टणहून आणविले त्याचे साहित्यास हिंदुरायास, उमाबाई यशवंतराव बाबूराव दाभाडे यांना फौजेनिशी बोलावणें (८०६, ०८); सरकारी टोकऱ्याचे हशिलासंबंधी राणोजी घोरपडे यास सांगणें म्हणून सिदोजी थोरात यास (८११); लुयाजी पांढरे यास फत्ते-सिंगाजवळ सेवा करण्याबाबत, रहदारीस उपसर्ग न देणें म्हणून सरदार शिलेदारांना (८१५, १६); रामजी हरबाजी जाधव व नागोजी सितोजी मुकदम यांच्या वादाबद्दल (८२१); धारोजी रुद्राजी चरिथास मकरंदगडची, जानोजी चोरघडे यास चंदनगडची व रत्नोजी मोर व सयाजी मोहिते यांना पुरंधरावरील आसाम्या दिल्याबाबत (८२२–२५); देवराव व जगन्नाथ कचेश्वरास वर्षासनाऐवजी रक्कम देण्याविषयीं, वासुदेव राम पोतदाराच्या इनामाबाबत संभाजी आंग्रे यास (८३१); महादाजी व राणोजी मढीकरच्या पाटीलकी व घर वाड्यास कान्होजी पाटील उपसर्ग करतो त्याबाबत जमीदारास (८३६); खंडो बाळाजीची वस्तभाव व मालीयत परत देण्याबद्दल येसाजी देशमुख यास (८३८, ८३९); दारकोजी पवाराबरोबर स्वार सत्वर पाठवणे म्हणून उदाजी पवारास (८४०,८४१); सिंहगडचा हवाला भगवंतराव सोमवंशीस व हवाल्याची मुतालकी अमृतराव निकम यास दिल्याबद्दल सेनाधुरंधर सेनालेखक यांस (८४८); येसाजी कुलकर्णी याच्या स्त्रीस शुद्ध केल्याबाबत (८७२); वेतालजी जगताप यास घनगडाची सरनोबतीबाबत केचोजी हणगेभोर यास (८७३, ८७५); पंत अमात्याच्या कबिल्यास साताऱ्यास येऊं देण्याबद्दल सरदारांना (८७६, ८७७); दीपाजी कदमरावाच्या देशमुखी हक्कास सिदी जागीरदारानें उपसर्ग देऊं नये म्हणून, गुरें परतोन द्यावी म्हणून संभुसिंग जाधव, आवजी कवडे यांना, दादंभट वाकडीकर व वेंकाजी यांचे खिस्ती धंदा वादासंबंधीं सुभानजी वागमोडे व आवजी कवडे यांस (८८२); वरानजी सरक्ये याची घोडी परत मिळण्याबाबत, मदारी तांबोळ्यास जिनसाचे दस्तकाबाबत, आपाजी शंकर देशपांड्याची वस्तभाव परतोन देणें म्हणून रघोजी भोसले व नारो आपाजी यांना (८८३);

दप्तर अंक ५

पुडकें क्र. ४—चालू

